७०४४
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं. ३५२

१०५७

थोरांच्या सहचारिणी

RFFBK-0006512

# थोरांच्या सहचारिणी

★
★★

: लेखिका :

**सौ. कमला फडके**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५७२
शाखा

**ऑगस्ट १९४४**

RFFBK-0006512

**किंमत १-१२-०**

प्रकाशक :

दा. ना. मोघे,

स्कूल ॲण्ड कॉलेज बुक-स्टॉल,

कोल्हापूर.

सर्व हक्क स्वाधीन.

मुद्रक :

बाळकृष्ण नारायण ठकार,

श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,

कोल्हापूर.

# प्रस्तावना

एला सेन 'यांनीं लिहिलेलं ' वाइव्हस ऑफ फेमस मेन ' हें पुस्तक माझ्या वाचण्यांत आलं तें मला इतकं आवडलं, कीं त्यांतलीं चरित्रं मराठी वाचकांना परिचित करून द्यावीं असं मला वाटलं. त्या पुस्तकाचे प्रकाशक ' थॅकर अँड को. ' यांजकडे भाषांतराची परवानगी विचारली ती त्यांनीं ताबडतोब दिली. मराठी पुस्तकांत ब्लॉक्स घालण्यासाठीं देण्याचंही त्यांनीं कबूल केलं. इतकं झाल्यावर मीं भाषांतराच्या कामास प्रारंभ केला, व एक एक चरित्र ' झंकार ' साप्ताहिकांत प्रसिद्ध झालं. तीं सर्व चरित्रं आतां मी पुस्तकरूपानं वाचकांपुढें ठेवीत आहे.

हीं चरित्रं म्हणजे थोडक्यांत काढलेलीं धांवतीं शब्दचित्रं (Pen-portraits ) आहेत. त्या त्या व्यक्तीची समग्र माहिती देण्याचा हेतु यांत नाहीं. एखादं चरित्र वाचतांना तर अशी शंका येते कीं लेखिकेला त्या स्त्रीची माहिती बेताचीच असून आपल्या सामग्रीचा तुटपुंजेपणा केवळ शब्दावडंबरानं झांकण्याचा प्रयत्न ती करते आहे. हा दोष दूर करणं फारसं कठिण नव्हतं. उदाहरणार्थ, कस्तुरबा गांधी व इंदिरा नेहरू यांच्याबद्दलच्या पुष्कळ माहितीची भर मला त्यांच्या चरित्रांत घालतां आली असती. पण तो मोह मी टाळला. कारण मूळ पुस्तकाचं भाषांतर करण्याचं काम मी पत्करलं होतं, त्यांत भर घालण्याचं नव्हे. शिवाय चरित्रांना भरपूरपणा आणण्याचा मी प्रयत्न केला असता तर त्यांत झटपट काढलेल्या फोटोंचा ( Snap-shots ) जो गुण आज आहे तो कदाचित् नाहींसाही झाला असता. आणि तो गुण हेंच या चरित्रांचं खरं आकर्षण ठरण्यासारखं आहे. तेव्हां माहितीचा टाचकेपणा दूर करण्याचा विचार मीं मनावेगळा केला, व भाषांतर सरस करणं हेंच माझं खरं काम असं मीं ठरविलं. तें मी कितपत पार पाडलं आहे हें माझ्या वाचकांनीं ठरवायचं आहे.

या पुस्तकांतलीं सर्वच चरित्रं या ना त्या दृष्टीनं बोधप्रद वाटण्यासारखीं आहेत. इंग्रजी पांचव्या व सहाव्या इयत्तांतील विद्यार्थ्यांना पुरवणी वाचन म्हणून या पुस्तकाचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे. मुलींच्या शाळेंत तर हें पुस्तक अभ्यासक्रमांत दाखल करण्यासारखं शाळाधिकाऱ्यांना वाटावयास हरकत नाहीं. पण मुलांनाहि या पुस्तकाच्या वाचनापासून फायदा होईल अशी मी आशा करतें. कारण थोर पुरुषांच्या चरित्रांची पूर्ण कल्पना येण्यासाठीं त्यांच्या सहचारिणींच्या स्वभावाचा व जीवनक्रमाचा अल्प तरी परिचय अवश्य आहे हें कोणीही कबूल करील.

मराठी भाषांतराची परवानगी व इंग्रजी पुस्तकांतल्या सुंदर चित्रांचे ब्लॉक्सही वापरण्यास दिल्याबद्दल ‘ थॅकर अँड को. ’ चे व मूळ पुस्तकाच्या लेखिकेचे ( एला सेन हें टोपण नांव आहे ! ) मीं पुन्हां एकदां आभार मानतें.

माझ्या मराठी पुस्तकाचे प्रकाशक श्रीयुत दा. ना. मोघे यांचे तर मानतेंच !

१ ऑगष्ट १९४४. कमला फडके.



कै. कस्तुरबा गांधी

नों. नं. १०८०१

# १ . . . . . कस्तुरबा गांधी

ता. ८ फेब्रुवारी १९४३ रोजीं पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्यें महात्मा गांधीनीं एकवीस दिवसांचा उपवास सुरू केला. सर्व देशभर मोठ्या चिंतेचं वातावरण पसरलं; आणि आगाखान पॅलेसवर शुश्रूषेसाठीं डॉक्टर व महात्माजींची आप्तस्वकीय जी मंडळी जमा झाली ती तर अशा भावनेनं कीं साऱ्या जगाला मोठ्या मोलाचे वाटणारे महात्माजींचे प्राण वांचविण्यासाठीं आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. या मंडळींत महात्माजींच्या पत्नी कस्तुरबा गांधी या अर्थातच होत्या. महात्माजींच्या शय्येजवळ रात्रंदिवस तत्परतेनं त्या उभ्या असतांना त्यांच्या मनाची कशी कशी खळबळ चाललेली असेल त्याचं यथार्थ वर्णन करणं कोणाला शक्य आहे काय ?

गांधीजींबरोवर सेवाधर्माचं व्रत कस्तुरबांनीं स्वीकारलं खरं; पण कांहीं झालं तरी त्यांचं स्त्रीहृदय. ज्याच्या जीविताभोंवती आपल्या जीविताचे सारे धागे गुंतलेले आहेत त्या आपल्या प्रियतम पतीनं आरंभिलेली खडतर तपश्चर्या पाहून कस्तुरबांचं अंतःकरण व्याकुळ झालं असलं तर नवल कोणतं ? परंतु स्वतःच्या सुखाचा विचार त्यांच्या मनाला कधीं शिवला नसून विरोधाचा किंवा नापसंतीचा एक शब्दहि त्यांच्या मुखांतून कधीं बाहेर पडला नाहीं. किंबहुना ज्या ज्या वेळीं गांधीजींनी अशी खडतर उपोषणं केलीं त्या त्या वेळीं अंतःकरणाची तळमळ निग्रहानं दाबून, अत्यंत निःस्वार्थीपणानं व समंजसपणानं त्यांच्या तपश्चर्येंत समरस होऊन कस्तुरबानीं असामान्य धैर्य दाखविलं !

राजकोटच्या सत्याग्रहाच्या वेळीं तर कस्तुरबांचं धैर्य पुरतंच कसोटीला लागलं. वयोमानामुळें शरीर थकलं असलं तरी त्यांच्या मनाचा जोम मोठा. राजकोटच्या लढ्यांत सत्याग्रह करणारांत कस्तुरबांचं पाऊल प्रथम पडलं. गांधीजींनीं उपोषण आरंभिल्याची बातमी त्यांच्या कानीं पडली ती त्या स्वतः कैदेंत असतांना! प्रसंगी वज्रापेक्षां खंबीर होणाऱ्या त्यांच्या मनाचा धीरच क्षणभर खचला. गांधीजींना सत्तरावं वर्ष लागलेलं; त्यांतून त्यांची प्रकृतिहि क्षीण झालेली; अशा स्थितींत आरंभिलेलं उपोषण म्हणजे मृत्यूला आमंत्रणच! गांधीजींचा निग्रही स्वभाव व त्यांचा दृढ निश्चय कस्तुरबांच्या परिचयाचा होता. गांधीजींना या उपोषणापासून परावृत्त करणं शक्य नाहीं हें जाणून त्यांच्या मनाचा भीतीनं थरकांप उडाला. परंतु त्यांच्या मनाचं सामर्थ्य एवढं कीं ही सारी तळमळ आंतल्या आंत दाबून मनाचा तोल ढळूं न देतां त्या कर्तव्यतत्पर राहिल्या.

संयम, कर्तव्यतत्परता, निःस्वार्थीपणा व पतीच्या ध्येयाशी निष्ठा असं एखाद्या तपस्विनीसारखं कस्तुरबांचं जीवीत बनलं होतं. संसारांतील सुखदुःखांतून, मोहांतून, अहंकारांतून मुक्त झाल्यामुळें, अग्निदिव्यांतून तावून सुलाखून निघालेल्या सुवर्णाप्रमाणं तपस्येचं तेज त्यांच्या मुद्रेवर पसरलेलं दिसे. सेवाधर्म हाच त्यांच्या जीवनाचा हेतु बनला होता!

परंतु ही तपश्चर्या त्यांना सहजासहजीं साध्य झाली नाहीं. उतारवयांतील तपस्विनी कस्तुरबा एके काळीं ऐहिक सुखाची व ऐश्वर्याची आसक्ति बाळगणारी स्त्री होत्या. त्यांच्या ठिकाणीं लौकिकार्थानं ज्याला आपण सौंदर्य म्हणतो तें कधींच नव्हतं. किंबहुना विद्या किंवा सौंदर्य अंगीं नसतांहि वधू म्हणून गांधीजींसाठीं त्यांची निवड करण्यांत आली होती. निवड करण्यांत आली होती असंच म्हटलं पाहिजे. कारण त्या काळीं आजच्यासारखी परस्परांच्या पसंतीनं किंवा आवडीनं लग्नं होत नसत. प्रेमविवाहाची प्रथा तेव्हां नव्हती. बालविवाह, पडदा, आणि जात्यंधता यांसारख्या रूढींनीं त्या काळचा समाज जखडलेला होता. गांधीजींची दोन वेळां ठरलेलीं लग्नं मोडली. तिसऱ्यांदा मात्र तेरा वर्षांच्या कस्तुरबांशी त्यांचा विवाह झाला. दोघंहि समवयस्कच. कस्तुरबा तर अल्लड बालिका

होत्या; व गांधीजींना तारुण्याची पुरती ओळखहि नव्हती. परंतु विवाहाची जबाबदारी मात्र गांधीजींनी अगदीं मनापासून पत्करली. कस्तुरबांच्या ठिकाणीं त्यांची एवढी दृढ निष्ठा होती, कीं तिच्या उत्कटतेपासून सुख निर्माण होण्याऐवजीं पुष्कळदां ती कलहास मात्र कारण होत असे. ह्या तीव्र निष्ठेमुळेंच गांधीजींचा स्वभाव थोडासा मत्सरी, संशयी व जुलमी बनला होता. आणि कस्तुरबा स्वतंत्र वृत्तीच्या असल्यामुळें त्या दोघांच्या चकमकी उडत.

आपल्या प्रत्येक कार्यांत आपल्या पत्नीनं सहकार्य करावं अशी गांधीजींची तीव्र इच्छा. पण कस्तुरबासारखी अशिक्षित स्त्री ही इच्छा तृप्त कशी करणार? तेव्हां साहजिकच कस्तुरबांच्या शिक्षणास सुरुवात झाली. आपल्या पत्नीस आदर्श पत्नी बनविण्याची तळमळ गांधीजींना लागली होती. परंतु जों जों गांधीजी कस्तुरबांना शिक्षणाचे धडे देत, तों तों निराशा त्यांच्या पदरीं येई! शिक्षणाचं अवघड काम कस्तुरबांना जमत नसे. किंबहुना शिक्षणाच्या या जुलमाचा त्रास होऊन त्या अधिकच निष्काळजी-पणें वागत; व त्यांच्या या वृत्तीमुळें गांधीजींच्या जुलमास ऊत येत असे. मात्र या कलहाचा उगम देखील गांधीजींच्या कस्तुरबावरील प्रेमांतच होता. कस्तुरबावरील प्रेमांत गांधीजींना जगाचंहि भान राहिलं नव्हतं. कस्तुर-बांचा त्यांनीं इतका लळा लावून घेतला होता, कीं त्या काळच्या पद्धती-प्रमाणें कस्तुरबा सहा सहा महिने माहेरी रहात तेंदेखील त्यांना पसंत नव्हत. कस्तुरबा माहेरीं जात त्या नाइलाजानं व नाखुषीनंच.

या प्रेमळ जोडप्यावर दीर्घ वियोगाचा प्रसंग आला तो गांधीजींना वयाच्या अठराव्या वर्षी इंग्लंडला जावं लागलं तेव्हां. कस्तुरबा आतां आपल्या तान्ह्या मुलासह सासरींच राहूं लागल्या. सासर जुन्या थाटाचं. परंतु तें घर कसंहि असलं तरी कस्तुरबांना प्रियच होतं. गृहकृत्यं संभाळ-ण्यांत व वृद्ध सासूची सेवा करण्यांत त्या आपल्या प्रिय पतीच्या विरहाचं दुःख विसरत. प्रतीक्षेच्या त्या काळांत त्यांना तोच एक विरंगुळा वाटत असे. मात्र सासूच्या निधनानंतर घरची सारीच जबाबदारी कस्तुरबांवर पडली, व त्यांना अधिकच असहाय व एकाकी वाटूं लागलं. घर इतर

नातेवाइकांनीं भरलं होतं. परतु गांधीजींशिवाय त्या भरल्या घरांतहि त्यांना अगदीं एकटं एकटं वाटत असे.

गांधीजी परत आले. कस्तुरबांचा आनंद परत मिळाला. परंतु इतिहासाची पुनरावृत्ति सुरू झाली. पुन्हा असूया, पुन्हा जुलूम, आणि पुन्हा तें शिक्षण! कस्तुरबांना सुशिक्षित करण्याचा गांधीजींनीं आतां चंगच बांधला. पण मुळांत शिक्षणाची नावड व त्यांतून गांधीजींचा असा ससेमिरा, यामुळें कस्तुरबा अधिकच गोंधळून जात.

अखेर कस्तुरबांच्या निर्बुद्धपणाची व गांधीजींच्या संतापाची परमावधी होऊन त्याचा शेवट मोठा चमत्कारिक झाला. गांधीजींनीं कस्तुरबांची माहेरी रवानगी केली! आणि परत आणलं तें त्या अगदीं रडकुंडीस आल्या तेव्हांच. इतकं झालं तरी कस्तुरबांच्या मनांत गांधीजींविषयीं कडू विचार आला नव्हता, आणि गांधीजींच्या मनांतूनहि त्या कधीं उतरल्या नव्हत्या. त्यांची एकमेकावरली निष्ठा व प्रीति कधीहि ढळली नाहीं.

गांधीजी दुसऱ्यांदा दक्षिण आफ्रिकेला गेले तेव्हां त्यांनी कस्तुरबांस व मुलांनाहि बरोबर घेतलं होतं. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकाचा प्रश्न सोडविण्यासाठीं त्यानीं सर्वस्व वाहिलं होतं, परंतु संसाराचे पाश मात्र अद्यापि त्यांच्या भोवतीं दृढ होते. कस्तुरबा तर पतीसह दर्यावरच्या पहिल्या वहिल्या सफरीस निघाल्या होत्या. गांधीजींच्या आग्रहाप्रमाणें त्यांनीं प्रवासाची तयारी केली. अनवाणी चालण्याची त्यांना संवय, पण त्यांनीं मोरे बूट स्टॉकिंग्ज चढविले. त्यावेळीं फॅशनचा कळस म्हणजे पार्शी पद्धतीनं साडी नेसायची. कस्तुरबांनीं हेंहि केलं. इतकंच नव्हे तर जेवतांना काटे चमचे सुद्धां त्या वापरूं लागल्या. विलायती चालीरीतींचा कस्तुरबांना कधीं गंधहि नव्हता. परंतु केवळ पतीची हौस व आज्ञा म्हणून त्यांनीं सर्व गोष्टी मुकाट्यानं केल्या. बूट स्टॉकिंग्ज घालणं व काट्याचमच्यांनीं जेवणं यांचा कितीहि त्रास होत असला तरी त्या इतक्या सहजपणें व सफाईनं वागत कीं, पाहणाराला ही एक पाश्चात्य संस्कृतींत मुरलेलीच बाई आहे असं वाटावं.

आफ्रिकेंतले ते दिवस अनेक बऱ्यावाईट प्रसंगांनीं भरलेले असले तरी कस्तुरबांना मोठे सुखाचे वाटले. गांधीजी आपल्या कार्यांत मग्न होते.

आपल्या हजारों बांधवांना अन्यायांतून मुक्त करण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली होती, आणि त्यासाठीं त्यांचा अहर्निश लढा चालू होता. त्यासाठीं त्यांनीं अपमान सोसले. तुरुगवासहि भोगला. या लढ्यांतच अहिंसामय सत्याग्रहाचं सामर्थ्य गांधीजींना प्रथम पटलं. निराशेच्या व जागृतीच्या या काळांत कस्तुरबांनीं गांधीजींना सतत सोबत केली. कस्तुरबांचा गांधीजीवरील अढळ विश्वास, निष्ठा, आणि संकटकाळीं न डगमगण्याची त्यांच्या मनाची वृत्ति, यांमुळें त्यांचा गांधीजींना मोठा आधार वाटत असे. कस्तुरबांनीं सबंद चौऱ्याहत्तर वर्षांच्या आयुष्यभर त्यांना अशी सोबत केली. धीर दिला. प्रोत्साहन दिलं.

परंतु कधी कधी त्यांचा स्त्रीस्वभाव उचल खात असे. दक्षिण आफ्रिकेंत गांधीजींवर लोक अतिशय प्रेम करीत. आपला उद्धार करणाऱ्या त्या थोर विभूतीविषयींची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं नाताळ प्रांतांतील लोकांनीं तर गांधीजींना भेट म्हणून जडजवाहिर दिलं. खास कस्तुरबांसाठीं म्हणून त्यांत एक मौल्यवान कंठाहि होता. परंतु गांधीजीं ह्या भेटीचा स्वीकार करतील हें शक्य नव्हतं. दक्षिण आफ्रिकेंतल्या आपल्या बांधवांसाठीं ते लढा लढले तो अत्यंत निःस्वार्थीपणें. त्यांचा सेवाधर्म कसल्याहि मोहापासून अलिप्त होता. परंतु कस्तुरबा किती झालं तरी स्त्री ! कोणत्या स्त्रीला जडजवाहिराचा मोह पडणार नाहीं ? गांधीजी सारं जवाहिर परत करूं लागले तेव्हां कस्तुरबांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले ; आणि गांधीजींजवळ कधी नाहीं तो त्यांनीं हट्ट धरला. बाकीचं जडजवाहिर वाटेल तर परत करा, पण तो कंठा मला हवा, असा त्यांनीं ध्यास घेतला. गांधीजी ऐकेनात. तेव्हां त्या म्हणाल्या, "माझ्या मुलांचीं लग्नं झालीं म्हणजे माझ्या सुनांना मी तो देईन." "तुझी मुलं अजून लहान आहेत. त्यांतून ती मोठी होऊन त्यांची लग्नं झालींच, तर तुझ्या जडजवाहिरांवर नजर ठेवून त्यांच्याशीं लग्न करणारी मुलगी त्यांना पसंत पडणार नाहीं. आणि तशी मुलगी त्यांना भेटलीच तर मागशील तेव्हां मीं तुला दागिने देईन." अशा युक्तिवादानं गांधीजींनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु कस्तुरबांनीं त्यांना उत्तर दिलं तें रागांत दिलं असलं तरी फार मार्मिक होतं. त्या म्हणाल्या, "तुमच्याकडे मागू म्हणतां ! मी तुम्हांला आतां पुरतं ओळखलं आहे.

अहो, माझे स्वत:चे दागिने तुम्ही मला लाभूं दिले नाहींत ! आणि म्हणे तुझ्या सुनांसाठीं दागिने वाटेल तेव्हां माग. ”

परंतु अखेर गांधीजींनी आपलंच म्हणणं खरं केलं. त्या साऱ्या जडजवाहिराचा एक ट्रस्ट फंड करून त्या निधीतून देशकार्यासाठीं लागेल तितके पैसे गांधीजी वरचेवर काढून घेत.

एकदां हरिजनफंडासाठीं देणगी म्हणून कोणीसे चार आणे कस्तुरबांजवळ आणून दिले. नजरचुकीनं हे पैसे कस्तुरबांजवळच राहून गेले. गांधीजींच्या लक्षांत ही गोष्ट आली तेव्हां त्यांनीं कस्तुरबांस प्रायश्चित्त घ्यावयास लावलं. वास्तविक ही गोष्ट कस्तुरबांकडून विसरतेपणी घडली होती. परंतु गांधीजींच्या तात्त्विक दृष्टीनं कस्तुरबांच्या हातून न कळत कां होईना पण अपराध घडला होता. अर्थात् या अपराधांतून पावन होण्यासाठीं कस्तुरबांना प्रायश्चित्त घ्यावं लागलंच.

एकदां शेगांवला कांहीं हरिजन सत्याग्रहींनीं भेट दिली. या हरिजन पाहुणे मंडळीस स्वत:च्या मुलांप्रमाणें वागवा व त्यांचं आदरातिथ्य करा असा गांधीजींनीं कस्तुरबांना निरोप पाठविला. कस्तुरबांनीं आपल्या साऱ्या खोल्या आधींच इतर पाहुणेमंडळीसाठीं रिकाम्या केल्या होत्या. त्यांत पुन्हा गांधीजींचा निरोप ऐकतांच त्यांनीं चिडून उत्तर धाडलं, “ पाहुण्यांचं आदरातिथ्य मी करीनच. परंतु त्यांना स्वत:च्या मुलांप्रमाणें वागवायचं असेल तर तें काम बापूजींनींच करावं ! ”

गांधीजींना पितृवत् मानणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांनीं व स्नेह्यासोबत्यांनीं कस्तुरबांचं घर नेहमीं गजबजलेलं असें. गांधीजींभोवतीं त्यांचे कार्यकर्ते, त्यांचे भक्त आणि त्यांचे आश्रित यांचा इतका मोठा परिवार असे, कीं गांधीजींशी एकांतात चार शब्द बोलण्याची संधिदेखील कस्तुरबांना क्वचितच मिळे. आपल्या पतीशी एकांतात प्रेमाच्या गुजगोष्टी कराव्या असं कोणत्या स्त्रीला वाटणार नाहीं ? सार्वजनिक कामं आटोपल्यावर, दिवसाकाठीं कांहीं थोडा वेळ तरी पतीनं फक्त आपल्याच सहवासांत घालवावा अशी प्रत्येक स्त्रीची अपेक्षा असते. प्रेमाचा असा अधिकार स्त्रियांना असतोच व त्या तो आपल्या पतीवर गाजवितातहि. परंतु

कस्तुरबा सामान्य स्त्री राहिल्या नव्हत्या. एकेचाळीस वर्षांच्या अनुभवावरून आपल्या पतीवर तसा हक्क गाजविणं शक्य नाहीं हें त्या समजून चुकल्या होत्या. परंतु त्यामुळें मनाला त्रास करून न घेतां आपला पति अनेकांच्या आदराचं, स्फूर्तीचं व विश्रांतीचं स्थान व्हावा यांतच कस्तुरबांनीं समाधान मानलं. गांधीजीसारख्या थोर विभूतीला संसाराच्या चार भिंतीआड कोंडून धरणं योग्य नव्हे हें त्यांनीं ओळखलं. कारण स्वतःचा संसार सुखानं करावयाचा हें त्या महात्म्याचं ध्येय नव्हतं. सबंध देशांत जागृति निर्माण करून स्वदेशाचा उद्धार करण्याच्या प्रतिज्ञेनं त्यांनीं देशकार्यास आरंभ केला आहे हें कस्तुरबा समजून होत्या. त्यामुळें गांधीजींचं देशकार्य हाच आपला संसार मानून कस्तुरबा पतीच्या ध्येयाशीं समरस झाल्या. ज्या वेळीं गांधीजी महात्मा–पदाला पोंचले, त्या वेळीं कस्तुरबा त्यांना मुकल्या. याचा अर्थ असा नव्हे कीं, गांधीजींची कस्तुरबांवरील माया कमी झाली. परंतु त्या मायेचं अनिर्बंध देशप्रेमांत रूपांतर झालं. ते कस्तुरबांचे प्रियतम पति मोहनदास राहिले नाहींत, ते साऱ्या हिंदुस्थानचे आधारस्तंभ ' महात्मा ' झाले ! या महात्म्यावर आतां साऱ्या देशाचं प्रेम जडलं होतं व सारा देश त्यांच्यावर आपला अधिकार सांगत होता.

मोठ्या पुरुषांशीं लग्न करणं म्हणजे ताजमहालाशीं लग्न करण्यासारखंच, असं कुणीसं म्हटलं आहे तें कांहीं अगदींच खोटं नाहीं. निदान कस्तुरबांना तरी याचा पुरता अनुभव आला असला पाहिजे. गांधीजींभोवतीं सदा त्यांचा परिवार असल्यामुळें कस्तुरबांना कधीं त्यांचा सहवास फारसा लाभत नसे. परंतु पुढें पुढें तर वर्तमानपत्रांनीं गांधीजींचं खासगी जीवनच नाहींसं केलं. गांधीजींचा प्रत्येक शब्द, त्यांची प्रत्येक कृति म्हणजे जणू साऱ्या देशाची मालमत्ता, अशा तऱ्हेनं त्यांची प्रसिद्धि होई. गांधीजींवर आता कस्तुरबांचा अगर त्यांच्या मुलांचा कांहींच हक्क उरला नव्हता. कित्येकदां पतीच्या या कीर्तीचा कस्तुरबांना अभिमान वाटला असेल. परतु त्यांना स्वतःला त्यासाठीं जो त्याग करावा लागला त्याचं क्वचित् प्रसंगीं त्यांना मोठं दुःखहि झालं असेल. अशा वेळीं ज्या काळांत गांधीजी पत्नीप्रेमानं मत्सरीदेखील बनले होते ते दिवस कायमचे गेलेच काय असं त्यांच्या मनांत

आलं असेल. किंवा गांधीजी कितीहि मोठे झाले, आणि देशकार्याच्या व्यापांत आपल्यापासून दूर गेले, तरी ते आपले पति आहेत व आपण त्यांच्या पत्नी आहोत ह्या एका विचारांतच त्यांनीं समाधान मानलं असेल.

गांधीजींच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न त्यांचे शत्रु करीत त्यामुळें कस्तुरबांना पुष्कळदां मनस्तापहि सहन करावा लागत असेल. परंतु लोकापवादाविरूद्ध जें उत्तर गांधीजींनीं एकदां दिलं आहे त्यांत त्यांनीं आपल्या पत्नीचा गौरवच केला आहे. " देशसेवेंत सर्वस्व अर्पण करावं या हेतूनं १९०६ सालीं मी ब्रह्मचर्याचं व्रत स्वीकारलं व संसारांतून मुक्त झालों. एका दृष्टीनें माझी पत्नीहि माझ्या प्रेमाच्या अधिकारांतून मुक्त झाली. परंतु तिला माझ्या हृदयांत जें स्थान आहे तें स्थान इतर कोण-त्याहि स्त्रीला कधीं मिळालेलं नाहीं. पति–पत्नीच्या नात्याचं पावित्र्य मी कधीं भंगू दिलं नाहीं; किंवा मी माझ्या पत्नीशीं एकनिष्ठ राहीन ही माझ्या आईसमोर घेतलेली शपथ मी कधीं मोडली नाहीं. "

वयोमानानं त्यांची प्रकृति क्षीण, नाजुक झाली. त्या जन्मभर साध्या राहिल्या. स्वतःचं प्रदर्शन करणं, अहंकारानं वागणं, अशा वृत्तीचा त्यांच्या ठिकाणीं पूर्ण अभाव होता. त्यांना लिहितां वाचतां येतं असे. परंतु खरी विद्वत्ता• आत्मसात् करण्याची त्यांची संधी एकदां हुकली ती हुकली ! त्यांच्या बुद्धीचा पोच व समंजसपणा मात्र अगदीं जातिवंत होता. जगांत कोठे काय चाललं आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असे. विशेषतः गांधीजींच्या हालचालींकडे व कार्याकडें त्या सतत लक्ष देत.

कस्तुरबांविषयीं फारसं लिहिलं बोललं जात नसे. परंतु शेगांवच्या जीविताचा प्रवाह मात्र कस्तुरबांभोंवती फिरत असे. त्यांचा धीर, त्यांचा समज व त्यांचा त्याग एवढा मोठा होता कीं आर्य स्त्रीच्या उच्चतम जीवनाच्या त्या एक अद्वितीय प्रतीक होत्या. गांधीजींच्या त्या सहधर्मिणी व सहकार्मिणीहि होत्या. गांधीजींच्या कार्यांत त्यांचा वाटा फार मोठा होता. त्यांच्या कार्याचा विशेष गाजावाजा झालेला नाहीं. परंतु लोकांच्या अंतःकरणांत त्यांना कायमचं आदराचं स्थान मिळालेलं आहे !



कै. कमला नेहरू

# २ . . . . . कमला नेहरू

कमला नेहरूच्या जीविताला उपमा द्यावयाची झालीच तर ती निरंजनांत तेवणाऱ्या ज्योतीचीच द्यावी लागेल. निरंजनांतील ज्योत प्रथम तग धरते. नंतर तेलाची स्निग्धता संपेपर्यंत ती वाढत्या तेजानं प्रकाशते. विजेच्या किंवा गॅसच्या प्रकाशाप्रमाणें त्या ज्योतीचा प्रकाश नेत्रांना तापदायक वाटत नाहीं. कमलाच्या जीवनाची ज्योतदेखील कांहीं काल स्वतंत्र तेजानं तळपत राहिली. एके दिवशीं अचानक तिच्या जीवितांतील स्निग्धता सरली आणि थोडी धडपड करून अखेर तिची जीवनज्योत मालवली. त्यानंतर अंधार पसरल्यासारखा वाटूं लागला, आणि एखाद्या भयाण वादळी रात्रीं वाटावी तशी उदासीनता जिकडे तिकडे भरून राहिली.

जिच्या जीविताची अगदी अकालीच समाप्ति झाली आणि जी कसल्याहि प्रसिद्धीपासून नेहमीं अलिप्तच राहिली, त्या कमलाचं स्वभावचित्र रेखाटणं थोडं कठीणच आहे. तिच्या हातून जें कांहीं कार्य घडलं तें अशा कालीं कीं, हिंदुस्थानच्या गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासांत तो काल राजकीयदृष्ट्या अतिशय धामधुमीचा, वादळाचा होता. शिवाय महात्मा गांधी, तिचे पति जवाहरलाल, तिचे श्वशुर मोतीलाल नेहरू व चित्तरंजन दास अशा तेजस्वी पुढाऱ्यांमुळें साऱ्या जगाचे डोळे त्या कालीं दिपून गेले होते. कमलाच्या व्यक्तित्वाचं तेज या पुढाऱ्यांच्या प्रकाशांतच लुप्त होऊन गेलं. जिच्यापासून हिंदी स्त्रियांना स्फूर्ति मिळाली आणि जी सतत त्यांच्या उद्धारासाठीं झटली त्या कमलाच्या कर्तृत्वाकडें जगान कधीं लक्षच दिलं नाहीं. स्वतः कमला राजकीय चळवळीच्या कार्यांत इतकी मग्न झाली होती कीं,

जनतेची ही उपेक्षा तिला फारशी कधी जाणवलीच नाहीं. परंतु या उपेक्षेमुळें कमलेची खरी ओळख कुणालाच कधी पटली नाहीं. तिच्याविषयीं प्रेम व आदर बाळगणाऱ्यांना सुद्धां तिच्या स्वभावांतील गुणदोषांचा फारसा निकट परिचय होऊं शकला नाहीं. जवाहरलालांची पत्नी या नात्यानं जनतेच्या अंतःकरणांत तिला कायमचं स्थान लाभलं असलं तरी तिच्या कर्तृत्वाकडें लोकानीं जें दुर्लक्ष केलं तें अक्षम्यच म्हटलं पाहिजे. जवाहरलालांइतकंच तिचं व्यक्तित्व तेजस्वी होतं. परंतु जवाहरलालांची पत्नी यापलीकडे लोकांना तिची फारशी ओळख राहिली नाहीं.

या उपेक्षेचा कमलेला कधींच विषाद वाटला नाहीं. कारण स्वतंत्र कीर्ति मिळवावी असा विचारहि तिच्या मनांत कधीं आला नव्हता. कमलेच्या जीविताचा इतिहास आठवला म्हणजे मात्र तिच्यासारख्या बाणेदार वृत्तीच्या स्त्रीला हा अन्यायच झाला असं वाटल्याखेरीज रहात नाहीं. कारण पतीची केवळ सावली होऊन राहण्यांत तिनं कधीं समाधान मानलं नाहीं. पतिपत्नींचं कार्य व ध्येय एकच असलं तरी, काहीं विषयांबाबत त्या उभयतांमध्यें तीव्र मतभेद निर्माण होत असत. कमला स्वतंत्र विचाराची स्त्री असल्यामुळें जवाहरलालांच्या विचारांची छाप तिच्यावर कधींच पडत नसे. उलट जवाहरलाल अत्यंत स्वतंत्र वृत्तीचे असूनहि कमलेनं त्याजवर आपलं वजन राखलं होतं; व तिच्या या बाणेदार स्वभावामुळें ती त्यांना अधिकच प्रिय झाली होती. आपली कन्या इंदिरा हिला पत्र लिहितांना "कमलेसारखी आई तुला लाभली हें मी तुझं भाग्यच समजतों. तूं कसल्याहि अडचणींत पडलीस किंवा तुझं मन अस्वस्थ झालं, तर तुझ्या आईसारखी मैत्रीण तुला कुठेहि सांपडणार नाहीं" असे उद्गार त्यांनीं काढले आहेत. हे उद्गार साधे आहेत खरे, परंतु त्यांमागें कमलेविषयीं त्यांना वाटणारं प्रेम, विश्वास व आदर प्रगट झाला आहे.

कमला नेहरूंविषयीं ज्या ज्या गोष्टी ऐकूं येतात त्या सर्वांतून तिच्या आजारीपणाचा उल्लेख प्रामुख्यानें आढळतो. या आजारीपणाच्या हकीगती ऐकून कमलेची प्रकृति जात्याच अशक्त असावी असा साहजिकच समज होतो. परंतु जवाहरलालांची पत्नी म्हणून नेहरूंच्या घरांत ती प्रथम आली

७०६७७

तेव्हां तिची प्रकृति अतिशय सुदृढ होती. किंबहुना मोतीलालनीं वधू म्हणून तिची निवड केली ती तिच्या सशक्त प्रकृतीकडे व आनंदी स्वभावाकडे पाहूनच. स्वतः मोतीलालांच्या पत्नीची प्रकृति फारच नाजूक; त्यांच्या तब्येतीची सदाच कुरकुर असायची. तेव्हां नवा संबंध जोडायचा तो अगदीं निरोगी व सशक्त घराण्याशींच जोडायचा अशा कटाक्षानं मोतीलाल नेहरूंनीं काश्मीरच्या एका प्रतिष्ठित घराण्यांतील ही मुलगी जवाहरलालांसाठीं पसंत केली.

वयाच्या सतराव्या वर्षीं कमलेचा जवाहरलालांशीं विवाह साजरा झाला. नेहरूंचं घराणं सुधारलेलं असलं तरी हा विवाहसमारंभ जुन्या थाटानंच झाला असं म्हटलं पाहिजे. फरक येवढाच कीं जवाहरलालांच्या संमतीनंच वधूची निवड केली होती. याच सुमारास हिंदुस्थानच्या राजकीय चळवळींत नवीनच विचारप्रवाह उत्पन्न झाल्यामुळें जवाहरलालांचं सारं लक्ष राजकारणांतच गुंतलं. विवाहासारख्या खाजगी प्रश्नावर विचार करण्याइतकी फुरसत व स्वस्थता त्या वेळीं त्यांच्या चित्ताला नव्हती. देशसेवेच्या विचारांनीं त्यांचं जीवित अधिकाधिक व्यापलं जाऊं लागलं होतं.

राजकारणाच्या वातावरणांत जवाहरलाल इतके मग्न होऊन गेले कीं, पतिपत्नीमध्यें थोडं अंतर उत्पन्न झालं व सहवासानं निर्माण होणारा जिव्हाळा किंवा उत्कट मैत्री त्यांच्या अनुभवास आली नाहीं. कमलेला ही जाणीव झाली असली तरी तिनं ती कधींच व्यक्त केली नाहीं. कदाचित् त्या वेळीं जवाहरलालांच्या व्यक्तिमत्वाची तिला पूर्णत्वानं ओळख पटलेली नसल्यामुळं ही उणीव तिला भासली नसावी. नवराबायकोतलीं भांडणं अपवाद नसून नियमच समजलीं जातात. त्यांतून या दोघां पतिपत्नींचे स्वभाव जात्याच तापट असल्यामुळें प्रथम प्रथम त्यांच्या वरचेवर चकमकी झडत असत. अर्थात् पुढें या पतिपत्नीचे प्रेमसंबंध दृढ झाल्यामुळें या भांडणांना फारसं महत्त्व उरलं नव्हतं ही गोष्ट निराळी.

विवाहानंतरच्या या काळांतच कमलेची प्रकृति ढासळली. आणि योगायोग असा कीं, याच सुमारास देशाच्या राजकारणांत नेहरू कुटुंबांतील सगळी मंडळी पडली, व त्यांचं आयुष्य कष्टाचं, धावपळीचं

आणि संकटाचं होऊन बसलं. जवाहरलाल तर अष्टौप्रहर देशसेवेच्या कामांत गुंतले. ते तुरुंगांत तरी असत किंवा मोकळे असले तर रात्रंदिवस त्यांचा वेळ राजकारणांत जाई. तथापि, या धकाधकीच्या काळांतच पतिपत्नींचा सहवास वाढला. कारण कमलाची प्रकृति अगदींच नादुरुस्त असल्याचे दिवस सोडले तर मधल्या दिवसांत ती राजकीय चळवळींत अगदीं मनापासून पडलेली दिसूं लागली. ती जें जें करी तें अशा उत्कटतेनं, कीं जणूं सबंध आयुष्यांत करावयाच्या गोष्टी तिला लवकर साधून घ्यावयाच्या होत्या. देशकार्य करण्याची संधि आपल्याला दीर्घकाल लाभणार नाहीं असं ती मनातल्या मनांत ओळखून होती. ती पुष्कळदां अगदीं थकून जाई. परंतु ती आपल्या निश्चयापासून कधी ढळली नाहीं. आणि जोपर्यंत तिच्या हातापायांत शक्ति होती तोंपर्यंत ती अभिमानानं आणि करारानं कार्य करीत राहिली. “ जें जें शक्य तें करता येईल तों करून टाकावं ” असं तिचं ब्रीदवाक्य होतं.

चळवळीच्या त्या दिवसांत कमलानं पुरुषी गणवेष चढवावा आणि “ सत्याग्रही ” स्त्रियांची पथकं कवाइती घेऊन तयार करावीं. कार्य अधिक बिकट दिसलं कीं, तिनं मुद्दाम त्यांत उडी घ्यावी. तिच्या कार्याची तडफ पाहून जवाहरलालसुद्धां विस्मयचकित झाले असले पाहिजेत. कामाचा ताण आपल्या सहनशक्तीपलीकडे पडत आहे हें तिला समजलं असलं तरी तिनं त्याचा विचार केला नाहीं. ती आपल्या प्रकृतीकडे बिलकुल लक्ष देत नाहीं हीच जवाहरलालांची तिच्याविषयीं सर्वांत मोठी तक्रार होती. पुष्कळदां याबद्दल ते तिला रागानं बोलतहि. त्यांची तिच्यावर फार दृढ प्रीति होती. आणि त्यामुळें तिनं असे कष्ट केले तर भलताच परिणाम होईल अशी भीति त्यांच्या मनांत डोकावे. ऐन तारुण्यांत एकमेकांविषयींची जी सहानुभूति व समजूत त्या दोघांत नव्हती, ती आतां नंतरच्या दिवसांत उत्पन्न झाली होती. प्रकृतीनं नाजुक पण कार्यनिष्ठेच्या दृष्टीनं अत्यंत तेजस्वी अशी कमला त्यांना विलक्षण प्रिय वाटूं लागली होती. विवाहानंतरच्या पहिल्या दिवसांत आपण आपल्या पत्नीची थोडीशी उपेक्षाच केली, अशा पश्चात्तापाचे विचार त्यांच्या मनांत आल्यावाचून रहात

नसतील. त्यांनी तिच्यासाठीं करावयाचं ते सर्व केलं होतं खरं, पण बोलावयाचं पुष्कळच राहिलं होतं.

जवाहरलाल दीर्घ मुदतीची शिक्षा भोगीत तुरुंगांत असत. कमला प्रकृतीसाठीं कोठल्या तरी हवेच्या ठिकाणीं असे. मधेच चुकून असे दिवस येत कीं दोघांची गाठ पडे. ते त्यांना सुटीच्या दिवसासारखे चैनीचे वाटत. जवाहरलालांनीं महत्त्वाच्या कामांतून मोठ्या खटपटीनं विश्रांतीसाठीं काढलेले ते दिवस म्हणून दोघांना ते विशेष सुखाचे होत. हे सहवासाचे दिवस म्हणजे बहुतांशी तातातुटींत काढाव्या लागणाऱ्या त्यांच्या जीविताच्या अंधारात पडलेले प्रकाशाचे कवडसेच म्हटले पाहिजेत. या काळांत दोघेहि एकमेकांना धीर देत. एकमेकांच्या मनाची शक्ति वाढवीत. त्यांनीं अगदी प्रथम दीर्घ विश्रांतीसाठीं एकत्र सफर काढली ती १९२० सालांत तीं युरपच्या प्रवासास गेली तेव्हां. त्यांचा बहुतक मुक्काम स्वित्झर्लंडमधेंच झाला. पण पॅरिस, बर्लिन आणि पुढें मॉस्को ही शहरंहि त्यांनीं पाहिलीं. हा प्रवास कमलाला फार सुखाचा झाला. तिची प्रकृति उत्तम नव्हती परंतु ती आपल्या प्रिय पतीबरोबर सर्व ठिकाणीं हिंडली. तीं मॉस्कोला गेली तीं केवळ प्रवासाच्या हेतूनं. पण त्यांच्या सन्मानार्थ पुष्कळ ठिकाणीं समारंभ झाले. मोतीलाल नेहरू यांच्या आवडी निवडी सरदारी थाटाच्या व चैनीच्या, आणि त्या वेळीं रशियांत सुरू झालेल्या सोव्हिएट राजवटीबद्दल त्यांचं मत कांही अनुकूल नव्हतं. देशसेवेच्या कार्यासाठीं त्यांनीं आपल्या इस्टेटीचा पुष्कळ मोठा भाग दिला होता खरा, परंतु त्यांची वृत्ति एखाद्या अमीरउमरावाला साजेशी होती. त्यांना वाटलं रशियांत जाऊन उगीच कां स्वतःचे हाल करून घ्यायचे? पण जवाहरलालांनीं रशियांत जाण्याचा अगदीं हट्टच धरला. कमलाचीहि रशियांत जाण्याची तीव्र इच्छा पाहून तर मोतीलालनां अगदीं आश्चर्यच वाटलं. आणि मग त्या दोघांना जाण्याची परवानगी देऊनच ते थांबले नाहींत, तर त्यांच्या नेहमीच्या स्वभावानुसार ते म्हणाले, "मग मीच येतो तुमच्याबरोबर म्हणजे झालं." युरपची ही यात्रा संपवून नेहरू मंडळी परत आली तेव्हां कमलाची तब्येत पुष्कळच सुधारली होती.

जवाहरलाल नेहरूंच्या चाहत्यांतले पुष्कळसे लोक त्यांचे अंधभक्त होते. घरांत तर सगळ्याच कुटुंबियांनीं त्यांना लाडावून ठेवलं होतं, आणि त्यांच्या बहिणी त्यांच्यावर जें प्रेम करीत व स्तुतीचा जो वर्षाव करीत त्याला सीमाच नसे. पण कमलानं अशी अंधभक्ती कधीं दाखविली नाहीं. त्यांच्याविषयीं तिच्या मनांत गाढ आदर व अभिमान होता यांत शंकाच नाहीं; परन्तु त्यांच्या पराक्रमांनीं तिचे डोळे दिपत नसत. तिला वाटे हे इतके मोठे आहेतच मुळीं, असे पराक्रम त्यांच्या हातून व्हावेत यांत आश्चर्य मानण्यासारखं काय आहे ? या विचारसरणींत आदराचा विशेष सूक्ष्म आणि मधुर भाव होता हें उघड आहे. कारण तिला असं वाटे याचा अर्थ असा होता कीं, त्यांचे गुण आणि त्यांचे दोष यांचा इतर कोणांपेक्षाहि अधिक निकट परिचय तिला झाला होता, व त्यामुळें त्यांचा मोठेपणा पाहून अगर त्यांचे दोष दिसल्यावर तिला विस्मय वाटत नसे. ज्यासाठीं सारं जग जवाहरलालांची प्रशंसा करी तो आपल्या पतीचा स्वभावधर्मच होय हें तिला माहीत होतं; आणि जगाला त्यांच्या स्वभावांतलं जें वैगुण्य दिसे त्याला तिच्या दृष्टीनं फारसं महत्त्व नसे. कारण त्या वैगुण्यापलींकडे तिची दृष्टि पोचली होती. " हिंदुस्थानचा जवाहर "," त्यागमूर्ति " इत्यादि अतिरंजित विशेषणं लोकांनीं त्यांना लावली कीं त्याबद्दल तिनं त्यांची चेष्टाच करावी.

स्त्रियांना स्वतंत्र मतं असावीत, स्वतंत्र हक्क असावेत, केवळ पुरुषाची सावली होऊन त्यांनीं राहू नये, अशा जहाल सुधारक मतांचा कमला पुरस्कार करीत असे. परंतु कित्येकदां पूर्वापार संस्कारांचा परिणाम म्हणूनच कीं काय तिच्या मनांत एखाद्या जुन्या स्त्रीला शोभतील असे विचार मधूनच उचल खात. १९३१ सालीं तिला शिक्षा झाली त्या वेळेस ती म्हणाली, ' जिकडे पति जाईल तिकडे जाणं हा पत्नीचा धर्म होय.' या उद्गारांचा पूर्ण अर्थ तिच्या ध्यानीं आला असता तर तिच्या बाणेदार स्वतंत्र वृत्तीनं ते तिच्या तोंडून बाहेर पडूं दिले नसते अशी नेहरूंनीं त्यावर मार्मिक कोटी केली. एकदां ती जवाहरलालांच्या बरोबर हैद्राबाद संस्थानांत गेली असतांना पडदानशीन स्त्रियांकरितां व्याख्यान देण्याची तिला विनंति करण्यांत आली. या व्याख्यानांत स्त्रीदास्यविमोचनाबद्दल अतिशय जहाल मतं कमलानं पुढे

मांडली असलीं पाहिजेत. कारण त्यानंतर थोड्याच दिवसांनीं आपल्या बायका आतां मर्यादेबाहेर चालल्या असून आपलं कांहींच ऐकत नाहींत अशीं तक्रार हैदराबादचे पुरुष करूं लागले.

तिचा स्वभाव फार करारी होता. त्यामुळें आपल्या दुखण्याचे लाड करून घेण्याऐवजीं तीं त्याच्याशीं झगडत राहिली. पुष्कळदां तिचं शरीर थके, परंतु मनाचा जोम एकवटून ती काम करीत राही. परतु त्यामुळेंच तिचा आजार विकोपाला गेला. देशकार्याविषयीं तिला केवढी तळमळ होती व जवाहरलालांबद्दल तिचा अभिमान केवढा जाज्वल्य होता याचं एक उदाहरण देण्यासारखं आहे. ती अंथरूणाला खिळलेली होती. केवळ तिला भेटण्यासाटीं जवाहरलालांची तुरुंगांतून सुटका झाली होती. चळवळींत भाग न घेण्याचं आश्वासन दिल्यास सरकार त्यांना मुक्त करील व त्यांना तिच्या सन्निध राहावयास मिळेल असा संभव होता. ही गोष्ट कमलाच्या कानावर गेली असावी. जवाहरलाल भेटतांच त्यांच्याकडे आपली क्षीण नजर लावून आणि आपला कृश हात त्यांच्या हातीं देऊन तिनं विचारलं, " हें मी काय ऐकते ? तुम्ही सरकारला कसलं आश्वासन देणार आहां ? मुळींच देऊं नका."

१९३४ सालीं कमलाच्या दुखण्यानं एकदम उचल खाल्ली. जुलैच्या सुमाराला तर तिच्या प्रकृतीविषयीं सर्वांना काळजी वाटूं लागली. आणि अशा वेळीं जवाहर तिच्याजवळ असावेत म्हणून सरकारनं त्यांची तात्पुरती सुटकाहि केली.

आईला भेटण्यासाठीं त्यांची एकुलती एक कन्या इंदिराहि शांतिनिकेतनांतून आली होती. इंदिरा आईवडिलांची लाडकी मुलगी असूनहि तिला त्यांचा सहवास कधीं लाभला नाहीं. वडिलांनीं नेहमीं तुरुंगांत असावं आणि आईनं हवेच्या ठिकाणीं रहावं. अशा परिस्थितींत आई–वडिलांच्या सहवासांत राहण्याचं सुख तिला फारसं लाभलं नव्हतं.

" तुला फार एकटं एकटं वाटत असेल पण आळीपाळीनं दर पंधरा दिवसांनीं तूं मला व आईला भेटत जा, व आमचे निरोपहि एकमेकाला पोंचव " अशीं पत्रं जवाहरलाल तिला लिहीत असत. त्या वेळीं ती अवघी बारा वर्षांची होती. परंतु आई–वडिलांचे निरोप एकमेकाला पोचवणं ह्या एका गोष्टींतच तिचा आनंद सामावला होता. " तूं आनंदभुवनांत, आई

मलाक्काला व मी येथें नैनीच्या तुरुंगांत, अशीं तिघं तीन दिशांना आपण आहोंत. कधीं कधीं आठवणी येऊन चैन पडेनासं होतं नाहीं ! ” असं जवाहरलालांनीं तिला एकां पत्रांत लिहिलं होतं ते कांहीं खोटं नव्हतं. आप्त-स्वकीयांनीं आनंदभुवन गजबजलेलं असे, परंतु इंदिराला त्या भरल्या घरां-तहि एकटं वाटणं साहजिक होतं. कारण आपल्यापासून दूर असलेल्या आईवडिलांच्या भवितव्याची तिच्या बालमनाला देखील काळजी लागून राहिली होती. १९३५ च्या मे महिन्यांत आईबरोबर ती ‘ बेडन वेलर ’ ला गेली आणि तिच्या मृत्यूनंतरहि ती तेथेच राहिली. ती मधून मधून घरी येत असे. पण तिचं सारं शिक्षण इंग्लंड व स्वित्झरलंड येथेच झालं. वडिलांची चलाख बुद्धि व आईची बाणेदार वृत्ति तिच्या अंगी पुरती उतरली आहे. आणि आईप्रमाणेंच ती नाजुक प्रकृतीची व अबोल स्वभावाची आहे. युरोपमध्यें युद्धाच्या ज्वाला भडकूं लागल्या त्याच सुमारास ती मातृभूमीस परत आली; आणि आई–वडिलांचं ध्येय पुढें ठेवूनच तिनं आपल्या जीविताच्या प्रवासाला सुरवात केली आहे. नुकताच तिचा प्रीतिविवाह झाला आहे. मनाजोगा सहचर मिळाल्यामुळें तिच्या पूर्वाश्रमीच्या एकल-कोंड्या जीविताची भरपाई झाली असंच तिला वाटत असलं पाहिजे.

तुरुंगांतून तात्पुरती सुटका होऊन जवाहरलाल कमलाला भेटण्यासाठीं आले ते अकरा दिवस तिच्याजवळ राहिले. त्या अकरा दिवसांच्या अवधींत कमलाखेरीज दुसरा विचारच त्यांच्या मनाला सुचत नव्हता. त्यांचं सार्व-जनिक जीवन तात्पुरतं संपलं होतं, राजकारण ते पार विसरले होते. कमला आपल्याला सोडून जाणार नाहीं ना ह्या एकाच विचारानं त्यांच्या हृदयाचा थरकाप होत असे. सार्वजनिक कार्यांतच त्या दोघांनीं इतकी वर्षं घाल-विली होती कीं, एकमेकांच्या सुखाचा विचारच त्यांनीं कधी केला नव्हता; किंवा विरहाचं दुःख मानलं नव्हतं. परंतु आतां कमला अंथरुणावर तळमळतांना व मृत्यूशीं झगडतांना पाहून ताटातुटीची विलक्षण भीति जवाहरलालांना वाटूं लागली. “ निरोप देणं व घेणं ” ह्याचं दुःख त्या दोघांइतकं दुसऱ्या कोणी अनुभवलं नसेल. परंतु आतां मात्र ती कल्पना त्यांना असह्य वाटली. अकरा दिवसांनंतर जवाहरलालांना तुरुंगांत नेण्यांत

आलें. तेव्हां कमला अत्यवस्थच होती. अखेर तिला भोवाली येथें हवापालट करण्यास न्यावं असा डॉक्टरांनीं सल्ला दिला. आणि भोवाली-पासून जवळच असलेल्या अलमोरा तुरुंगांत जवाहरलालांना नेण्यांत आलं. दर पंधरा दिवसांनीं कमलाला भेटण्याची त्यांना परवानगी होती. परंतु नंतर थोड्याच दिवसांत " बेडन वेलर " येथें औषधोपचार घेण्यासाठीं कमला युरपला गेली. तिच्याबरोबर इंदिरा व तिचे डॉक्टर अतल हेहि गेले ती गेल्यावर भावी संकटाची छाया पसरल्याची जाणीव जवाहर-लालांना झाली असावी. कारण त्यांनी उद्‌गार काढले — "

" कमला गेल्यानंतर माझ्या भोवालीच्या भेटी बंद झाल्या. दर पंधरा दिवसांनीं कड्याकपारींतून भोवालीकडे जाणाऱ्या रस्त्यावरच्या मोटारीच्या खेपांची आतां जरूर नव्हती. या गोष्टी आतां कायमच्या संपल्या आणि अलमोऱ्याचा तुरुंग मला अधिकच भयाण वाटूं लागला.


१९३६ सालीं कमला कालवश झाली. मृत्युकाळीं त्यांनीं तिच्याजवळ असावं म्हणून आधींच कांहीं महिने जवाहरलालांची तुरुगांतून मुक्तता करण्यांत आली होती. घरापासून, आप्तेष्टांपासून, जें जें कांहीं तिला प्रिय होतं त्या सर्वांपासून दूर असलेली कमला " बेडन वेलर " येथें मोठ्या धीरानं आपले अखेरचे क्षण मोजीत होती. अखेर दोन प्रिय व्यक्तींनां पोरकं करून कमला कालवश झाली. एक तिचे जवाहर आणि दुसरी तिची कन्या इंदिरा. कामाच्या पसाऱ्यांतदेखील जवाहरलालांच्या मनांतली एकटेपणाची आग शांत झाली नव्हती; आणि दुष्ट दैवानं तर छोट्या इंदिराचं सारं सुखच हिरावून घेतलं होतं.

कमलाच्या जीविताविषयीं व कार्याविषयीं कुठेंहि वाच्यता न व्हावी असा जणूं कटच सर्वांनीं केला असावा. जवाहरलालांच्या चरित्रांत तिच्याविषयीं थोडाफार उल्लेख आला आहे. परंतु या बाबतींत त्यांनीं वरील कटांत सामील झाल्याप्रमाणें आपल्या खाजगी जीवनाविषयीं कांहींच लिहिलं नाहीं. परंतु त्यांच्या संयमाचा हा बंधारा फोडून कमलाविषयींचं त्यांचं उत्कट प्रेम त्यांच्या चरित्रावरील अर्पण पत्रिकेंत प्रगट झालं आहे. " **कालवश कमलेस** " त्यांनीं आपली जीवनकथा अर्पण केली आहे.

# ३ . . . मादाम चँग-कै-शेक

संस्कृति अगर ऐश्वर्य यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनं पाहिलं तरी मादाम चँग-कै-शेक या एक अद्वितीय स्त्री ठरतील. कारण आधुनिक चिनी स्त्रियांच्या सर्व विशेषांचा त्यांच्या ठिकाणीं समुच्चय झालेला आहे. लोकमताच्या आणि राजकारणाच्या धकाधकीपासून अलिप्त असा शांत जीवनक्रम त्यांच्या वाट्याला आला नाहीं; किंवा मोठ्या माणसाच्या पत्नीपदाचा गौरव तेवढा घेऊन त्याबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या त्यांनीं टाळल्या नाहींत. उलट स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं चाललेल्या चीनच्या प्रचंड लढ्याची धुरा वाहण्यास त्यांनीं आपले पति चँग-कै-शेक यांना प्रोत्साहन आणि स्फूर्ति दिली आहे. चीन देशाच्या आणि विशेषतः चिनी स्त्रियांच्या जागृतीचं आणि उद्धाराचं महत्कार्य करण्याचं भाग्य त्यांना लाभलं आहे.

पौर्वात्यांची सौंदर्यदृष्टि आणि पाश्चात्यांची व्यवहारी वृत्ति यांचा अगदीं योग्य प्रमाणांतील मिलाफ ज्यांच्या ठिकाणीं आढळतो अशा व्यक्ती फार विरळा. पण अशा व्यक्तींपैकीं माईलिंग सुंग चँग या एक आहेत. अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांत त्यांचं शिक्षण झालं असलं तरी चिनी संस्कृतिची त्यांना पूर्ण कल्पना आहे. चिनी लोकांच्या जीवनांतील अडीअडचणींमुळें समाजांत आमूलाग्र सुधारणा करणं केवढं दुष्कर आहे हें त्यांनीं ओळखलं आहे. पाश्चात्त्य शिक्षणानं अधिकच सुधारणाप्रिय झालेल्या त्यांच्या मनाला समाजसुधारणेचं हें कार्य कंटाळवाणं वाटणं सहाजिक होतं. परंतु त्या स्वत: पौर्वात्य असल्यानं चिनी समाजांत प्राचीन कालापासून रुजलेल्या दुष्ट चालीरीतींचं निर्मूलन करतांना जितका दृढनिश्चय तितकीच सहानुभूति त्यांनीं दाखविली.



मादाम चँग-कै-शेख

त्यांच्या प्रत्येक कृतीमागं दृढनिश्चय आढळतो. त्यांच्या मतांत सुसंगति असली तरी दुराग्रहाचा लेशहि नसतो. कित्येकदां आपल्या मतांना मुरड घालणं जरूरीचं असतं हें ओळखण्याइतक्या त्या व्यवहारचतुर आहेत. विरोधकांशी सामोपचारानं विचारविनियम करून, त्यांची बाजू ऐकून घेऊन, स्वतःची भूमिका न बदलतां समेट करण्यांत त्या विलक्षण पटाईत आहेत. विशेषतः राजकारणांत समेटासारखी दुसरी उपयुक्त नीति नाहीं असं त्यांचं मत आहे मात्र स्वबांधवांचं हित साधण्याकरितांच फक्त त्या या नीतीचा अवलंब करीत असतात.

त्यांच्या या वृत्तीमुळेंच १९३६ सालीं चीनवरची एक मोठी आपत्ति टळली. त्यांचे पति कॉम्युनिस्ट पार्टीच्या हातीं सांपडून तुरुंगवासांत होते, आणि चिनी सरकारनं तर कॉम्युनिस्ट पार्टीवर ब्रॉबहल्ला करून 'सिआन' मधून त्यांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा केली होती मादाम चँग कै शेक मोठ्याच पेचप्रसंगांत सांपडल्या. परंतु सरकारनं कॉम्युनिस्ट पार्टीचं निदान म्हणणं तरी ऐकून घ्यावं अशी त्यांनीं मध्यस्थी केली. वास्तविक त्या आपल्या पतीप्रमाणेंच अँटी-कॉम्युनिस्ट होत्या. परंतु कॉम्युनिस्ट पार्टी व सरकार यांचा समेट घडून आल्यास चिनी राष्ट्राच्या सामर्थ्यांत भर पडून जपान-सारख्या शत्रूला तोंड देतां येईल असा विचार सुचण्याइतकं सरकार ताळ्यावर नाहीं हें ओळखून त्यांनीं स्वतःच समेटाची जबाबदारी अंगावर घेतली. शिवाय पतीची सुटका करण्याचा हेतुहि त्यांच्या मनांत होताच. "कांहीं झालं तरी आपण सारे चिनी आहोंत. आपापसांत लढाई करण्यापेक्षां सामोपचारानं मार्ग काढणं हेंच आपलं कर्तव्य होय" अशा शब्दांनी त्यांनी अखेर सरकारची समजूत काढली.

माई लिंग सुंगचा जन्म एका ख्रिस्ती कुटुंबांत झाला. एकंदर सहा मुलांतली ही सर्वांत धाकटी. तिच्या वडिलांनीं दोरखंडांचे "झूले" विकण्याचा धंदा करून अमेरिकेंत अतोनात संपत्ति मिळविली आणि नंतर ते चीनला परत आले ते धर्म-प्रसाराचं काम करणारे मिशनरी म्हणून. त्यांच्या मुलांचं लहानपण सामान्य मुलांप्रमाणं गेलं तरी पुढें मोठेपणीं त्या सर्वांनीं नांवलौकिक मिळविला. त्यांच्या सर्व मुलींचं प्राथमिक शिक्षण

चीनमधील मिशनऱ्यांच्या शाळांतून झालं. साऱ्या बहिणींचीं नांवं मोठी काव्यमय आहेत. सगळ्यांत थोरल्या बहिणीचं नांव ' आय लिंग ' म्हणजे ' प्रेमलहरी '. तिचा नवरा ' कुंग ' हा सुप्रसिद्ध ' कन्फ्यूशस ' च्या वंशांतला असून सध्याच्या सरकारांत तो अर्थमंत्र्याच्या अधिकारावर आहे. मधल्या बहिणीचं नांव ' चिआंग लिंग ' म्हणजे ' आनंदलहरी. ' सुन-यत् सन या जगविख्यात चिनी पुढाऱ्याशीं तिचं लग्न झालं आहे. " माई लिंग " ही सर्वांत धाकटी. तिच्या नांवाचा अर्थ ' सौंदर्यलहरी ' असा आहे.

या तिन्ही बहिणी उच्च शिक्षण घेण्यासाठीं अमेरिकेंत गेल्या. तिकडे असतांनाच माई-लिंगनं अनेक भाषांत प्राविण्य मिळविलं. पौर्वात्य संस्कृतीची पाश्चात्यांना कल्पना करून देण्याच्या हेतूनं तिनं अनेक चिनी ग्रंथांचं इंग्रजींत भाषांतर केलं. तिच्या या भाषाप्रभुत्वाचा पुढें चँग-कै शेक यांना फार उपयोग झाला. परभाषा बोलणारे लोक भेटीला आले कीं त्यांच्याशीं संभाषण चालविण्याच्या कामीं त्या दुभाष्याचं काम उत्कृष्टपणें करतात. पुष्कळ लोक विनोदानं त्यांचं चँग कै-शेक च्या " परराष्ट्रीय मंत्री " म्हणून वर्णन करतात तें या अर्थानंच. अमेरिकेंतील शिक्षण संपवून त्या चीनमध्यें परत आल्या तेव्हांच प्रथम सेनापती चँग कै शेक यांच्याशीं त्यांची गांठ पडली. चँग-कै-शेक हे सुन-यत् सेनचे अनुयायी होते व सेनापती म्हणून त्यांनीं कीर्ति मिळविली होती. माई लिंग तरुण होत्या परंतु त्यांची वृत्ति त्या वेळेसहि गंभीर व विशेष धार्मिक होती इतकी की जरी त्यांचं चँग कै-शेक यांच्यावर प्रेम जडलं होतं आणि नवीन स्थापन झालेल्या नानकिंग सरकारच्या मुख्य प्रधानाच्या जागेवर ते होते, तरीदेखील ते धर्मानं ख्रिश्चन नव्हते या एकाच कारणासाठीं त्यांची विवाहाची मागणी त्यांनीं अनेक वेळा नाकारली. परंतु त्यांचं व चँग कै शेक याचं जीवनसूत्र एकत्र गुंफलं जाऊन त्यांच्या हातून महत्कार्य घडावं असाच योगायोग होता असं म्हटलं पाहिजे. कारण अखेर १९२७ सालीं त्यांचा चँग-कै-शेक यांच्याशी विवाह झाला व तो त्यांच्या आग्रहाप्रमाणं चिनी धर्मविधीऐवजीं ख्रिश्चन विधीप्रमाणें चर्चमध्यें साजरा करण्यांत आला. नंतर तीन वर्षांनीं

ज्या दिवशीं सेनापतीनीं ख्रिश्चन धर्माचा यथाविधी स्वीकारच केला तो दिवस मादाम चँग-कै-शेक यांना अत्यंत आनंदाचा वाटला. "यशू-ख्रिस्तासारखाच परमेश्वर मला हवासा वाटतो " असे उद्गार त्या वेळीं चँग-कै शेक यांनीं काढले. त्यांच्या धार्मिक भावनांत घडून आलेल्या या फरकाचं सर्व श्रेय मादाम चँग-कै शेक यांना आहे.

करार, ध्येयाची आवड, आणि बौद्धिक दूरदृष्टि हे गुण त्यांच्या स्वभावांत पहिल्यापासूनच होते; परंतु लग्न झाल्यानंतर नवऱ्याच्या हातांत हात घालून त्यांनीं जेव्हां राजकारणाच्या क्षेत्रांत पदार्पण केलं तेव्हां त्या गुणांचं तेज विशेष दिसू लागलं. पतीचं ध्येय तेंच आपलं ध्येय असं त्यांनीं मानलं आणि त्यांच्या विविध कार्यांचीं सूत्रं त्यांनीं आपल्या नाजूक पण कार्यक्षम हातांत घेतलीं. चँग कै-शेक यांना पराक्रमाची सर्व स्फूर्ति त्यांच्यापासूनच मिळूं लागली. पौर्वात्य संस्कृतीस अनुसरून त्यांनी आपल्या पतीच्या सेवेचं व्रत निष्ठेनं सुरूं केलं; परंतु तें केवळ आंधळेपणानं नव्हे तर पतीच्या ध्येयाचं स्वरूप पूर्णपणें त्यांना स्वतःला पटलं म्हणून. चीनचा भाग्योदय ज्या पुरुषाच्या हातीं होता असं त्यांना वाटलं त्याच्या त्या पूर्णार्थानं सह-चारिणी बनल्या. त्यांच्या प्रत्येक कार्यांत तर त्यांनीं सहाय्य केलंच, परंतु शिवाय वेळेच्या अभावी सेनापतीनां हातीं घेतां आल्या नाहींत अशा अनेक चळवळी त्यांनीं स्वतः यशस्वी करून दाखविल्या. अनेक प्रसंगीं त्यांनीं सेनापतींना धीर दिला. त्यांचा स्वतःचा आत्मविश्वास आणि उत्साह इतका दांडगा की निराशा व संकटं यांतून त्यांनीं नेहमीं हसतमुखानं मार्ग काढला. चीनचा भाग्योदय आणि आपल्या पतीचं श्रेष्ठत्व यांवर त्यांची अढळ श्रद्धा आहे.

चीन देशांतील जुन्या अमीर-उमरावांच्या स्त्रियांप्रमाणें पडद्याआड राहून पुरुषांवर सत्ता गाजविण्याची वृत्ति मादाम चँग-कै-शेक यांच्या ठिकाणीं नाहीं. आधुनिक चीनचं त्या प्रतीक आहेत. पतीविषयीं त्यांना मोठा आदर आहे. इतका कीं सेनापति आपल्या बायकोच्या मुठींत आहेत अशी शंका कोणी प्रदर्शित केली तरी ती त्यांना अपमानास्पद वाटेल. चीनच्या उज्वल इतिहासाला शोभेल असा भावी काल निर्माण करण्याचं व्रत या

दोघां पतिपत्नींनीं एकदमच स्वीकारलं आहे; जनतेच्या गौरवाच्या सिंहासनावर तीं दोघं एकत्रच बसतील; आणि मानवी जीवितांत अपरिहार्यच अशा दुःखांना व संकटांना तीं दोघं मिळूनच तोंड देतील. आपल्या कोट्यावधी देशबांधवांसाठीं हवं तें दिव्य करण्यास तीं दोघेहि तयार आहेत. सेनापतीप्रमाणंच मादाम चँग-कै शेक यांना कॉम्युनिस्ट विचारसरणी नापसंत असल्यानं त्या दोघांचं राजकीय प्रश्नांबाबत कधीं दुमत होत नाहीं. किंबहुना कॉम्युनिस्ट चळवळ मोडून टाकण्याच्या कामीं त्यांनीं सेनापतीबरोबरच पुढाकार घेतला होता. त्या वेळीं त्यांचे बंधू टी. व्ही. सुंग हे सरकारांत अर्थमंत्र्याच्या जागीं होते. सेनापतींच्या कॉम्युनिस्ट विरोधी चळवळीस आर्थिक मदत करण्यास सुंग नाखूष दिसतांच त्या तडक नानकिंगला गेल्या व त्यानीं सुंग यांना अर्थमंत्र्याच्या जागेचा राजिनामा देण्यास भाग पाडलं, व आपले मेहुणे डॉ. कुंग यांना ती जागा मिळावी अशी व्यवस्था केली. परंतु केवळ पैशाच्या व सैन्याच्या बळावर चीनमधील कॉम्युनिस्ट चळवळीचं उच्चाटन होऊं शकत नाहीं हें अनुभवानं पुढें सिद्ध झालंच.

मादामच्या हातून घडलेलं विशेष प्रशंसनीय कार्य म्हणजे युद्धाच्या धावपळींतसुद्धां त्यांनीं केलेली चीनची पुनर्घटना. एकीकडे जपानी बॉबचा मारा चालू असतां दुसरीकडे अत्यंत दूरदृष्टीनं मादामनीं "न्यू लाइफ मुव्हमेंट" म्हणजे "नव जीवन चळवळ" सुरू केली. त्यांनीं एक कमिटी स्थापन केली आणि कमिटीच्या व एका मिशनऱ्याच्या सहाय्यानं देशभर प्रचारकार्य चालविलं. प्रत्येक चिनी माणसाला वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव उत्पन्न करून कार्यास प्रवृत्त करण्याचा या नवजीवन चळवळीचा मुख्य उद्देश होता. खेड्यांची पुनर्घटना, शेतकऱ्यांची आर्थिक सुधारणा, रस्ते व घरं यांची आरोग्यदृष्ट्या सुधारलेली रचना, असे प्रचारांतील मुख्य विषय होते. 'स्त्री, दारू व जुगार यांपासून अलिप्त रहा' 'माशा व उंदीर यांचा नायनाट करा—कारण त्यांपासून रोग उत्पन्न होतात.' 'प्रामाणिकपणा, दयाळूपणा व नियमितपणा अंगीं आणण्याचा प्रयत्न करा.' अशीं प्रचारवाक्यं लिहिलीं-बोललीं जात. देशभर ही चळ-

वळ फार यशस्वी झाली. खेड्यांची पुनर्घटना, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, औद्योगिक धंदे, वगैरे विषयांत हजारों प्रचारक आतां तयार झाले असून प्रत्येक खेड्यांतून त्यांनीं हें पुनर्घटनेचं कार्य चालविलं आहे. परकीय आक्रमणापासून ज्या दिवशीं चीन मुक्त होईल व राष्ट्रोन्नतीचं कार्य हातीं घेईल, त्या दिवसाची ही पूर्व तयारीच चालू आहे असं म्हणावयास हरकत नाहीं.

वैमानिक खात्याचा कारभार ज्या कमिशनतर्फे चालू असे त्यावर मादाम चँग कै शेक यांनीं सेक्रेटरी म्हणून बरेच दिवस काम केलं होतं. १९३६ सालीं सेनापती कॉम्युनिस्टांच्या तुरुंगांत सांपडले व साहजिकच त्यांची बिनतोड सुटका कशी करावी याची चिंता मादाम चँग कै-शेक यांना पडली. परंतु त्यांची वृत्ति इतकी कर्तव्यदक्ष व कार्यक्षम कीं तशा परिस्थितींतहि कमिशनच्या सभेस हजर राहून त्यांनीं सर्व कामं पार पाडलीं. पुढें जेव्हां चीन लढाईच्या आगींत पुरता सांपडला तेव्हां जखमी सैनिक, अनाथ स्त्रिया, मुलं व निर्वासित यांची व्यवस्था करण्याची सर्वच जबाबदारी त्यांना घ्यावी लागली व कमिशनचं काम सोडावं लागलं. आतां त्यांनीं आपलं सर्व लक्ष याच कामांत घातलं आहे. विशेषतः युद्धामुळें अनाथ झालेल्या मुलांची त्या फारच काळजी घेतात. कारण हींच लहान लहान अर्भकं आपल्या खटपटीनं मोठीं झाल्यावर चीनचं सामर्थ्य वाढवितील असा त्यांना विश्वास वाटतो. या मुलांच्या वतीनं जगांतील पालकांस उद्देशून त्यांनीं नुकतंच एक पत्रक काढलं आहे. या पत्रकांतील विचार जर खरोखरच सर्वांकडून आचरणांत आले तर भावी तरुण पिढीचे बळी युद्धाच्या क्षेत्रांवर खचित पडणार नाहींत.

सामाजिक अगर राजकीय कोणत्याहि स्वरूपाची जबाबदारी मादाम चँग-कै-शेक या टाळीत नाहींत. प्रत्यक्ष आघाडीवर विमानानं जाऊन जखमी वीरांची शुश्रूषा करणं असो, अगर परराष्ट्रांतील विख्यात व्यक्तींना व वकिलांना आपल्या घरीं थाटाची मेजवानी देणं असो, सर्व कामं त्या सारख्याच चतुराईनं पार पाडतात. त्या दिसावयास फार मोहक आहेत; त्यांच्या स्वभावांतील उत्साह बुद्धिमत्तेमुळें अधिकच खुलून दिसतो; आणि त्यांच्या भाषणांत जो विनोद आढळतो तोहि फार खेळकर व उल्हसित असतो.

त्यांच्या भोंवतीं कामाचा मोठा व्याप सदैव असतो, व प्रत्येक काम अतिशय कळकळीनं करण्याची त्यांची वृत्ति आहे. परंतु इतकं असूनहि त्यांच्या तोंडावर नेहमीं हास्य असतं. जणुं तें हास्य म्हणजे खऱ्या चिनी संस्कृतीचा एक विशेषच.

आधुनिक चीन देशाचं अंतरंग कसं आहे हें ज्याला पाह्यचं असेल त्यानं माईलिंग सुंग चँग यांची बांधेसूद, नाजूक देखणी मूर्ति पहावी चीन देशाच्या नवयुगाच्या द्वाराशीं त्या उभ्या आहेत. त्यांच्या हातांत स्वातंत्र्याची ज्योत आहे. आणि आपापलीं अंत:करणं या ज्योतीवर उजळून घेण्यासाठीं चीन देशाची आबालवृद्ध जनता उत्सुक आहे. या लोकांची पिढी कालवश होईल, पुढच्या कित्येक पिढ्याहि येतील आणि जातील. परंतु कोट्यावधि चिनी लोकांच्या कृतज्ञतेनं भूषविलेली मादाम चँग-कै-शेक यांची मूर्ति जगाच्या स्मृतींत अखंड राहील !

# ४ . . . . . मादाम स्टालिन

सोव्हिएट रशिआंत पुरुषाइतकंच स्त्रियांना महत्त्व व स्वातंत्र्य आहे; परंतु रशिआचा सर्वाधिकारी स्टालिन याच्या लहानसहान कृतींचाहि भरमसाट बोलबाला करण्यांत येत असतांना त्याची द्वितीय पत्नी 'नाद्येझ्दा अलुलिएव्ह' हिच्या चरित्राविषयीं फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. तिचं चरित्र अशा प्रकारें अज्ञात राहिलं याचं कारण ती एक स्त्री होती हें नव्हे, तर तिच्या हातून महत्वाचं असं समाजकार्य घडलंच नाहीं. राजकारणधुरंधर स्टालिनशीं आपण लग्न केलं असं तिनं कधीं मानलं नाहीं. केवळ 'जोसेफ' या दृष्टीनंच त्याच्याकडं पाहून तिनं संसार केला.

सोव्हिएट राज्याची स्थापना झाल्यापासून रशिआंतील प्रमुख व्यक्तींविषयीं तर्ककुतर्क व बातम्या प्रसृत झालेल्या आढळतात. त्यांच्या प्रशंसेचा जसा अतिरेक झालेला आहे त्याप्रमाणं भयंकर गैरसमजहि पसरले आहेत. स्टालिनचं खाजगी जीवनहि यांतून सुटलेलं नाहीं. स्टालिननं केवळ दांडगाईनं पहिल्या बायकोशीं घटस्फोट केला, दुसरीचा अमानुषपणें जीव घेतला, आणि आतां त्यानं तिसरं लग्न केलं आहे असं त्याचे निंदक म्हणतात. टवाळखोरांनीं उठवलेल्या या गप्पांत तथ्य अर्थातच फार कमी आहे. परंतु स्टालिनचं वैवाहिक आयुष्य रहस्यमय आहे यांत शंका नाहीं.

१९३२ सालीं जेव्हां नाद्येझ्दा अलुलिएव्ह स्टालिन कालवश झाली तेव्हां तिच्या मृत्यूविषयीं हरतऱ्हेच्या बातम्या उठविण्यांत आल्या होत्या. कोणी म्हणावं नवऱ्याच्या जुलुमास कंटाळून तिनं आत्महत्या केली; तर स्टालिनसाठीं तयार केलेलं जेवण प्रथम चाखून पाहण्याचं काम तिच्याकडे असल्यामुळं त्याच्यासाठीं घातलेलं विष तिच्या पोटांत जाऊन ती मरण

पावली असंहि कोणी म्हणत. वस्तुस्थिति मात्र अगदींच निराळी होती. 'अपडिसाइटिस' च्या विकारानं ती बरेच दिवस आजारी होती व तिनं आपलं दुखणं स्टालिन यांना कळूं दिलं नव्हतं. अखेर जेव्हां तिनं त्याबद्दल सांगितलं तेव्हां कांहीं उपायच चालण्यासारखा नव्हता व त्यांतच तिचा अंत झाला.

कौटुंबिक जीवनांतील जिव्हाळा स्टालिनला दोनच व्यक्तींपासून मिळाला. एक त्याची आई व दुसरी नाद्येझ्दा. त्यामुळं नाद्येझ्दा कालवश झाल्यानंतर त्याच्या खाजगी आयुष्यांतील गोडीच नाहींशी झाली. तिच्यापासून त्याला दोन मुलं झालीं, त्यांना मात्र त्यानं ममतेनं वागविलं. यापैकीं मुलगा आतां वीस वर्षांचा व मुलगी पंधरा वर्षांची आहे. रशियांतील सर्वांत नमुनेदार अशा विद्यालयांत त्यांचं शिक्षण झालेलं आहे. स्टालिनचीं मुलं म्हणून त्यांना विद्यालयांत कोणत्याहि सवलती देण्यांत आल्या नाहींत, ही विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय.

स्टालिन बावीस वर्षांचा, म्हणजे चांगला कर्तासवरता क्रांतिकारक झालेला असतांना, 'अलुलिएव्ह' नांवाच्या त्याच्या एका मित्रानं 'जॉर्जिया' प्रांतांतील एका स्त्रीशीं लग्न केलं या दांपत्यास पुढें एक मुलगी झाली तिचं 'नाद्येझ्दा' असं नांव त्यांनीं ठेवलं. रशिअन भाषेंत या नांवाचा अर्थ 'आशा' असा होतो. रशिआच्या भाग्योदयांत ज्याप्रमाणें स्टालिनच्या हातून फार मोठी कामगिरी घडावयाची होती, त्याप्रमाणेंच या तान्ह्या 'आशे' चा स्टालिनच्या खाजगी जीवनावर फार मोठा परिणाम व्हावयाचा होता. पण त्यावेळीं मात्र या दोन गोष्टींबद्दल अशी नुसती कल्पनाहि कोणी केली नव्हती.

स्टालिन व अलुलिएव्ह यांची फार दिवसांची मैत्री होती, व त्यांचं मित्रप्रेमहि फार उत्कट स्वरूपाचं होतं. तेव्हां साहजिकच स्टालिन तुरुंगांत नसेल तेव्हां त्याचा मुक्काम या मित्राच्या निवांत घरीं असावयाचा. लहानगी नाद्येझ्दा त्याच्या दृष्टीसमोर लहानाची मोठी झाली. परंतु ती वयांत आली तेव्हांच स्टालिनचं लक्ष तिनं वेधून घेतलं. स्टालिनचं तनमन जरी बोल्शेव्हिक चळवळींत रात्रंदिवस गुंतलं होतं व कॉम्यूनिझमच्या तत्त्वासाठीं त्यानं

आपलं सर्वस्व वाहिलं होत तरी नाद्येझ्दाविषयींचे विचार त्याच्या मनांत सारखे येऊं लागले. त्याच्या तरुण दृष्टीला ती कांहीं आतां अलुलिएव्हची तान्ही मुलगी वाटत नव्हती. स्त्रीसुलभ भावनांचा व बुद्धीचा तिच्या ठिकाणीं आतां पूर्ण विकास झाला होता. ती आतां एका कारखान्यांत काम करूं लागली होती व कामगार म्हणून ती स्टालिनला अधिकच आवडूं लागली होती. तिच्याविषयीं स्टालिनच्या मनांत जीं सुखस्वप्नें उत्पन्न झालीं तीं मात्र क्रांतीनंतरच खरीं ठरावीं असा योगायोग होता.

नाद्येझ्दा स्टालिनपेक्षां तेवीस वर्षांनीं लहान होती. परंतु त्या लहान वयांतहि, आपल्या पित्याचा हा स्नेही आपलं जीवितसर्वस्व होऊन बसावा असं तिला जणूं एखाद्या गूढ प्रेरणेनंच वाटलं. ती त्याच्यावर प्रेम करूं लागली. मात्र प्रेमाच्या पूर्ततेसाठीं तिनं अधीरता दाखविली नाहीं. क्रांतीच्या महत्कार्यापुढें स्वतःच्या खाजगी सुखदुःखांचा विचार देखील करावयास स्टालिनला अवकाश नव्हता हें तिला दिसत होतं. केव्हां तरी तो आपल्याजवळ प्रेमाचा विषय काढील या आशेनं ती आपलं काम करीत राहिली.

१९१९ चं साल रशिआला मोठं आणीबाणीचं गेलं. रोगांच्या सांथी व दुष्काळ यांना तोंड देतां देतां सोव्हिएट अगदीं मोडकळीस आलं व बोल्शेविकांची संघटनाहि डळमळूं लागली. अशा चिंताग्रस्त परिस्थितींतच स्टालिनच्या प्रेमाचा विकास झाला. लेनिन किंवा ट्रॉट्स्की यांना अशा आणीबाणीच्या परिस्थितींत विवाहाचा किंवा घटस्फोटाचा विचार देखील सुचला नसता. आपल्या कार्यापुढें खाजगी सुखाचा विचारहि मनाला शिवूं न देण्याचा त्यांचा कठोरपणा स्टालिनच्या अंगीं नसेल; पण त्याच्या ठिकाणीं माणुसकीचा जिव्हाळा अधिक आहे असं म्हटलं पाहिजे. पहिल्या लग्नापासून स्टालिनला सुख लाभलं नव्हतं. प्रथम पत्नीपासून बरींच वर्षे तो विभक्त राहिला होता. सोव्हिएट सरकारच्या नव्या कायद्यांचा फायदा घेऊन त्यानं तिच्यापासून ताबडतोब घटस्फोट घेतला व सतरा वर्षांच्या नाद्येझ्दाशीं लग्न केलं. त्यावेळीं तो स्वतः चाळीस वर्षांचा होता.

त्याच्या सहवासांतच नाद्येझ्दा लहानाची मोठी झाली होती. पण ती शाळेंत जाऊं लागली तेव्हांच स्टालिनचं लक्ष तिच्याकडे गेलं आणि तेव्हां-पासून लग्न करावयाचं तर तिच्याशींच असं त्यानं ठरवूनहि टाकलं. स्त्रियांचीं लग्नं लवकर व्हावींत असं त्याचं मत होतंच. नाद्येझ्दा वयांत आल्याबरोबर त्यानं तिच्याशीं विवाह केला.

रशिआच्या सर्वाधिकारी स्टालिनशीं विवाह झाला म्हणून नाद्येझ्दानं कांहीं कारखान्यांतलं काम सोडलं नाहीं. कारण ती सोव्हिएटची एक घटक होती; व काम करण्याची जबाबदारी प्रत्येकानं पत्करलीच पाहिजे असं तिचं मत होतं. कारखान्यांत ठराविक तास नोकरी करून गृहकृत्यं, व स्टालिनची तब्बेत संभाळणं हें कांहीं सोपं काम नव्हतं. परंतु ती तें तत्पर-तेनं करीत असे. अशा सहकार्यांमुळें एरवीं वैराण असलेल्या त्याच्या आयु-ष्यांत ती एक विश्रांतीचं स्थानच होऊन बसली. मतभेदामुळं स्टालिनचे आणि ट्राट्स्कीचे संबंध ज्या वेळीं दुरावले, व लेनिनपासून विभक्त होण्याचा प्रसंग त्याच्यावर आला तेव्हां नाद्येझ्दाच्या सहवासांतच त्याला आपला मनस्ताप विसरतां आला. त्याचं त्याला देखील आश्चर्य वाटावं, इतका तो हळूहळू तिच्या आधीन झाला होता. स्टालिनची तब्बेत संभाळण्यांत नाद्ये-झ्दाचा बराच वेळ जात असे. कित्येकदां कारखान्यांत वेळेवर हजर न राहिल्यामुळें तिचं नांव ब्लॅकलिस्टमधें दाखल करण्यांत येत असे. मात्र " स्टालिनला मदत करण्यासाठीं मला घरीं रहावं लागतं " अशी तिनं अधिकाऱ्यांची समजूत काढली कीं तिला गुन्ह्याची माफी होत असे.

त्या दोघां पतिपत्नींची राहणी अगदीं साधी होती. विशेषतः स्टालिनच्या वागण्यांत कडक शिस्त दिसून येई. स्टालिन रशिआचा अजिंक्य वज्रपुरुष म्हणून नांवाजलेला असला किंवा अत्यंत कडक शिस्तीचा भोक्ता असला तरी नाद्येझ्दानं त्याचं " कोब्रा " असं लाडकं नांव ठेवलं होतं व त्या नांवानंच ती त्याला नेहमीं हांक मारी !

त्यांच्या सुखाच्या संसारांत एकच शल्य होतं, तें म्हणजे नाद्येझ्दाचा सावत्र मुलगा. या मुलापासून त्यांना पुष्कळच त्रास सोसावा लागत असे. स्टालिनच्या कडक शिस्तींतून 'याशा' सुटला नव्हता. परंतु वडिलांचा

एकहि गुण त्याच्या अंगीं नसल्यामुळें त्या शिस्तीचा कांहीं उपयोग होत नसे. याशाबद्दलच्या चिंतेचे ढग त्यांच्या सुखी संसारावर सतत पसरलेले असत.

‘ क्रेमलिन ’ राजवाड्यांतच चार दोन खोल्यांच्या अपार्टमेंटमध्यें नाद्येझ्दानं आपला संसार मांडला होता. खालच्या मजल्यावर एक हॉटेल होतं. तेथूनच जेवणाचे डबे ती मागवीत असे. हॉटेलचं अन्न इतकं बेचव असे कीं, एखाद्या माणसाला तें तोंडांतहि घालवलं नसतं. खोलींत सामानसुमान, फर्निचर होतं तें अगदीं साधं व जरुरीपुरतंच. समाज-सत्तावादाच्या ध्येयानुसार देशाची उन्नति खरोखरच घडवून आणावयाची असेल तर सुखासीन करणारे साधे ऐषआरामदेखील वर्ज्य मानणाऱ्या स्त्रियांपैकीं नाद्येझ्दा होती. म्हणून रशियाच्या सर्वाधिकाऱ्याची ती पत्नी असूनहि नाद्येझ्दाची राहणी अतिशय साधी होती आपल्या लहान लहान मुलांना ती स्वतःच संभाळीत असे. मुलं मोठीं झाल्यावर अर्थातच तिच्यावरची बरीच जबाबदारी कमी झाली. पण नाद्येझ्दानं नोकर माणसं कधींच ठेवलीं नाहींत.

क्रेमलीनच्या घरांत स्टालिनला भेटण्यासाठीं माणसांची सारखी ये जा सुरू असे व त्या दोघां पतिपत्नींना एकांतवासाचं सुख फारच क्वचित् मिळे. उन्हाळ्याच्या निमित्तानं तीं दोघें गॉर्की येथें जात तेव्हां मात्र त्यांच्या सुखांत कसलाच व्यत्यय येत नसे. गॉर्कीच्या मुक्कामांतले दिवस म्हणजे नाद्येझ्दाच्या आयुष्यातले अत्यंत सुखाचे! लेनिनच्या मृत्यूनंतर मात्र गॉर्की येथील बिऱ्हाड स्टॅलिननं मोडलं. जनानखान्यांत कोंडून ठेवावं त्याप्रमाणें गॉर्की येथें नाद्येझ्दाला स्टॅलिन कोंडून ठेवतो अशा कंड्या, खळबळ उडवणारी बातमी म्हणून कांहीं वर्तमानपत्रांनीं उठविल्या होत्या. परंतु कोणत्याहि सोव्हिएट स्त्रीच्या बाबतींत ही गोष्ट शक्य नाहीं. नाद्येझ्दा तर लग्नानंतरहि कारखान्यांत काम करणारी स्वतंत्र कामगार स्त्री होती. मॉस्को येथें न मिळणारं एकांतवासाचं सुख त्या दोघां पतिपत्नींना गॉर्कीच्या मुक्कामांत मनसोक्त मिळत असे हेंच खरं!

सोव्हिएट रशिआच्या स्त्री साम्राज्याचं नाद्येझ्दा एक प्रतीक होती.

स्टालिनची पत्नी म्हणून गौरवाची लालसा तिनं कधींच बाळगली नाहीं. आपण सोव्हिएट रशिआचा एक उपयुक्त घटक आहोंत या भावनेनं ती कार्य करीत राहिली. स्टालिनवरची तिची प्रीति व निष्ठा फार मोटी होती, व स्टालिननं तिला जें शुद्ध प्रेम दिलं त्यांतच आपलं सार्थक झालं असं ती मानीत असे. त्यांच्या वयांत बरंच अंतर असलं तरी त्यांचीं अंतःकरणं मात्र एकरूप झालीं होतीं. ज्यानं चोवीस तास कामांत व्यग्र राहिलंच पाहिजे अशा उद्योगशील, कर्तृत्ववान लोकोत्तर पुरुषाशीं तिचं लग्न झालं होतं. त्याच्या हातून तिची थोडी आबाळ होणं अपरिहार्य होतं; परंतु त्याबद्दल तिच्या तोंडून कधीं तक्रारीचा शब्दहि बाहेर पडला नाहीं. राष्ट्राच्या हितापुढं स्वतःच्या सुखदुःखांना कःपदार्थ लेखणारी ती एक खरीखुरी सोव्हिएट महिला होती!



ऑबिसिनिआची सम्राज्ञी

आयर्लेंडच्यां इतिहासांतील त्या क्रांतीच्या काळांत, वादळांत दोन पांखरांनीं बिलगून रहावें तशी जेनी व इमॉन एकत्रच राहिलीं. त्यांच्या वरचेवर ताटातुटी होत; परंतु त्यामुळें ती अधिक जवळहि येत. खवळलेल्या दर्यांत नौका सांवरावी तसं क्रांतीच्या धामधुमींतहि तिनं आपलं मोडकळीस आलेलं घर सांवरलं. या सतत झगडण्यामुळें ती अधिकच धीरोदात्त स्त्री बनली आहे व तिचे गडद सोनेरी केस अकाली शुभ्र झाले आहेत. परंतु तिचे पांढरे केस म्हणजे तिच्या त्यागाचं एक पवित्र चिन्हच नव्हे काय !

साऱ्या आयर देशांत जेव्हां क्रांतीचीं वादळं पसरलीं होतीं तेव्हां जेनी-इमॉनच्या खाजगी जीवनावरहि अनेक आपत्तीं ओढवल्या होत्या. त्यांच्या संसारांत पैशाची सतत ओढाताण असे. खाणंपिणं देखील सुग्रास मिळू नये अशा टंचाईत त्यांनीं दिवस काढले होते. त्यांतून लहानग्या मुलांचं संगोपन करण्याची जबाबदारी तिच्यावर होतीच. आयरिश लोक जात्याच समाधानी वृत्तीचे असल्यामुळें वाटेल ते काबाडकष्ट हसतमुखानं ते करूं शकतात. मुलांबाळांसाठीं व विशेषत: इमॉनसाठीं हालअपेष्टा सोसणं आपलं कर्तव्यच आहे असंच तिला वाटत असे. ज्या ध्येयासाठीं तिचे इमॉन झटत होते, त्या ध्येयप्राप्तीचा मार्ग असाच खडतर असणार हें ती जाणून होती. शिवाय या मार्गावर प्रवास करणारी ती एकटी थोडीच होती? तिच्याबरोबर तिचे हजारो देशबांधव प्रतिकूल परिस्थितीला धीरानें तोंड देत नव्हते काय? किंबहुना अशा आणीबाणीच्या प्रसंगीं कौशल्यानें संसाराची सारी जबाबदारी पार पाडण्यांत जेनीला अभिमान वाटत असे. परंतु जे धीरोदात्त असतात त्यांचीच कसोटी परमेश्वर पुनः पुन्हा घेत असतो. क्रांतीनंतरच्या दिवसांत तिच्या संसाराची घडी पुन्हा व्यवस्थित बसली खरी, पण आतां उरलेलं आयुष्य सुखांत घालवितां येणार या आशेनं ती निःश्वास टाकणार इतक्यांत अवघ्या सहा वर्षांपूर्वी तिचा ब्रायन नांवाचा वीस वर्षांचा तरुण मुलगा घोड्यावर रपेट करीत असतांना अपघात होऊन कालवश झाला. जिच्या अंतःकरणांत आपल्या मुलांचा अभिमान कांठोकांठ भरलेला असे, त्या जेनीनं हाही दुर्दैवाचा तडाखा धीरानं सोसला, परंतु या घटनेमुळं तिच्या मातृहृदयाला जी जबर जखम झाली ती कधींच भरून येऊं शकली नाहीं. जेनीवर

येऊ नयेत अशीं संकटं आलीं, पण ती कधी डगमगली नाहीं. पुत्र-वियोगाचें हें संकट मात्र बेसावधपणी कोणी पाठीमागून सुरा खुपसावा तसं तिच्या अंगावर अकस्मात् आलं, व कधींहि न डगमगणारी जेनी या संकटाखालीं एकदम खचून गेली.

मित्र–मैत्रिणी जमा करणं व समाजांत मिळूनमिसळून वागणं या गोष्टी मात्र जेनीला कधींच जमल्या नाहींत. एक तर तिच्या आयुष्यांतील ऐन बहारीचे दिवस क्रांतीच्या काळांत झगडण्यांतच गेले, व दुसरं असं कीं घरसंसार संभाळण्यांत तिला अशा गोष्टी करण्यास मुळीं सवडच मिळाली नव्हती. स्वतंत्र आयर देशाचे प्रेसिडेंट म्हणून जेव्हां इमॉन निवडून आले तेव्हां साहजिकच चहापार्ट्या देण्याघेण्याची जबाबदारी जेनीवर पडली. अशा वेळीं जेनीनं पुष्कळांजवळ बोलून दाखविलं कीं “ मला कांहीं हें जमत नाहीं. तेव्हां स्वतंत्र आयरनं अशा ऑफिशिअल कामासाठीं इमॉनला एक ‘ उसनी नवरी ’ अवश्य दिली पाहिजे नाहीं का ? ” थाटामाटाच्या मिरवणुकींत मिरवावं अगर मानसन्मान करून घ्यावा हें तिला कधींच रुचलं नाहीं. डी व्हॅलेराच्या आपण पत्नी आहोंत एवढ्यानंच इतर सामान्य स्त्रियांहून आपण कोणी विशेष प्रतिष्ठित ठरतों असं तिला कधींच वाटलं नाहीं. डी व्हॅलेरांना ती “ डेव्ह ” अशा लाडक्या नांवानं हांक मारते. डेव्हबद्दलचा अभिमान तिच्या मनांत ओतप्रोत भरलेला आहे, व त्यांचा एकेक पराक्रम पाहून तिला विलक्षण आनंद होतो. परंतु लोकप्रियतेच्या झगझगीत प्रकाशांत पदन्यास करतांच ज्या स्त्रियांना आपण एकदम उंच शिखरावर चढलोसं वाटतं त्या स्त्रियांपैकीं ती नव्हे.

१९३२ सालीं एका बड्या सरकारी समारंभांत तिनं भाग घेतला तेंच लोकांना तिचं झालेलं पहिलं सार्वजनिक दर्शन म्हणावं लागेल. या समारंभास दूरदूरच्या देशांतून पाहुणे आले होते. त्यांनीं या रहस्यमय स्त्रीला त्या वेळीं प्रथमच पाहिलं. त्यांच्या मनांत तिच्याविषयीं अमर्याद जिज्ञासा होती. आयरलँडच्या लोकांना मात्र ती एखाद्या रहस्यमय स्त्रीसारखी कधींच वाटली नाहीं. कारण ती सतत त्यांच्यांत मिसळत आली होती, व तीदेखील

त्यांच्यांतीलच आपण एक आहोंत अशा वृत्तीनं. आतांशा जाहीर व सार्वजनिक सभासमारंभांतून ती बरीच मोकळेपणी भाग घेते खरी, पण त्या गोष्टी शक्य तों टाळाव्या असा तिचा कल असतो. विशेषतः क्रांतीच्या कालांत ज्यांनीं ज्यांनीं इमॉनशीं वैर केलं त्या त्या व्यक्तींना ती शक्य तितकं टाळण्याचा प्रयत्न करते. त्या आठवणी जुन्या असल्या तरी अजूनी बुजलेल्या नाहींत. समाज वैर करतो तसं विसरतोहि पण जेनी तें विसरूं शकली नाहीं. अशा व्यक्तींकडून तिच्या मुलांना आतां अनेक सभासमारंभाचीं व मेजवान्यांचीं आमंत्रणें येतात. परंतु तीं आपल्या मुलांनीं स्वीकारूं नये याची खबरदारी ती प्रथम घेते. तिची मुलं अतिशय मनमिळाऊ व आनंदी असल्यानें तर अशा आमंत्रणांचा त्यांच्यावर नुसता पाऊस पडतो. पण "मुलांना वेळ नाहीं" या एका सबबीवर तीं सर्व आमंत्रणं न चुकतां परतवून लावण्याची ती दक्षता घेते. त्यांची राहणी अगदीं साधी आहे. तिचा संसार एवढा मोठा असला तरी तिच्या हाताखालीं फक्त एकच नोकर आहे. बाकी सारीं गृहकृत्यं ती स्वतःच करते. आयरच्या नेत्याची सहचारिणी या मोठेपणामुळें साहजिकच तिच्या लहानशा घरांत मोठमोठ्या विद्वान व नामांकित पाहुण्यांची सदा वर्दळ असते. आणि ही सारी बडी पाहुणे मंडळी तिच्या प्रेमळ आतिथ्याचा समाचार अगदीं मनमोकळेपणी घेतात. थोरांची सहचारिणी म्हणून नसता बडेजाव आणि मिरासदारी दाखविणं तिच्या स्वभावांतच नाहीं. किंबहुना त्यांच्या घरांतलं सारंच वातारण अति साधं आणि मनमोकळं वाटतं. इमॉन कोणी बडे प्रेसिडेंट असावे असं त्यांच्या साध्या वागण्यावरून वाटणार सुद्धां नाहीं. घरांतल्या या अत्यंत मनोरम वातावरणाचं सारं श्रेय अर्थात जेनीलाच दिलं पाहिजे.

जेनीच्या या सहकार्याची दखलगिरी जगानं कधीं घेतली नाहीं, व जेनीनं तशी कधीं अपेक्षाहिं केली नाहीं, किंवा त्यामुळं तिच्या जीवनाचा उत्साह कधीं आटला नाहीं. आपल्या पतीच्या प्रत्येक पराक्रमांत ती गुप्तपणें भागीदार होती, व त्यामुळें सार्वजनिक आयुष्यांतील वादळं तिनं पुष्कळ अनुभविलीं आहेत. परंतु खाजगी संसारांत पतिपत्नींचे तीव्र मतभेद कधीं झालेले नाहींत. डी व्हॅलेरांची एकनिष्ठ अनुयायी व सहकर्ती या नात्यानं

ती सतत वागली आहे. त्याच्या ध्येयाबद्दल व यशाबद्दल तिला संदेह कधींच वाटला नाहीं. अंगीकृत कर्तव्याचा रथ अगदीं वायुवेगानं सोडूनहि तोल संभाळणं म्हणजे अशक्य कोटींतील गोष्ट. परंतु हा अद्भुत पराक्रम आयर्लंडच्या या आदर्श कन्येनं करून दाखविला आहे.



मिसस एल्सी आइनस्टाईन

# ११.. एल्सी आइनस्टाइन

शास्त्रज्ञ पतीचा संसार संभाळणं म्हणजे गृहिणीपदाची खडतर कसोटीच होय. लेखक, कवि आणि राजकारणी पुरुष आपापल्या स्वतंत्र काल्पनिक जगांत भराऱ्या मारीत असले तरी त्यांचीं पावलं घराकडेच वळतात. आइनस्टाइनसारखे शास्त्रज्ञ पुरुष मात्र बाह्यत: या जगांत वावरत असले तरी त्यांचं तनमन शास्त्रीय विषयांतच गुंतलेलं असतं. नवीन शास्त्रीय शोध लावण्यांत, नवीन शास्त्रीय कोडीं सोडविण्यांत ते रात्रंदिवस गढलेले असतात. त्यामुळें जगाच्या व्यवहाराशीं त्यांचा संबंधच फारसा येत नाहीं, व तसा ते येऊहि देत नाहींत. असे शास्त्रज्ञ पुरुष संसारांत असूनहि नसल्यासारखेच असतात. शास्त्रज्ञ पुरुषाच्या संसाराचीच नव्हे, तर त्याच्या वैयक्तिक सुखसोईंचीहि सारी जबाबदारी त्याच्या पत्नीलाच घ्यावी लागते, प्रसंगी खाण्यापिण्याचा जुलूमहि अशा पतीवर पत्नीला करावा लागतो. लहानसहान गोष्टीहि त्याच्याकडून वेळोवेळीं करवून घ्याव्या लागतात. शास्त्रज्ञ पतीला माणसाळवण्याचं हें दिव्य आइनस्टाइनची पत्नी एल्सी हिच्या वाट्याला आलं आहे.

आइनस्टाइनचा प्रथम विवाह झाला तो शास्त्रीय विषयाचा अभ्यास करणाऱ्या एका युगोस्लाव मुलीशीं. बोलून चालून ती सायन्सची विद्यार्थिनी. संसाराची कला तिला कोठून अवगत असणार ? किंबहुना तीं दोघेहि विद्वान् असल्यामुळें एकमेकांशी जुळते घेण्याच्या वृत्तीचा त्या दोघांमधेंहि पूर्णपणें अभाव होता. संसारांतच नव्हे, शास्त्रीय विषयांसंबंधींहि त्या दोघांना एकमेकांचीं मतें पटत नसत, व आपलं म्हणणं दुसऱ्यासाठीं मागं घेण्याची कोणाचीच तयारी नसे. त्यामुळें विवाहानं तीं एकत्र येऊनहि एकमेकांपासून

दिवसेंदिवस दुरावत चालली. बौद्धिक क्षेत्रांत जोडीनं काम करू शकणारी सुशिक्षित सहचारिणी मिळूनहि संसाराचा असा बोजवारा उडावा यासारखे विलक्षण दुःख दुसरं कोणतं असू शकेल ? आइनस्टाइनच्या जागीं दुसरा एखादा असता तर या कौटुंबिक संकटाखालीं खचूनच गेला असता. परंतु आइनस्टाइन या व्यावहारिक जगांत राहात होता कुठं ? स्त्रियांचं क्षेत्र चूल व मूल हेच, अशी खात्री होण्यापलीकडे या संकटाचा आइनस्टाइनवर यत्किंचित्‌हि परिणाम झाला नाहीं. संसार सोडून इतर ध्येयाचा पाठलाग करणारी स्त्री गृहिणीपदाला नालायक असते असा सिद्धांत आपल्या संसाराच्या पहिल्या अयशस्वी प्रयोगावरून आइनस्टाइननं ठरवून टाकला होता.

म्हणून आइनस्टइननं उतारवयांत आपली आतेबहीण एल्सी हिच्याशीं द्वितीय विवाह केला तो वरील सिद्धांत लक्षांत ठेवूनच. एल्सीच्या सहवासांत बौद्धिक जाच होण्याची भीति नसल्यामुळें आइनस्टाइन निःसंकोचपणें तिच्याशीं विवाह करण्यास तयार झाला होता. एल्सी तर अगदीं पुरी पुरी संसारी स्त्री होती. आइनस्टाइनच्या कीर्तीवर किंवा विद्वत्तेवर ती भुलून गेली नव्हती. किंवा त्याच्या प्रथम पत्नीप्रमाणें त्याच्या शास्त्रीय व्यवसायांत सहकार्य करण्याच्या आधुनिक इर्षेनं ती विवाहबद्ध झाली नव्हती. अरसिक परंतु संसाराचा विलक्षण लोभ असणारी ती एक चतुर गृहिणी आहे. आइनस्टाइनसारख्या विरक्त शास्त्रज्ञालाहि एल्सीनं आपल्या चातुर्यानं संसारी पुरुष बनविलेलं पाहून मोठमोठ्या मानस शास्त्रज्ञांमध्यें तिची गणना करावी लागेल. तिची संसारदक्षता असामान्य आहे. आणि आपल्या व्यवहारशून्य शास्त्रज्ञ पतीला संसाराची शिस्त लावण्याचं तिचं चातुर्यहि असामान्य आहे. नवऱ्याला शिस्तीचे डोस एल्सीनं इतक्या खुबीनं पाजले कीं आपल्याभोवतीं संसाराचीं व शिस्तीचीं बंधनं पसरलीं आहेत याची जाणीवहि आइनस्टाइनला कधीं झाली नाहीं. तिचं व्यक्तिमत्व प्रभावशाली आहे खरं, परंतु दुसऱ्यावर किंवा प्रत्यक्ष पतीवरहि स्वतःच्या मतांचा व वर्तनाचा जुल्म होऊ नये याची ती दक्षता घेते. तिच्या करारी स्वभावांत पोलादाची कठीणता असली तरी त्याची घडण रेशमासारखी मृदु आहे. सहानुभूतीमुळें तिच्या अंतःकरणाला समजहि

फार मोठा आलेला आहे; व म्हणूनच त्यांच्या संसारात विरोधाची आणि वैषम्याची खरखर बिलकुल ऐकू येत नाहीं.

तिचं अंतःकरण मातेप्रमाणें उदार आणि प्रेमळ आहे. किंबहुना एखाद्या खोडकर दुराग्रही मुलाला ज्या मायेनं आई संभाळते त्याच मायेनं एल्सीनं आपल्या शास्त्रज्ञ पतीला आपल्या ताब्यांत ठेवलं आहे. जुलूमजबरदस्ती न करतां, हळुवारपणें आणि मोठ्या खुबीनं संसाराची सारी शिस्त तिनं आइनस्टाइनला लावली आहे. त्यांच्या वैवाहिक जीवनांत सनातनी संकुचितपणा नाहीं; आधुनिक अफाटपणा तर नाहींच नाहीं. कित्येकदां आइनस्टाइनच्या असामान्य बुद्धिवैभवानं एल्सीचे डोळे दिपून जातात. त्याच्या शास्त्रीय जगांत प्रवेश करणं तिला अशक्य असल्यामुळें ती पुष्कळदां गोंधळून जाते. परंतु तिच्या मनाचा तोल कधींहि ढळत नाहीं. आपल्या पतीच्या मनाजोगा संसार आपण थाटला पाहिजे हेंच आपल्या जीविताचं मुख्य ध्येय ती समजते. थोर पुरुषांना पुष्कळदां संसाराचीं बंधनें जाचक वाटतात हें लक्षांत घेऊनच अत्यंत निःस्वार्थीपणानं तिनं आपल्या पतीला तें स्वातंत्र्य दिलं आहे. त्यासाठीं तिला पुष्कळदां आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी, मतं, विचार बाजूला ठेवावे लागतात. नवऱ्याचं पायपुसणं न बनतां त्याच्याशीं जुळतं घेण्याची तिची ही प्रवृत्ति म्हणजे तिच्या निःस्वार्थी उदार अंतःकरणाचं एक द्योतक होय!

तिच्या या प्रवृत्तीमुळेंच आइनस्टाइनला तिनं आपल्या मुठींत ठेवलं आहे! कित्येकदां संसारांत असे बिकट प्रश्न उभे राहतात कीं ते सोडविण्याचं काम एल्सीसारखी व्यवहारचतुर सुज्ञ माणसंच करूं शकतात. शास्त्रीय विषयांतील गहन कोडी चटाचट सोडविणाऱ्या आइनस्टाइनचं बुद्धिवैभव अशा प्रसंगीं फिकं पडतं. आइनस्टाइन अशा वेळीं अगदीं भांबावून जातो. शास्त्रीय जगांत डोळे मिटूनहि त्याला स्वैरविहार करतां येतो; परंतु संसारांतल्या अडचणींच्या जाळ्यांतून मार्ग काढतांना एल्सीच्या आधाराखेरीज त्याला एकहि पाऊल टाकतां येत नाहीं. एल्सीच्या सल्ल्याखेरीज व घराच्या निवाऱ्याखेरीज आइनस्टाइनची स्थिति एखाद्या चुकलेल्या अनाथ बालकाप्रमाणें होते. त्याला नावडत्या आणि नापसंत असलेल्या गोष्टी

एल्सी मोठ्या खुबीनं टाळते. फालतू गप्पागोष्टी आणि मित्रमंडळीच्या भेटी-गांठी या प्रकारांनीं आइनस्टाइन चिडतो, म्हणून ते चुकविण्याचा ती कटाक्षानं प्रयत्न करते. अपघात टाळण्यासाठीं आगगाड्यांना किंवा मोटा-रींना पुढें एक बफर असतो ना, त्याप्रमाणेंच आइनस्टाइनच्या जीवनांत एल्सी म्हणजे एक ' बफर ' आहे ! जगाच्या धक्काबुकीचा सारा भार ती स्वत:वर घेऊन आइनस्टाइनला हवं तें मनःस्वास्थ ती मिळवून देते. अशा चतुर वर्तनानं एल्सीनं आपल्या पतीचं अंत:करण पूर्णपणें जिंकलं आहे. तिच्या पतीचा तिच्यावर अमर्याद विश्वास आहे. आपल्या पतीच्या अंत:करणांतलं आपल्या विषयीचं प्रेम आणि कृतज्ञता पाहिली कीं तिला धन्यता वाटते. पतीसाठीं जे अनेक तऱ्हेचे कष्ट आपण सोसले त्याचं असं सार्थक झालेलं पाहून कोणत्या गृहिणीला धन्यता वाटणार नाहीं ?

एल्सी आइनस्टाइन अतिशय कुशल व मनमिळाऊ वृत्तीची स्त्री आहे. आइनस्टाइनशीं तिचा पुनर्विवाह झालेला आहे. प्रथम विवाहापासून तिला फारसं सुख लाभलं नसलं तरी दोन मुली मात्र तिला झाल्या. प्रथम विवाहांतील खडतर जीवनामुळें तिच्या ठिकाणीं शहाणपण आलं होतं. त्यामुळेंच आइनस्टाइनच्या संसारांत सहानुभूतीचा जिव्हाळा ती आणू शकली. आइनस्टाइननं तिच्या सद्वर्तनाचं प्रेमळपणें चीजहि केलं. आपल्या संसाराची सारी जबाबदारी आइनस्टाइननं एल्सीवर व तिच्या दोन मुलींवर टाकलेली आहे. स्वत: आइनस्टाइनला प्रथम-पत्नीपासून दोन मुलगे झाले आहेत. स्वत:च्या या दोन मुलांपेक्षां एल्सीच्या दोन मुलींवर त्याचा जीव अधिक आहे. एल्सीच्या मुलीहि आइनस्टाइनला अतिशय मानतात. आइनस्टाइनच्या संसारांत खेळीमेळीचं प्रेमळ वातावरण पसरलेलं आढळतं. आइनस्टाइनचं चित्त सदा शास्त्रीय अभ्यासांत गुंतलेलं असतं. अणू-पर-माणूंच्या जगांत तो रमलेला असतो. एल्सीसाठीं व मुलांसाठीं कधीं कधीं या शास्त्रीय जगांतून पृथ्वीवर येणं त्याला भाग पडतं व म्हणून तो चिड-तोहि. परंतु हें संतापणं तात्पुरतंच असतं. भोंवतीं कामाचा पसारा पडलेला असला तरी जरूर त्या सांसारिक गोष्टी करण्यासाठीं तो तत्पर असतो. पुष्कळदां त्याला खाण्यापिण्याचं भान रहात नाहीं ही गोष्ट वेगळी. त्याचा हा स्वभाव

एल्सीला माहीत झाल्यामुळें अगदीं पाळत ठेवून ती त्याला जेऊं खाऊं घालते. कामाच्या माणसांनीं उपाशीं पोटीं रहावं हें तिला अगदीं पटत नाहीं. एल्सीचा हा खाण्यापिण्याचा जुलूम त्याला पुष्कळदां असह्य वाटतो, परंतु तिच्या प्रेमाखातर तो सहन करणं त्याला भाग पडतं.

वर्तमानपत्रांतल्या "पब्लिसिटीचा" आइनस्टाइननं मोठा धाक घेतला आहे. प्रसिद्धीचे सारे प्रसंग तो टाळतो. ते टाळतां न आले तर कित्येक दिवस त्याला काम सुचत नाहीं. त्याच्या मनाचं सारं स्वास्थ्य नाहींसं होतं. फोटो काढणारे कॅमेरावाले, कलावंत, शिल्पकार, चित्रकार वगैरेपासून एल्सीला त्याचं रक्षण करावं लागतं खरं; पण मनांत मात्र आइनस्टाइनच्या डौलदार मस्तकाचा तिला अभिमान वाटतो. आकर्षक आकाराचं, आणि कपाळावर उभ्या राहणाऱ्या कुरळ्या केसांनीं आच्छादिलेलं आपल्या पतीचं मस्तक या साऱ्या कलावंतांना अत्यंत योग्य मॉडेल होय अशी तिची खात्री आहे.

कांहीं वर्षांपूर्वी बर्लिन शहरीं तीं दोघं रहात असतांना एका अमेरिकन चित्रकाराकडून स्वतःचं चित्र काढून घेण्याचा तिनं आइनस्टाइनला आग्रह केला. चित्रासाठीं बसण्याचं आइनस्टाइननं कबूलहि केलं. मात्र एका अटीवर. अट अशी कीं, तयार झालेल्या चित्राच्या प्रती एकाहि वर्तमानपत्राच्या हातीं लागता कामा नयेत. वैयक्तिक आणि सामाजिक बाबतींतहि बायकोच्या हातानं पाणी पिणारा हा विद्वान् पाहून त्या अमेरिकन चित्रकाराला मोठी मौज वाटली. खरोखरच एल्सीला एखाद्या पोराप्रमाणें आपल्या विद्वान् पतीला संभाळावं लागतं. प्रसंगीं त्याला नीटनेटके कपडेहि तिलाच घालावे लागतात. इतका तो साऱ्या बाबतींत निष्काळजीपणें वागत असतो. ठरवलेल्या वेळेपेक्षां थोडा लवकरच तो अमेरिकन चित्रकार आइनस्टाईनच्या बिऱ्हाडीं दाखल झाला. एल्सीनं त्याचं स्वागत केलं. आइनस्टाइनच्या भेटीची वेळ होईपर्यंत ती त्या चित्रकाराशीं बोलत राहिली. आपल्या पतीनं अखेर चित्रासाठीं बसण्याचं कबूल केल्याबद्दल आपल्याला किती आनंद झाला हे तिनं त्याला सांगितलं. आइनस्टाइनच्या पन्नासाव्या वाढदिवसा-

निमित्त त्याच्या कवितांचा व सुभाषितांचा संग्रह त्याच्या मित्रांनीं प्रसिद्ध केला होता तोहि तिनं त्याला दाखविला. त्यांचं असं भाषण चालू असतांनाच आइनस्टाइनची स्वारी तेथें एकदम प्रगट झाली. अनवाणी पाय आणि अंगाभोवतीं फक्त टॉवेल गुंडाळलेला असा स्वारीचा अवतार होता. या प्रकारानं एल्सी मुळींच शरमली नाहीं. उलट ती आइनस्टाइनजवळ गेली आणि प्रेमळपणें त्याचा खांदा थोपटीत म्हणाली, " कपडे करून या ना. " आज्ञाधारक बालकाप्रमाणें आइनस्टाइन खोलीबाहेर गेला. त्याची पाठ फिरताच एल्सीनं सुटकेचा निःश्वास सोडला व कौतुकानं हसत त्या अमेरिकन चित्रकाराकडे वळून ती म्हणाली, " यांना संभाळणं म्हणजे महा कठीण काम आहे बरं ! "

चहाची वेळ म्हणजे आइनस्टाइनच्या घरांत भेटीगाठीची वेळ समजण्यांत येते. या वेळीं त्यांचं घर स्नेह्यासोबत्यांनीं गजबजलेलं असतं. या साऱ्यांचं एल्सी प्रेमानं स्वागत करते. तिच्या गोड वागण्यामुळें तिऱ्हाइतालादेखील त्या घरांत परकेपणा वाटत नाहीं. रोजचा हा चहाचा 'सार्वजनिक' समारंभ अगदीं साधा घरगुती थाटाचा असतो. भल्या मोठ्या चहाच्या टेबलापाशीं समोर एक भली मोठी चहाची केटली घेऊन एल्सी बसलेली असते. चहाबरोबर थोडा साधा फराळहि असतोच. कित्येकदां आइनस्टाइनची भेट घेण्याच्या आशेनं पाहुण्यांचे थवेच्या थवे या टेबलाभोंवतीं जमतात. आइनस्टाइन हळूंच या गर्दींत शिरतो. निमूटपणें टेबलावरचा चहाचा कप पितो आणि एखादा विशेष स्नेही भेटलाच तर त्याच्याशीं चार शब्द बोलण्यासाठीं कोपऱ्यांतल्या खुर्चीवर जाऊन बसतो. स्वतःच्या घरांत, स्वतःची मित्रमंडळी जमली असतांनाहि आइनस्टाइन एखाद्या तिऱ्हाइताप्रमाणें वागतो. गर्दींत वाट चुकलेल्या पोरासारखा तो भांबावून जातो. अशा वेळीं एल्सीच्या आधारासाठीं त्याची नजर आजूबाजूला फिरू लागलेली पाहून या विद्वान शास्त्रज्ञाची दया आल्याखेरीज रहात नाहीं. जगाच्या धामधुमीनें भांबावलेल्या त्याच्या मनाला एल्सीचा एकच मोठा आधार वाटतो.

आइनस्टाइन जात्या शांत वृत्तीचा आहे. परंतु संतापानं एकदा त्याचं

माथं भडकलं कीं तें शांत करण्याचं दिव्य एल्सीच करूं शकते. एकदां संध्याकाळच्या चहाच्या वेळीं आइनस्टाइनच्या स्केचवरून तयार केलेला एक फोटो घेऊन एक चित्रकार आइनस्टाइनच्या घरीं आला. त्या दिवशीं आइनस्टाइनची नातेवाईक मंडळीहि पाहुणी आली होती. एल्सी या मंडळीच्या आदरातिथ्यांत गुंतली होती. चहा घेण्यासाठीं आइनस्टाइन केव्हां खोलींत आला तेंदेखील कुणाला कळलं नाहीं. त्यानं मुकाट्यानं चहाचा पेला रिकामा केला, सँडविचहि गैरसावधपणें खाऊन टाकले. थोडा वेळ त्यानं अमेरिकेसंबधीं पाहुण्याशीं गप्पागोष्टी केल्या आणि मग त्या चित्रकाराकडे वळून फोटो दाखविण्याची त्यानं त्याला विनंति केली. चारपांच मिनिटं आइनस्टाइनन आपल्या फोटोकडे निरखून पाहिलं. फोटो त्याला पसंत पडला असावा. परंतु दुसऱ्याच क्षणीं तो खोलींतून नाहींसा झाला. एल्सीला आपल्या पतीच्या स्वभावाची चांगलीच ओळख होती. शेजारच्या खोलींतून चित्रविचित्र आवाज कानीं पडताच तिच्या ध्यानांत सर्व प्रकार आला. “ त्यांनीं काय चालवलंय माहित आहे मला ” असं म्हणत ती चटकन् उठली व त्या चित्रकारासह शेजारच्या लायब्ररीच्या खोलींत गेली. भिंतीवर आइनस्टाइनचं भलंमोठं तैलचित्र लावलं होतं. तें ओढून खालीं पाडण्याचा प्रयत्न आइनस्टाइनची स्वारी करीत होती. एल्सीला पाहतांच आइनस्टाइन ओरडून म्हणाला, “हें भिकारचित्र इथून काढून टाक म्हणून तुला हजारदां बजावलं मी. आतां मीच काढून टाकतों. आसपास घरांत कुठं माझ्या दृष्टीला पडलं तर चाकू घेऊन याच्या चिंधड्या करीन, लक्षांत ठेव.”

निमूटपणें एल्सीनं तें तैलचित्र खालीं काढलं आणि त्याच्या दृष्टीआड एका कोपऱ्यांत ठेवून दिलं. ताबडतोब आइनस्टाइनचा सारा संताप ओसरला आणि एखाद्या अपराधी मुलासारखा शरमलेला चेहरा करून तो मुकाट्यानं पुन्हा चहाच्या टेबलापाशीं गेला.

प्रवासांतदेखील आइनस्टाइनबरोबर एल्सी असतेच. तिच्याखेरीज तो सर्व बाजूंनीं लंगडा पडतो. ख्यातनाम पतीची पत्नी म्हणून जगाचे डोळे दिपविण्यासारखं तिचं रूपहि नाहीं व थाटमाटहि नाहीं. या बाह्य देखाव्यापेक्षां तिच्या पतीला तिची दक्षता अधिक आवडते. तिच्या प्रेमळ सहवासांत

लाभणाऱ्या विश्रांतीची त्याला अधिक गरज वाटते. प्रदर्शनानं भुलून जाण्याइतकी ती भोळी नाहीं. तिच्या बुद्धीमध्यें पोच आहे, ग्रहणशक्ति आहे. अमेरिकेला आइनस्टाइननं प्रथम भेट दिली तेव्हां अमेरिकेनं त्याचं जें प्रचंड स्वागत केलं त्यानं ती क्षणभर चकित झाली. पण समारंभानंतर ती थोड्या उदासीन वृत्तीनं म्हणाली, " कुस्ती जिंकून आलेल्या एखाद्या पहिलवानाचंहि स्वागत न्यूयार्क शहरांत इतक्याच थाटानं होईल."

परंतु नंतर कांहीं वर्षांनीं आइनस्टाइनच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त साऱ्या देशभर जी प्रचंड सत्काराची व सन्मानाची लाट उसळली त्यावरून अमेरिकेबद्दलच्या साऱ्या शंका एल्सीच्या मनांतून नाहींशा झाल्या व त्या सत्कारामागचा खरेपणा तिला पटला. हिटलरच्या जुलुमाला कंटाळून आइन्स्टाइन कुटुंबाला बर्लिनमधून गृहत्याग करून अमेरिकेला आश्रयासाठीं यावं लागलं. या प्रसंगीं अमेरिकेनं त्यांचं सर्वांचं जें अगत्यपूर्वक स्वागत केलं तेंहि ती कधीं विसरूं शकली नाहीं. इंग्लंड, सिंगापूर, पॅलेस्टाइन व साउथ अमेरिका या सर्व ठिकाणीं ती आपल्या पतीबरोबर प्रवास करून आली आहे. युरोपमध्यें आइनस्टाइननें व्याख्यानांचा दौरा काढला होता, त्या वेळींहि त्या पतिपत्नींनीं एकत्र प्रवास केला.

आइनस्टाइनचा व जगाचा जो थोडाफार संबंध येतो तो एल्सीमार्फतच. थोर पुरुषाच्या सहचारिणीला अवश्य असे सारे गुण तिच्या अंगीं आहेत. तिच्या संसारांत टापटीप व सौंदर्य आढळतं. ती स्वतः अत्यंत सुसंस्कृत, शहाणी व चाणाक्ष स्त्री आहे. लग्न झाल्या दिवसापासून एल्सीनं आइनस्टाइनची काळजी वाहिली आहे. त्याला सोबत केली आहे. त्याच्या जीवनांतल्या कष्टमय व भरभराटीच्या कालांतहि तो तिच्यावरच विसंबून होता. आतां जर्मनींतून हद्दपार व्हावं लागल्यामुळें तो स्वदेशाला व स्वबांधवांना कायमचा पारखा झाला आहे, व त्यामुळें पूर्वीपेक्षां अधिक ओढीनं तो एल्सीवर अवलंबून राहूं लागला आहे. जगाची निष्ठुरता त्यानं अनुभवली आहे. जग बदलेल. परंतु जिच्या प्रेमावर या विख्यात शास्त्रज्ञाचं जीवित अवलंबून आहे ती त्याची सहचारिणी एल्सी कधींच बदलणार नाहीं.



मिसेस एलेनॉर रूझवेल्ट

# १२ ... एलिनॉर रुझवेल्ट.

अमेरिकेची अद्वितीय महिला एलिनॉर रुझवेल्ट हिला अमेरिकेंत प्रेसि-डेंट रुझवेल्ट इतकंच मानाचं स्थान दिलं जातं. तिचा विलक्षण उत्साह आणि कार्यक्षमता पाहिली कीं पराक्रमी व उद्योगी अमेरिकेची ती एक प्रतीकच आहे असं वाटतं. तिच्या व्यक्तित्वाचं तेज उसनं नाहीं. आपल्या आप्तेष्टांसह तिनं मोठ्या एकोप्यानं राष्ट्रकार्य चालविलं आहे. अमेरिकेच्या राजकारणावर पुष्कळदां तिच्या तेजस्वी व्यक्तित्वाचा प्रभाव पडलेला आढळतो.

ज्या देशाकडे पाहून जगाच्या उज्वल भवितव्याबद्दल आशा वाटूं लागते अशा अमेरिकन देशांत एलिनॉरचा जन्म झाला. प्रगतीच्या व भरभराटीच्या मार्गावर उत्साहानं पावलं टाकणाऱ्या या राष्ट्राला जितका आधुनिकत्वाचा तितकीच परंपरेची हौस असावी हें नवल खरंच. कारण अमेरिकेला परंपरा नाहीं. परंपरेपासून उद्भवणारी, प्रगतिपथांत अडचणी आणणारी प्रतिगामी बंधनंहि नाहींत. परंतु परंपरेची उणीव अमेरिकन लोकांना तीव्रतेनं भासते ही गोष्ट मात्र खरी आहे. जुनं तें सोनं हें सुभाषित या उणीवेमुळेंच अमेरिकन लोकांना महत्वाचं वाटतं; व या जुन्या सोन्याचा आधुनिक धर्तीवर नवा दागिना करण्याकडे त्यांची प्रवृत्ति दिसून येते. परंपरेची उणीव अशा तऱ्हेनें अमेरिकन लोक भरून काढतात. अमेरिकन तरुणांच्या रक्तांतच प्रगतीचा आणि कार्यनिष्ठतेचा उत्साह सळसळत असतो. साऱ्या अमेरिकन तरुणांच्या या उत्साहाचं व ध्येयाचं प्रतीक म्हणजेच प्रेसिडेंट रुझवेल्ट यांची पत्नी एलिनॉर होय. विविध क्षेत्रांत एलिनॉरनं चालविलेलं अविरत कार्य पाहिलं म्हणजे वाटतं,

कीं प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या कामाचा अर्धा वाटा ती मोठ्या हौसेनं उचलीत आहे. नवराबायको अशी एकत्र काम करूं लागलीं कीं खटके उडणं अपरिहार्य असतं. परंतु रूझवेल्ट पतिपत्नी या नियमाला अपवाद आहेत. एकमेकाशीं भांडण्यांऐवजीं जुळतं घेण्याची त्या दोघांचीहि वृत्ति असल्यामुळें निरनिराळ्या क्षेत्रांत काम करीत असतांना त्यांचं कार्य एकमतानं व एकजुटीनं चालू असतं. प्रेसिडेंट रूझवेल्ट यांची कारकीर्द यशस्वी करण्यास आपण थोडा फार हात लावावा या हेतूनं एलिनॉरनं अनेक कार्यं हातीं घेतलीं आहेत. वैयक्तिक जीवनाप्रमाणेंच सामाजिक व राजकीय जीवनांतहि पतीच्या बरोबरीनं पत्नीनं भाग घेतला पाहिजे असं रूझवेल्ट पतिपत्नींचं मत आहे. जीविताच्या खेळांत आपण बरोबरीचे जोडीदार आहोंत असं त्या दोघांना वाटतं. एकमेकांच्या सहकार्याबद्दल त्यांच्या मनांत कधीं शंका आली नाहीं, अविश्वास वाटला नाहीं. विवाहबंधनानं एकत्र गुंफलेलं दोघांचं जीवन सर्वस्वी स्वबांधवांच्या व स्वदेशाच्या सेवेमध्यें घालवण्याच्या एकाच ध्येयाचं व्रत एलिनॉर आणि तिचा पति प्रेसिडेंट रूझवेल्ट या दोघांनीं स्वीकारलं आहे. आपल्या कार्याचं यशापयश पैशानं अगर कीर्तीनं ती दोघं मोजीत नाहींत. स्वबांधवांनीं प्रगतिपथावर टाकलेलं प्रत्येक पाऊल हेंच आपल्या अविश्रांत कार्याचं सार्थक होय असं त्या पतिपत्नींचं मत आहे.

एलिनॉर रुझवेल्ट ही थिओडोर रूझवेल्ट यांची पुतणीच असल्यामुळें प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या घरांतल्या चालीरीती तिला परिचयाच्याच होत्या. मात्र पुढं मागं आपण या घरांत मालकीण म्हणून नांदू असं स्वप्नांत देखील तिला वाटलं नव्हतं. श्रीमंत घराण्यांत जन्मल्यामुळें एलिनॉरचं सारं शिक्षण इंग्लंडमधे मादाम सुवे या बाईनीं चालविलेल्या एका शिक्षणसंस्थेत झालं. वयाच्या विसाव्या वर्षी तिनं स्वतःची म्हणून आपल्या मित्रमैत्रिणींना पहिली मेजवानी दिली, तिचा थाट तिच्या श्रीमंतीला साजेल असाच होता. न्यूयॉर्क शहरांतील प्रतिष्ठित समाजांत हा समारंभ गाजला होता. या समारंभानंतर एका वर्षांतच तिच्या लग्नाचा योग जुळून आला. परंतु या प्रसंगीं एलिनॉरचं मन थाटामाटांत व चैनींत रमूं शकलं नाहीं. जीविताच्या जबाबदारीची जाणीव दिवसेंदिवस वाढतच गेल्यामुळें एलिनॉरच्या

वृत्तींत विरक्तपणा आला होता. चहापार्ट्या, नाच, गाणें यांत आला तो दिवस चैनींत घालविण्याची फुलपाखरी वृत्ति तिच्या ठिकाणीं नव्हतीच. तिचं रूप सामान्यच होतं. नसलेलं सौंदर्य सौंदर्यसाधनांनीं मिळविण्याचा खटाटोप करण्यापेक्षां आपलं जीवन सत्कारणीं लावणं हेंच आपलं कर्तव्य होय असं तिला वाटत होतं. आपल्या रूपहीनतेचा तिला पुष्कळदां खेद वाटत असे. परंतु उथळ सौंदर्यापेक्षां अंत:करणाची श्रीमंतीच अधिक मोलाची ठरते हें तिला लवकरच कळून चुकलं. प्रत्येक व्यक्तीच्या शिरावर मानवजातीच्या ऋणाचा भार आहे व तो तिनं हलका केला पाहिजे अशी तिची समजूत असल्यामुळें तिनं आपल्या कर्तव्याचा मार्ग ठरवून टाकला व आपलं जीवित लोकसेवेसाठीं वाहून घेतलं.

एक विक्षिप्त स्त्री म्हणून एलिनॉर अमेरिकेंत गाजली होती. रूझवेल्ट अमेरिकेचे प्रेसिडेंट म्हणून निवडून आल्यावर साहजिकच तिच्या वर्तनावर चोंहोंकडून टीकेचा मारा सुरू झाला. प्रेसिडेंटची बायको म्हणून एलिनॉरनं फार तर चहापार्ट्या आणि मेजवान्या द्याव्या अशी लोकांची अपेक्षा होती. परंतु प्रेसिडेंटच्या कामांत तिनं ढवळाढवळ करावी हें त्यांना पटत नसे. बायकांची जागा सैंपाकघरांत, प्रेसिडेंटच्या ऑफिसांत त्यांचं काय काम ? सामाजिक मानमरातबाचा एलिनॉरला तिटकाराच आला होता. त्यांतून तिचं मन हळवं असल्यामुळें लोकांकडून मिळणारा मानहि नको व ती निंदाहि नको अशा वैतागानं तिनं आपलं सारं चित्त कामांतच गुंतवलं. हातीं येईल तें काम परिश्रमानें करावयाचं असा तिचा निश्चय होता. प्रेसिडेंटची बायको असल्यामुळें तिच्या कर्तृत्वाला क्षेत्रहि फार मोठं मिळालं व त्याचा फायदा घेऊन सामान्य जनतेच्या हितासाठीं व उद्धारासाठीं ती सतत काम करीत राहिली. लोकशाहीच्या खऱ्या प्रतिनिधीचं मुख्य कर्तव्य म्हणजे लोकसेवा असं तिचं मत आहे.

परंतु या स्वार्थत्यागी स्त्रीवरहि लोकनिंदेचे प्रहार झाले. जगाची तशी रीतच आहे खरी. तिनं रेडिओवर भाषण केलं तेव्हां प्रेसिडेंटची पत्नी म्हणून मिरविण्यासाठींच तें केलं असावं असा भलता गैरसमज लोकांनीं पसरविला. १९३३ सालीं रेडिओशीं तिनं करार केला व त्याबरोबरच

स्त्रियांच्या ट्रेड युनिअनला प्रत्येक आठवड्याला तीनशें डॉलरची देणगी देण्याचं वचन दिलं ही गोष्ट मात्र लोकांना माहीत नाहीं, किंवा असली तरी ती ते कबूल करणार नाहींत. समाजसेवेसाठीं एखाद्या सामान्य स्त्रीप्रमाणें प्रेसिडेंटच्या बायकोनं खपावं हेंसुद्धां कित्येक प्रतिष्ठित लोकांना पसंत नव्हत. कांहीं झालं तरी ती प्रेसिडेंटची बायको आहे. अमेरिकेंतील 'अद्वितीय महिला' असं मानाचं स्थान तिला लाभलं आहे. या स्थानाची प्रतिष्ठा तिनं अशा तऱ्हेनं घालवावी हें बरं नव्हे असं या लोकांना वाटत होतं. परंतु एलिनॉर सर्वांना सांगत असे की, सामान्य गृहिणींप्रमाणेंच मीहि एक गृहिणी आहे. मी 'अद्वितीय महिला' आहे असं मला वाटत नाहीं. माझे पति अमेरिकेचे प्रेसिडेंट निवडून आले आहेत. परंतु तें स्थान त्यांनीं स्वपराक्रमानं मिळविलं आहे. त्याविषयीं मला अभिमान वाटतो. परंतु त्यांच्या मोठेपणावर नुसती प्रतिष्ठा मिरविण्यापेक्षां त्यांची पत्नी म्हणून समाजकार्य करणं मला आवडतं. मी जें कार्य करीत आहे त्यामुळें त्यांची मानहानी होईल असं मला वाटत नाहीं.

प्रदर्शनासाठीं ठेवलेली संसारांतली एक बाहुली म्हणवून घेण्यास एलिनॉर तयार नव्हती. आतां प्रेसिडेंटची पत्नी झाल्यानंतर तर आपलं पहिलं व महत्त्वाचं कर्तव्य म्हणजे समाजसेवाच होय असं ती समजते.

आपल्या अंगच्या दोषांचीहि तिला जाणीव आहे. आपल्या दोषांची आपल्या मित्रमंडळीशीं ती अगदीं मोकळेपणानें चर्चा करते व ते दोष नाहींसे करण्याचा तिचा प्रयत्न चालू असतो. स्वतःचे दोष समजून घेऊन ते नाहींसे करण्याची तिची संवय अगदीं जुनी आहे. उदाहरणार्थ लहानपणीं ती अगदीं भित्री मुलगी होती. परंतु प्रयत्नानं आपल्या मनाचा भित्रेपणाचा दोष आतां तिनं पुरता नाहींसा केला असून शारीरिक किंवा मानसिक भीतीचा लेशहि तिच्या अंगीं उरलेला नाहीं. आपला आवाज थोडा कर्कश आहे हें तिनं जाणलं होतं. आवाज मृदु व्हावा यासाठीं ती अतिशय प्रयत्न करीत असे. आतां ती व्याख्यान देऊं लागली तर तिचा आवाज एके काळीं कर्कश होता अशी शंकाहि ऐकणाराला येत नाहीं. अत्यंत परिश्रमानं तिनं अमेरिकन जनतेचीं अंतःकरणं जिंकून घेतलीं

आहेत. प्रेसिडेंटच्या गृहिणीचा आदर्श नमुना म्हणजे एलिनॉर, अशा स्तुतीचीं सुमनं आज सारं अमेरिकन लोक तिच्यावर उधळीत आहेत.

लहानपणींच ती पोरकी झाल्यामुळें साहजिकच तिच्या अंगीं चिकाटीचा गुण प्रामुख्यानें दिसून येतो. आपल्या लहानग्या भावाचा संभाळ तिनं आईच्या ममतेनं केला. त्या बाबतींत एक क्षणभरहि आपली जबाबदारी ती विसरली नाहीं. भरभराटीस आलेला वकीलीचा व्यवसाय सोडून रुझवेल्ट राजकारणांत पडले त्यावेळीं साहजिकच त्यांना पैशाची टंचाई भासू लागली. या आपत्तीच्या काळांत एलिनॉर डगमगली नाहीं. टॉड हंटर प्रायव्हेट स्कूल या मुलींच्या शाळेंत मास्तरणीचं काम करून ती संसारास हातभार लावूं लागली. पुढें दुसऱ्या दोन स्त्रियांसह तिनं ही शाळा स्वतः चालवायला घेतली. १९१७ ते १९३२ पर्यंत आठवड्यांतून तीन दिवस इतिहास, राजकारण वगैरे विषयांवर ती वर्ग घेत असे. खेडेगावांतील उद्योगधंद्यास प्रोत्साहन देण्यासाठीं हाइडपार्कमधे तिनें एक दुकानहि उघडलं. इतर दोन स्त्रियांच्या मदतीनं एलिनॉरनं हें दुकान चालविलं आहे.

वृत्तपत्रव्यवसायाचीहि एलीनॉरला अतिशय आवड आहे. "माझा दिवस" या मथळ्याखालीं एका वर्तमानपत्रांत रोज एक कॉलम मजकूर ती नियमित लिहित असते. या मजकुराचे उतारे इतर अठ्ठेचाळीस वर्तमानपत्रांतून छापले जातात. "मुलें, नुसतीं मुलें" या नावाचें एक मासिक तिच्या संपादनाखालीं प्रसिद्ध होत असतं. रुझवेल्ट प्रेसिडेंट म्हणून निवडून आल्यावर साहजिकच एलिनॉरवर नवीं कामं व नव्या जबाबदाऱ्या पडल्या. या नव्या जबाबदारीमुळें आपले जुने व्यवसाय मोठ्या नाखुषीनें तिला सोडावे लागले. शाळेंत शिकविण्याचं तिनं बंद केलं. परंतु मासिकाचं संपादन मात्र तिला सोडविलं नाहीं.

जें कार्य हातीं घेतलं तें सर्व दृष्टींनीं समाजाला हितावह आहे अशी एकदां तिची खात्री पटली कीं मग ती सहसा लोकनिंदेची पर्वा करीत नाहीं. परंतु जाणूनबुजून लोकांच्या भावना दुखविण्याचा कठोरपणाहि तिच्या अंगीं नाहीं. लोकांच्या डोळ्यांत अंजन घालण्याचा प्रसंग आलाच

तर मात्र एलिनॉर तात्पुरती निष्ठुरता अंगीं आणू शकते. मारिअना अँडरसन या निग्रो गाणाऱ्या मुलीच्या बाबतींत तिला असंच एकदां कठोर व्हावं लागलं होतं. अमेरिकेंत वर्णद्वेष इतका भरला होता कीं या कलावंत निग्रो मुलीचा साऱ्या युरोपमध्यें गौरव झाला होता, परंतु अमेरिकेंत–तिच्या मातृभूमींत–ती केवळ निग्रो असल्यामुळें तिला जलसे करण्यासाठीं एकहि थिएटर मिळूं शकत नव्हतं. " डॉटर्स आफ दी अमेरिकन रिपब्लिक " हें गाण्याचं थिएटरहि मारिआनला मिळालं नाहीं. एलिनॉर या थिएटरची संस्थापक होती. डी. ए. आर. च्या सभासद स्त्रियांचा हा वर्णद्वेष पाहून एलिनॉरला मोठा धक्का बसला. तिनं ताबडतोब आपल्या सभासदत्वाचा राजिनामा दिला, व या थिएटरच्या जवळच्या आवारांत उघड्या माळावर मारिआन अँडरसनचा जलसा स्वतःच्या नेतृत्वाखालीं करून दाखविला. निग्रो आणि अमेरिकन लोकांचा प्रचंड समूह हा जलसा ऐकण्यासाठीं जमला होता. आब्राहाम लिंकनच्या भव्य पुतळ्याखालीं उभं राहून " माझा देश " ह्या संगीताचे गोड स्वर जेव्हां मारिआनच्या गळ्यांतून बाहेर पडूं लागले तेव्हां असंख्य निग्रो आणि अमेरिकन लोकांची अंत:करणं गहिवरलीं व डोळे ओलावून गेले. एलिनॉरच्या न्यायी वर्तनाचं ह्याहून मोठं बक्षीस दुसरं कोणतं असणार ?

तरुण स्त्री–पुरुषांच्या अंगचं सामर्थ्य, त्यांचा उत्साह, व त्यांच्या महत्त्वाकांक्षा, यांचं एलिनॉरला मोठं महत्त्व वाटतं. हे तरुण स्त्रीपुरुष राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत अशी तिची समजूत असल्यामुळें तरुणांची आबाळ म्हणजे देशाचा अधःपात होय असं तिला वाटतं. बेकार स्त्रियांचा प्रश्न तिला फार जिव्हाळ्याचा वाटतो. किंबहुना तरुणतरुणींना ज्या पद्धतीनं वागविलें जाईल, त्या पद्धतीवरच देशाचं बरं वाईट भवितव्य अवलंबून असतं याबद्दल तिची खात्री आहे. या तरुणतरुणींना निर्बुद्ध गुलाम किंवा सुसंस्कृत नागरिक बनविण्याची सारी जबाबदारी त्यांच्या पुढाऱ्यांवरच आहे. नेता जुलुमी असेल तर त्याच्या घातकी मार्गदर्शनाखालीं तरुणांची स्थिति मेंढरांसारखी होईल. योग्य मार्गदर्शन झालं तर हेच तरुण स्वदेशाचं व स्वबांधवांचं रक्षण करण्यासाठीं सामर्थ्य-

१०८

झाली बनतील. बेकारीचा प्रश्न केवळ आर्थिक स्वरूपाचा नाहीं, किंवा आर्थिक तडजोडीनं तो नाहींसा होण्यासारखाहि नाहीं. योग्य तऱ्हेचं शिक्षण व संगोपन यांच्या अभावामुळेंच हा प्रश्न इतका अवघड होऊन बसला आहे, अशी एलिनॉरची समजूत आहे. तरुणांच्या उद्धाराचं कार्य तिनं हातीं घेतलं आहे; व बेकारीचा प्रश्न सोपा करण्यासाठीं स्वावलंबनाचे धडे ती अमेरिकेच्या तरुणतरुणींना शिकवूं लागली आहे.

राजकारण म्हणजे देशाचं सामाजिक जीवनच होय असं तिला वाटतं. म्हणून समाजशास्त्र व मानसशास्त्र ह्या दोन्ही शास्त्रांचा तिनं अभ्यास केला आहे. ती स्वतः समाजवादी नाहीं, कम्यूनिस्ट तर नाहींच नाहीं. पण चमत्कार असा कीं, मजुरांची व कामगारांची गाऱ्हाणीं ऐकण्यासाठीं व ती दूर करण्यासाठी ती सतत त्या लोकांमधून फिरत असते. अमेरिकेंत वर्गभेद नाहीं म्हणतात. पण अशा अमेरिकेंतहि भांडवलशाही म्हणून एक वर्ग आहेच. ह्या वर्गातच एलिनॉर जन्मली असल्यामुळें भांडवलशाहीवर तिचा विश्वास असावा हें स्वाभाविकच आहे. किंबहुना संपत्तीचं उत्पादन करणाऱ्या मजूरवर्गाकडे संपत्तीचा वारसा कधींकाळीं दिला जाईल हें तिला अशक्य वाटतं. मात्र मजूर मालक न झाले तरी त्यांनीं सुखी असावे, व त्यासाठीं त्यांना भरपूर वेतन व बेताचं काम दिलं जावं याबद्दल तिचे सतत प्रयत्न चालू असतात. समाजवादावर तिचा विश्वास आहे. मालक व मजूर यांमध्यें शक्य तो सहकार्य उत्पन्न झालें पाहिजे. किंबहुना आर्थिक विषमता दूर करण्याचा एकच मार्ग हें सहकार्यच होय अशी तिची समजूत आहे. तिची ही विचारसरणी कित्येकांना सदोष वाटण्यासारखी असेल. परंतु मजुरांची परिस्थिति सुधारण्याचा या विचारसरणीमागचा तिचा हेतु कोणालाहि मान्य करावा लागेल.

एलिनॉरचा एक आकर्षक गुण म्हणजे तिचा करारी स्वभाव. अमेरिकन लोकांचं प्रेम तिनं जिंकलं तें आपल्या निगर्वी व साध्या वर्तनामुळेंच. लोकांचीं मनं जिंकण्यास सामान्यतः जीं साधनं लागतात, त्यांतील एकहि साधन तिच्यापाशीं नव्हतं. तिच्या ठिकाणीं सौंदर्य नव्हतं. सभाधीटपणा तर नव्हताच नव्हता. तिच्या संकोची वृत्तीमुळें तर ती अधिकच मागं पडली

असती. परंतु निसर्गाची अवकृपा असूनहि, केवळ हातीं घेतलेलं कार्य तडीस नेण्याच्या एका निश्चयी स्वाभावामुळें तिनं मानाचं व कीर्तीचं शिखर गांठलं आहे. शिवाय स्वदेशाविषयीं, व स्वबांधवाविषयीं तिच्या अंतःकरणांत आदर व प्रेम असल्यामुळें तिच्या हातून देशसेवेचं कार्य घडत आहे.

वृत्तपत्रव्यवसायांत एलिनॉरची बरीच मित्रमंडळी आहेत, या मित्रमंडळींत ती अगदीं मिळून मिसळून वागते. बहुतेक मित्रमैत्रिणी तिला 'एलिनॉर' म्हणूनच हाक मारतात. पुष्कळदां सभासंम्मेलनाच्या अध्यक्षस्थानासाठीं रुझवेल्ट मिळणं शक्य नसलं तर एलीनॉरलाच आमंत्रण देण्यांत येतं. "रूझवेल्ट कामांत आहेत म्हणता, मग एलीनॉर रुझवेल्ट येऊ शकतील काय?" असे फोन रूझवेल्ट यांच्या ऑफिसांत वरचेवर येत असतात. रूझवेल्टच्या राजकारणाबद्दल तीव्र नापसंती दाखविणाऱ्या एका स्त्रीनं एकदां असा उद्‌गार काढला कीं, "प्रेसिडेंट आणि त्यांचं तें राजकारण मला अगदीं पटत नाहीं; पण एलीनॉरची विचारसरणी मात्र मला खरी वाटते."

एलीनॉर स्वभावानं अत्यंत प्रेमळ आहे. ग्रेटब्रिटनच्या राजाराणीनं अमेरिकेला भेट देण्यापूर्वी त्यांच्या स्वागताची सारी तयारी तिनं आपल्या देखरेखीखालीं करवून घेतली होती. तिचीं पांच मुलं आतां मोठी झालीं आहेत. शिवाय युद्धांत पोरकीं झालेलीं तीन अनाथ अर्भकं तिनं संभाळलीं आहेतच. एक पोलीश रेफ्यूजीची मुलगी आहे. दुसरा एक बास्क मुलगा आहे. त्याचे आईबाप स्पेनमधे तुरुंगांत खितपत पडले आहेत. तिसरं मूल अवघं साडेचार वर्षांचं आहे. बॉम्बहल्ल्यांत तें पोरकं झाल्यामुळें एलीनॉरनं संभाळलं आहे. तिनं पाळलेल्या सर्व मुलांचे फोटो तिच्यापाशीं आहेत. तिच्या अंतःकरणांत जें असामान्य मातृप्रेम भरलं आहे त्यामुळेंच तिच्या हातून अशीं पुण्यकृत्यं घडत असावींत.

युद्धाचे खवळलेले घोडे आज या मैदानावर तर, उद्या त्या मैदानावर असा क्रूर धुमाकूळ घालीत आहेत. या युद्धांत आपल्या प्रियजनांची क्रूरता व हत्या थांबविण्यासाठीं साऱ्या स्त्रिया तळमळत आहेत, पण त्या

असहाय आहेत. अशा वेळीं मनाचा तोल सावरण्याकरितां कुणाचा तरी आधार लागतो. कुठें तरी आशेचा किरण दिसावा लागतो. हा आधार व आशेचा किरण म्हणजेच अमेरिका व अमेरिकेची आवडती एलीनॉर होय. प्रेसिडेंट रूझवेल्ट व त्यांच्या शेजारी उभी असलेली एलिनॉरची धीर गंभीर मूर्ति पाहिली कीं वाटतं या गांजलेल्या जगाचा उद्धार यांच्या हातीं आहे. युद्धाच्या खाईत ज्यांच्या प्रियजनांच्या आहुती पडल्या आहेत अशा दुःखी स्त्रियांच्या अंतःकरणांची हांक एलिनॉरला ऐकू आल्याखेरीज खचित राहणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

सोन्याचांदीचे व्यापारी, सराफ व जवाहिरे यांना

अत्यंत उपयुक्त नवें पुस्तक

# लघुरत्नपरीक्षा

लेखक : म. ल. खांबेटे, व्यापारी व वकील, जळगांव.

या पुस्तकांत सुमारें ६० रत्नांची शास्त्रीय माहिती दिली असून या रत्नांची परीक्षा कशी करावयांची याचीही अनुभवसिद्ध माहिती दिली आहे. तसेंच मोत्यांची घटना, जाती, रंग, तेज, उपयोग, गुणदोष, कृत्रिम व कल्चर मोती यासंबंधीं व्यवहारोपयोगी संपूर्ण माहिती दिली असून परिशिष्टांत मोत्यांचे रतीवरून चव काढण्याचीं कोष्टकें व रत्नांचीं इंग्रजी नांवें दिलीं आहेत.

किं. ३ रु., पोष्ट खर्च ४ आ. व्ही. पी. नें ३॥ रु.

प्रकाशक : स्कूल ॲण्ड कॉलेज बुक-स्टॉल, कोल्हापूर.

---

बुद्धिबळावरील अपूर्व ग्रन्थ

# बुद्धिबलक्रीडारत्नें

संपादक : ग. रं. कुलकर्णी, हळदीकर,

बी ए., एल्‌एल्. बी. वकील, कोल्हापूर.

या पुस्तकांत बुद्धिबल खेळासंबंधीं सर्व प्रकारची माहिती संशोधनपूर्वक दिली असून, सोडविण्यास उत्तरोत्तर अवघड असे शंभर डाव उत्तरांसहित दिले आहेत. हिंदी व इंग्रजी खेळांची पद्धत, नियम वगैरे सर्व प्रकारची उपयुक्त माहिती सविस्तर दिली असल्यानें नवशिक्यांसही पुस्तक अत्यंत उपयुक्त झालें आहे. तज्ज्ञांचे उत्तमोत्तम अभिप्राय.

किं. २। रु. ट. ख. ४ आ. व्ही. पी. नें. २॥। रु.

प्रकाशक : स्कूल ॲण्ड कॉलेज बुक-स्टॉल, कोल्हापूर.

# आमचें प्रकाशन.

## कादंबऱ्या

| | |
|---|---|
| तांबडी माती | बा. सी. मर्ढेकर |
| अंधारांतली वाट | बा. भ. बोरकर |
| काश्मिरी गुलाब | प्रो. फडके |
| कुलाव्याची दांडी | ,, |
| दौलत ( सं. आ. ) | ,, |
| रिकामा देव्हारा | खांडेकर |
| सुखाचा शोध | ,, |
| दिव्यचक्षु | कु. रत्नप्रभा रणदिवे |
| आंधळा न्याय | वि. वा. पत्की |
| समरांगण | म. भा. भोसले |

## लघुकथा

| | |
|---|---|
| दत्तक व इतर गोष्टी | खांडेकर |
| विद्युत्प्रकाश | ,, |
| पाकळ्या (२री आवृत्ति ) | ,, |
| परिस आणि लोखंड | शं. गो. गोखले |
| विश्रांति | प्रो. भा. म. गोरे |
| मकरंद | कमल दीक्षित |
| कोंवळीं किरणें | दि. द. पाटील |

## काव्य

| | |
|---|---|
| भिकारीण व इ.कविता | मंगसुळीकर |
| जीवनप्रभा | द. दा. पेंडसे |
| संसार | सौ. संजीवनी मराठे |

## संस्कृत

| | |
|---|---|
| द्विविभूतिचरितम् | रा. वि. गोखले |
| बलिदानम् | लाटकरशास्त्री |

## नाटकें व नाटिका

| | |
|---|---|
| तोतया नाटककार | प्रो. फडके |
| जडावाची देवी | ,, |
| आगलावी | ,, |
| विदुषी | ना. धों. ताम्हनकर |
| मंगळागौर | ,, |

## टीका, विनोद, चर्चा वगैरे.

| | |
|---|---|
| हिरवे कंदील | अनंत काणेकर |
| तुषार | प्रो. पंगु |
| आस्वाद | ,, |
| वाङ्मयविलास | माडखोलकर |
| वनभोजन | खांडेकर |
| धुंधुर्मास | ,, |
| प्रतिभासाधन ( ३री आ.) | प्रो.फडके |
| साहित्य आणि संसार (२री आ.) | ,, |
| मानसमंदीर | ,, |
| खांडेकर चरित्र आणि वाङ्मय | प्रो. मा. का. देशपांडे |
| कलेचीं क्षितिजें | प्रभाकर पाध्ये |

## इतर

| | |
|---|---|
| बुद्धिबलक्रीडारत्नें | इळदीकर |
| लघुरत्नपरीक्षा | म. ल. खांबेटे |
| अभिनयकला | मिरजकर |
| व्यायामाचा अभ्यास भाग १ | गुत्ते व गुरव |

**प्रकाशक : दा. ना. मोघे, कोल्हापूर.**

# आमचें अलीकडचें प्रकाशन

*
**

**तांबडी माती :** ( *कादंबरी* )

श्री. बा. सी. मर्ढेकर.

**संसार :** ( *काव्य* )

सौ. संजीवनी मराठे.

**तुषार :** ( *टीका* )

प्रो. द. सी. पंगु.

**हिरवे कंदील :** ( *लेख व भाषणें* )

प्रो. अनंत काणेकर.

**थोरांच्या सहचारिणी :** ( *चारित्रें* )

सौ. कमला फडके.

**गोकर्णीचीं फुलें :** ( *व्यक्तिरेखा व रसग्रहण* )

REFBK-0006512

**दा. ना. मोघे, कोल्हापूर.**

१०५७९

# ५ ॲबिसीनिआची सम्राज्ञी

ज्याची संस्कृति अत्यंत प्राचीन समजली जाते अशा ॲबिसीनिआ देशाची वैझरू मेनीन ही सम्राज्ञी आहे. इतर देशांतील महाराण्यांप्रमाणें ती नुसती नांवाची सम्राज्ञी नाहीं. बादशहा हेल सेलासी यांच्या बरोबरीनं तिचं स्वतंत्र स्थान व अधिकार आहेत. बादशहा आधीं कालवश झाले व त्यांचा मुलगा गादीवर बसला तरी सम्राज्ञी म्हणून तिचे आजचे सर्व हक्क पुढेंहि अबाधित राहतील. केवळ राजमाता म्हणून अधिकारशून्य सन्मान तेवढा तिच्या वांट्याला येणार नाहीं.

आफ्रिकेंतील साम्राज्याचा अखेरचा अवशेष ॲबिसीनिआ होय. त्याची परंपरा व इतिहास फार जुना आहे, आणि वैभव अपरंपार आहे. तेथील एकएक राजवाडा पाहिला कीं पुरातन ऐश्वर्याची साक्ष पटते.

" मेनेलिक " नांवाचा जो सर्वांत प्रेक्षणीय प्रासाद आहे, त्यांत जिकडे तिकडे काळाभोर संगमरवर वापरलेला आहे, व सर्व भिंती सोन्याच्या पत्र्यानं मढविलेल्या असून त्यांवर अत्यंत मूल्यवान शिंपल्यांचं नक्षीकाम केलं आहे. या इमारतीचं बांधकाम, तिची शिल्पकला इत्यादि, पाहतांच आफ्रिकेच्या पुरातन संस्कृतीचं सर्व वैभव या ठिकाणीं जतन करून ठेवलं आहे असं वाटतं. राजकुटुंबाचा थाटहि प्रासादाला साजेसाच आहे. ॲबिसीनिआच्याच पर्वतांतून पैदा झालेल्या सोन्याच्या पात्रांतून राजकुटुंबांतील मंडळी जेवतात खातात; आणि काटे चमचे जरी पाश्चात्य पद्धतीचे असले तरी त्यांच्या मुठी अत्यंत जुन्या व मूल्यवान हस्तिदंताच्या बनविलेल्या आहेत.

स्वरूपसुंदर राजकन्येला बळकावूं पाहणाऱ्या परीकथेंतल्या दुष्ट राक्षसा-

प्रमाणें मुसोलिनीची लोभी व क्रूर नजर ॲबिसिनिआवर पडली आणि स्वदेश सोडून परांगदा होण्याची पाळी ॲबिसिनीयाच्या सम्राट-सम्राज्ञीवर लवकरच आली. आपली मातृभूमि सोडतांना त्यांना झालेलं दुःख कल्पनातींत होतं. परंतु शूरांच्या वंशजाला साजेशा असामान्य धीरानं हेल सेलासी व वैझरू मेनीन यांनीं देशत्याग केला होता. परीकथेंतल्या त्या दुष्ट राक्षसाप्रमाणेंच मुसोलिनीचा विजय क्षणभंगुर ठरला. त्याची चढतीची घटका संपली आणि अखेर सम्राट व सम्राज्ञी यांचा अज्ञातवास संपून आतां तीं दोघेंहि परत आपल्या देशांत येऊन राहिलीं आहेत.

पतीप्रमाणेंच वैझरू मेनिन ही राणी शेबा व राजा सालोमन यांची वंशज असून ' हेब्रेक ' वंशांत सर्वांत जुन्या अशा फॅलाशा घराण्यांत तिचा जन्म झाला. ' अम्हेरिक ' जातीच्या स्त्रिया अंगानं स्थूल असतात, व लठ्ठपणा हें स्त्रीसौंदर्याचं एक लक्षणच समजलं जातं. या नियमाला वैझरू मेनिन कांहीं अपवाद नाहीं. ती थोडी ठेंगणी असून तिचा शरीरबांधा भरगच्च आहे. लठ्ठपणा हें जसं सौन्दर्याचं तसंच श्रीमंतीचहि लक्षण समजलं जातं. ऐषआरामांत लोळणाऱ्या व मिष्टान्नांचं भोजन करणाऱ्या श्रीमंत माणसांतच हा सौंदर्याचा गुण आढळणं शक्य आहे. वैझरू मेनिन तर ॲबिसीनिआची सम्राज्ञी ! काम करण्याचं तर राहिलंच, पण स्वतःच्या हातांनीं जेवण्याचे श्रम ती कधीं घेत नाहीं. तिला भरविण्याचं कामसुद्धां नोकरमाणसंच करतात.

मेजवान्यांचा बेत अर्थातच मोठा थाटाचा असतो, व परदेशी पक्वान्नांच्या धर्तीवर स्वदेशी पक्वान्न बनविलेलीं असतात. खाण्याजेवणाच्या बाबतींत त्या दोघां पतिपत्नींच्या फारशा आवडीनिवडी नाहींतच. मात्र पाश्चात्य पद्धतीनं तयार झालेले पदार्थ त्यांना विशेष आवडतात. 'मॅकरोनी' हा इटालियन पदार्थ त्यांच्या जेवणांत पूर्वी नेहमीं असावयाचा; परंतु इटालीशीं युद्ध पुकारल्यानंतर मात्र 'मॅकरोनी'ची त्यांच्या टेबलावरून कायमची हकालपट्टी झाली आहे.

वैझरू मेनिन रंगानं काळीसावळीच आहे, पण एखाद्या गौरवर्ण स्त्रीनं घ्यावी तशी ती आपल्या अंगकांतीची काळजी घेते. तिची अंगकांती

रेशमासारखी मऊ, निष्कलंक व नाजूक आहे. ती राजवाड्याबाहेर पडली कीं ऊन लागूं नये म्हणून तिच्या मस्तकावर तांबडी छत्री धरण्यासाठीं खास नोकरमाणसं तिनं ठेवलीं आहेत. हातापायांच्या नखांचीसुद्धां ती फार काळजी घेते. तिचीं नखं नेहमीं गुलाबी रंगानं रंगविलेलीं असतात, व ती बसली कीं मोहक चढाव घातलेल्या तिच्या पायांखालीं मखमलीच्या गिरद्या नोकर माणसं दक्षतेनं ठेवतात.

वैझरू मेनिन थोडी ठेंगणी असली तरी दिसावयास ती मोठी रुबाबदार व ऐटबाज आहे. ती नेहमींच ऊंची कपडे वापरते. रोजच्या दरबारासाठीं देखील ती पोषाख करते तो फार भारी किंमतीचा असतो. सोन्याचं जरीकाम केलेला व रत्नांनीं मढविलेला झगा, त्यावर अतिशय उंची रंगीबेरंगी शाल, व जाड, काळयाभोर केशसंभारावर रत्नजडित सुवर्णमुगुट असा तिचा दरबारी पोषाख ठरलेला आहे.

बादशाहा हेल सेलासीप्रमाणेंच वैझरू मेनिनचा स्वतंत्र दरबार भरत असतो. बादशहाच्या दरबाराइतकंच सम्राज्ञीच्या या दरबाराचं महत्त्व आहे. तिच्या या दरबारांत प्रधानमंडळ, सैनिक, हुजरे व विदूषक सर्व तिचे स्वतःचे आहेत. तिचा राजमुगुट व तिचीं राजरत्नं सर्वस्वी तिच्या स्वतःच्या ताब्यांत असतात. दरबाराची व या ऐश्वर्याची ती पूर्ण मालकीण असून, त्याच्या कारभाराची आणि रक्षणाचीहि जबाबदारी तिच्यावरच आहे. तिला किती तरी किताब देण्यांत आलेले आहेत. ‘ वैझरू मेनिन ’ या शब्दप्रयोगांतच मुळीं नुसतं तिचं नांव नसून एक किताबहि आहे. त्याचा अर्थ ‘ उच्चकुलोत्पन्ना ’ असा आहे. ‘ पुण्यशील न्यायदेवता महाराज्ञी ’ अशा आदरयुक्त घोषणेनं तिचे प्रजाजन तिचं स्वागत करतात. तिची सही व शिक्कामोर्तब ‘ अम्हेरिक ’ भाषेंत असतं व मोर्तबाचा अर्थ ‘ ज्यूडाच्या सार्वभौम सिंहाची अंकिता ’ असा आहे.

ॲबिसीनिआ हा मध्यपूर्वेंतील एक देश आहे, व त्या देशांतील लोकांच्या चालीरीती पौर्वात्य परंपरेला अनुसरून असाव्या हें साहजिक होय. परंतु वैवाहिक प्रश्नाच्या बाबतींत ॲबिसीनिआंतील कायदे व रूढी फारच आधुनिक वाटतात. घटस्फोट ही गोष्ट इतकी सामान्य झालेली आहे

कीं चाळिशी उलटलेल्या एखाद्या स्त्रीचे तीनचार घटस्फोट झाले नसतील तरच नवल ! कित्येक स्त्रिया मध्यवय झालं तरी लग्नाचा विचार करीत नाहींत. विवाहाचे अनेक प्रकार प्रचलित आहेत व सर्व प्रकारांत काडीमोड करण्यास परवानगी आहे. कसल्याहि समारंभावाचून व गाजावाजावांचून विवाह किंवा घटस्फोटहि उरकतां येतो. घटस्फोटामुळें कोणाचेंहि नुकसान होत नाहीं—स्त्रीचं तर मुळींच नाहीं. नवऱ्याच्या संपत्तीचाच नव्हे, तर लग्नांत मिळालेल्या अहेरांचा देखील अर्धा वांटा तिला मिळतो.

विवाहाचा सर्वांत साधा व सोपा विधि असा कीं, वर आणि वधू दोघांनीं गांवांतल्या कुणाही प्रतिष्ठित माणसापुढें उभं राहून म्हणावयाचं " मेनेलिकची शपथ घेऊन आम्ही एकमेकांचीं झालों आहोंत ". आणि घटस्फोटाची सगळयांत सोपी तऱ्हा अशी कीं, अशाच कोणा तरी प्रतिष्ठिता-पुढें उभं राहून त्यांनीं म्हणाययाचं, " आमचं पटत नाहीं; मेनेलिक मेला ! " वैझरू मेनिन ही देखील या नियमास अपवाद नाही. हेल सेला-शीशी लग्न करण्यापूर्वी तिनं दोन नवरे टाकून दिले होते.

' रासतफारी ' ( म्हणजेच हेल सेलासी ) यांच्याशीं तिचं लग्न १९१२ सालीं झालं. व आज तीस वर्षं त्यांचा संसार अत्यंत सुखानं चालला आहे याचं श्रेय बहुतांशीं त्यांना एकमेकांविषयीं वाटणाऱ्या बौद्धिक आद-राला व आकर्षणालाच आहे. युद्धापूर्वी तीं दोघं ॲबिसीनिआंत होतीं तेव्हां त्यांची नेहमींची खाजगी राहणी सामान्य सुशिक्षित व आधुनिक जोडप्यासारखी होती. दोघांच्याहि स्वभावांत सनातनी दुराग्रहाचा अभाव होता आणि नव्या कल्पनांची व मतांची आवड होती. मोटार, टेलिफोन, रेडिओ इत्यादि सर्व सुखसोयींचा तीं दोघं भरपूर उपयोग करतात; व दोघांनाहि ' अम्हेरिक ' प्रमाणेंच फ्रेंच भाषेतहि अस्खलित संभाषण करतां येतं. त्यांच्या मेजवान्यांचा थाट सर्वस्वी पाश्चात्य तऱ्हेचा असून, पाहुण्यांना विलायती मद्यं देण्यात येतात. सारांश, दोघांच्याहि खाजगी राहणीची एकंदर तऱ्हा सर्वस्वी युरोपिअन अमीर–उमरावासारखी आहे.

देशादेशांत मित्रत्वाचं नातं उत्पन्न करण्यासाठीं ' रेडिओ ' सारखं

प्रचाराचं दुसरं उत्कृष्ट साधन नाही हें त्या दोघानीं ओळखलं होतं. विशेषतः पाश्चिमात्य देशाशीं ॲबिसीनिआचं मित्रत्वाचं नातं असावं अशी त्या दोघांची इच्छा होती. पाश्चिमात्य शिक्षणपद्धति वैझरू मेनीन हिला फार आवडत असल्यानं, हेल सेलासीप्रमाणेंच, स्वदेशाचे व पाश्चिमात्य देशांचे संबंध निकट व्हावे म्हणून तिनं स्वतः खटपट केली होती. सुधारणा हें त्या दोघाचं ध्येय होतं, व तें ध्येय साधावयाचं असेल तर पाश्चिमात्य राष्ट्रांपासून पुष्कळच शिकतां येण्यासारखं आहे असं त्याचं मत होतं. ह्या मतांना व धोरणाला अनुसरूनच त्यांनीं आपल्या मुलाना वाढविलं आहे व त्यांचं शिक्षण युरोपिअन विश्वविद्यालयांतच झालं आहे.

युद्धापूर्वी ॲबिसीनिआचे विद्यार्थी उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला जात असत. फ्रान्स, जर्मनी येथील मोठमोठ्या विश्वविद्यालयांतहि ॲबिसीनिअन विद्यार्थ्यांची गर्दी असे. वैझरू मेनीनच्या वडील मुलीनं नुकताच ' परिचारिके ' च्या शिक्षणाचा कोर्स पुरा केला असून तिचं सर्व शिक्षण ' लॉसान ' व " चेशायर " येथील विश्वद्यालयांत झालं आहे. मुलीचं लग्न कसं जमेल असा विचार करणाऱ्या स्त्रियांपैकीं वैझरू मेनीन नाहीं. त्यामुळें ॲबिसीनिआतील इतर स्त्रियांप्रमाणें या राजकुमारीला संपूर्ण विवाहस्वातंत्र्य मिळालं आहे.

वैझरू मेनीन व हेल सेलासी याचा संसार सुखाचा असला तरी या दोघा पतिपत्नींत साम्यापेक्षा विरोधाचींच स्थलं अधिक सापडतील. हेल सेलासी अंगानं सडपातळ असून त्याचा चेहरा भावपूर्ण व हातापायांचा आकार अतिशय मोहक आहे. एखाद्या स्त्रीच्या रूपाप्रमाणें त्याचं स्वरूप नाजूक दिसतं. उलट वैझरू मेनिन स्त्री असूनहि एखाद्या पुरुषाप्रमाणें शरिरानं धष्टपुष्ट व बळकट वाटते. मानसिक दृष्ट्याहि त्या दोघांच्या वृत्तीमध्यें बराच विरोध आढळतो. हेल सेलासी अतिशय भावनाप्रधान, भीरु व दैववादी आहे वैझरू मेनीनसारख्या सामर्थ्यशाली स्त्रीचा पाठिंबा नसता तर इटालीच्या क्रूर सैनिकांना टक्कर देणं हेल सेलासीला कधींच शक्य झालं नसतं असा लोकप्रवाद आहे. हेल सेलासीची बुद्धि अतिशय कुशाग्र आहे, पण तो संपूर्ण बुद्धिवादी असल्यानं प्रत्यक्ष कृतीपेक्षां

साधकबाधक अशा विचारांतच गुरफटून जातो. पण वैझरू मेनीन तत्त्वापेक्षां व्यवहाराला महत्त्व देणारी स्त्री आहे. तिच्या विचारसरणींत मुत्सद्देगिरी व निर्भयता हे गुण प्रामुख्यानं आढळतात. हेल सेलासीला अशा स्त्रीचं सहकार्य लाभल्यामुळेंच त्याच्या शत्रूंना तो अजिंक्य वाटूं लागला आहे.

एकदां राणी झॉडिथी हिनं हेल सेलासी यांना तुरुंगांत टाकलं. त्यांची सुटका करण्यासाठीं अब्रुझीच्या ड्यूकनं बक्षीस दिलेल्या रणगाड्यानं वैझरू मेनीननं तुरुंगाचं प्रवेशद्वार उखडून टाकलं. दारावरचे पाहरेकरी तर हा प्रकार पाहूनच पळून गेले. रणगाडा प्रवेशद्वार मोडून आंत घुसला आणि अशा तऱ्हेनं वैझरू मेनिननं हेल सेलासीची मृत्यूच्या जबड्यांतूनच सुटका केली. वैझरू मेनीनचा हा प्रयत्न अत्यंत धाडसाचा खरा; पण तिच्या असामान्य मुत्सद्देगिरीचा तो निदर्शक होय.

जीवितांतील यशापयशांचा चक्रनेमिक्रम नेहमीं सुरूं असतो. ॲबिसीनिआ परकीय आक्रमणांतून मुक्त होण्याचा सुदिन लवकरच उगवेल. जगांतील सुधारलेल्या स्वतंत्र राष्ट्रांइतकी योग्यता स्वदेशाला मिळावी या आत्यंतिक इच्छेनं ज्या योजना वैझरू मेनीन मनांत आणील त्यांना आपल्या पतीच्या सहाय्यानं ती मूर्तस्वरूप देऊं शकेल. पूर्वेकडे साम्राज्य स्थापन करण्याची मुसोलिनीचीं स्वप्नं आतां विरून गेलीं आहेत; व ॲबिसिनिआच्या स्वातंत्र्याचा भाग्यरवि उदयास येणार आहे. ही नवी प्रभात कांहीं फार दूर नाहीं !



सिनोरा मुसलीनि

# ६ . . . . सिनोरा मुसलीनी

मुसलिनी म्हणजे एकेकाळचा इटलीचा अनभिषिक्त बादशहा. त्याचं वैभव रहाणीचा थाटमाट, त्याचा दरबार, सर्व कांहीं एखाद्या मोंगल बादशहाला-साजेसं होतं; आणि हा इतमाम जसा डोळे दिपविणारा, त्याप्रमाणेंच त्याच्या भोंवतीं सदैव फिरत राहणाऱ्या राजकीय उलाढालींच्या वावटळी तापदायक होत्या.

परंतु मुसलिनीची बायको राशेल हें वैभव आणि हा व्याप या दोहों-पासून सारखीच अलिप्त राहिली व निरलसपणें व निर्वेधपणें सामान्य संसारी जीवनांत तीं मग्न झालेली होती. आणि हें तिचं संसारी जीवन देखील आधुनिक स्त्रीला साजेसं मुळींच नव्हतं. तिला मुळीं आधुनिक असं विशेषण कोणत्याहि अर्थानं लावतां येणार नाहीं. संसाराला जर गलबताची उपमा दिली तर असं म्हणतां येईल कीं, पुढची वाऱ्याला तोंड देणारी बाजू तिनं सर्वस्वी मुसलिनीकडे सोपविली आणि मागच्या बाजूला तिनं स्वतःसाठीं छोटीशी निवाऱ्याची निवांत जागा तयार केली होती. तिच्या स्वतःच्या जीवनाचा आणि मुसलिनीच्या पराक्रमी चरित्राचा कांहीं एक संबंध नाहीं.

या निवाऱ्याच्या जागेच्या झरोक्यांतून ती कधीं कधीं बाहेरच्या जगा-कडं पहात असेल; पण जगांत आज जिकडे तिकडे पाशवी अत्याचारांचा जो डोंब उसळला आहे तो दृष्टीस पडतांच एखाद्या लहान बालकाप्रमाणें भेदरून ती मागं होत असेल. बेनिटो मुसलिनीच्या खऱ्या जीवनक्रमा-पासून ती इतकी दूर आहे, कीं आज तिच्या देशावर जी आपत्ति कोसळली आहे तिचा दोष सर्वस्वी मुसलिनीकडे आहे याची जाणीवहि तिला नाहीं. त्याच्या राजकीय व सामाजिक जीवनाविषयींची तिची वृत्ति नेहमीं बेफिकीर

असते व यामुळेंच कदाचित् मुसलिनीशीं संसार करण्यांत तिला सुख मिळत असावं !

जें जें घडेल तें तें पहावं एवढाच तिचा जीवनहेतु होऊन बसला आहे. तिच्या संसारांत बाहेरच्या जगांतील घडामोडींना मुळींच स्थान नाहीं. किंबहुना जगांतील प्रश्न सोडविण्यातकं शिक्षण व समज तिच्या ठिकाणीं नसल्यामुळें, राजकारणाच्या भानगडींत ती कधींच पडली नाहीं. बेनिटो इटलीचा सर्वाधिकारी [ डिक्टेटर ) झाला, व साऱ्या जगाचं लक्ष त्याच्याकडं वेधलं गेलं. परंतु त्याची पत्नी राशेल मात्र पूर्वी होती तशीच एक साधी गृहिणी राहिली. प्रेमळ माता व कर्तव्यदक्ष पत्नी या तिच्या भूमिकेंत यत्किंचितहि बदल झाला नाहीं. किंबहुना हीं दोन कर्तव्यं यशस्वीपणें पार पाडण्यांतच स्त्रीजन्माचं सार्थक आहे अशी तिची समजूत आहे. या दृढ समजुतीवरच राशेलनं आपल्या वैवाहिक जीवनाचा मनोरा उभारला असून, त्या कर्तव्यापासून ती कधींहि च्युत झालेली नाहीं. पराक्रम व कर्तृत्व हेंच पुरुषाचं ध्येय; व चूल आणि मूल हेंच स्त्रीचं कार्यक्षेत्र असलं पाहिजे; स्त्रीपुरुषांच्या या ध्येयांची अदलाबदल मुळींच होतां कामा नये अशी तिची विचारसरणी असल्यामुळें बेनिटो मुसलिनीच्या यशापयशाचं श्रेय अगर अपश्रेय ती कधींच स्वतःकडं घेत नाहीं. मुसलिनीच्या राजकीय भूमिकेचं मर्म जाणण्याची शक्ति राशेल हिला असती तर त्याच्या सार्वजनिक जीवनापासून इतकं अलिप्त राहणं तिला कठीण गेलं असतं. बेनिटोच्या मनाची गुंतागुंत इतकी गहन, व त्याच्या महत्त्वाकांक्षेची भरारी इतकी उंच, कीं राशेलच्या साध्याभोळ्या बुद्धीला त्याचा अंदाज लागणं शक्य नव्हतं. बेनिटो आपला प्रियतम पति आहे व त्याची सारी काळजी आपणच वाहिली पाहिजे हेंच एक कर्तव्य तिच्या अंतःकरणाला ठाऊक असल्यामुळें बेनिटोच्या सर्वाधिकारीपणाचं तकलुपी वैभव तिनं कटाक्षानं टाळलं.

एखाद्या सामान्य स्त्रीप्रमाणें ती संसार संभाळते; व गृहकृत्यं आटोपल्यावर बेनिटोची वाट पाहते ! राजकारणांतील कुटिल नीतीला कंटाळलेल्या बेनिटोच्या मनाला राशेलच्या सहवासांत अनेकदां शांति मिळालेली आहे, सामान्यांना सुलभ, परंतु लोकोत्तर पुरुषांना दुर्मिळ असं हें संसारसुख

त्याला राशेलजवळ लाभलं आहे. स्वदेशाची व स्वबांधवांची सेवा हें मुसलिनी आपलं कर्तव्य समजतो. पण राशेला हिला एकच कर्तव्य माहीत आहे. तें म्हणजे आपल्या पतीची व मुलांची सेवा !

बेनिटोपेक्षां अधिक प्रामाणिकपणें व अधिक स्वार्थत्यागानं ती आपलं कर्तव्य पार पाडीत असल्यामुळें, तिची योग्यता निःसंशय अधिक मोठी वाटते. स्वतःच्या कर्तव्यपालनाचा गाजावाजा करणं, प्रदर्शन मांडणं या गोष्टी तिला माहित नाहींत. हातीं घेतलेलं कार्य पुरं करण्याची दुर्दम इच्छाशक्ति मात्र तिच्या ठिकाणीं आहे. आपला स्वार्थत्याग व आपल्या शिरावरचा संसाराचा भार अधिक मोठा आहे असा विचार तिच्या मनांत आला असतां तर तिनं पत्करलेला जीवनक्रम तिला खडतर व कष्टमय वाटला असता. परंतु मीपणाचा लेशहि तिच्या ठिकाणीं नसल्यामुळें हा स्वार्थत्याग व हे कष्ट तिला सामान्य वाटतात. ते करण्यांत आपण मोठा पराक्रम केला अशी बढाई ती कधींच मारीत नाहीं; किंवा निराशेमुळें उत्पन्न होणाऱ्या वैतागानं तिच्या हातून ते कष्ट घडतात असंहि नव्हे. अशा समतोल वृत्तीमुळेंच पतीच्या सार्वजनिक जीवनापासून दूर राहूनहि तिचा संसार सुखाचा झाला आहे. बेनिटोच्या पराक्रमाच्या व कीर्तीच्या तेजानं तिचा संसार कधीं उजळला नाहीं हें खरं; परंतु त्याच्या दुष्कृत्यांची काळी अशुभ छायाहि कधीं त्यावर पडली नाहीं. प्रेमळ स्त्रिया आपलं स्वतःचं छोटं जग निर्माण करतात. राशेलनंहि आपल्याभोंवतीं आपलं लहानसं स्वतंत्र जग निर्माण केलं आहे.

राशेला ॲगोस्टिनीचा जन्म एका गरीब शेतकऱ्याच्या कुळांत झाला. पोटासाठीं कष्ट करण्याचा खडतर धडा वयाच्या अवघ्या पांचव्या वर्षापासूनच ती गिरवूं लागली. ती आठ वर्षांची असतांना तिचे वडील कालवश झाले. परंतु या अल्पवयांतहि घरचीं सारीं कामं तिला करावी लागत. गुरांचं चारापाणी पाहणं, घराची साफसफाई करणं व शेजारच्या ओढ्याचं पाणी घडे भरून वाहून आणणं अशीं सारीं कामं ती करीत असे. त्या काळीं इटलीच्या शेतकऱ्यांच्या मुलींची स्थिति हिंदुस्थानांतल्या शेतकरी मुलींपेक्षां कांहीं फारशी चांगली नव्हती. अल्पवयांतहि कष्ट करून संसा

राचा आर्थिक भार कांहीं अंशानं तरी उचलण्याची जबाबदारी त्या मुलींवर पडत असे. अर्थात् आर्थिक स्वातंत्र्यासाठीं कष्ट करणाऱ्या स्त्रियांचं तें युग नसल्यामुळें त्या स्त्रियांना लग्न करून संसार थाटण्याची आवड होतीं, मुलाबाळांची हौसहि होती. पोटासाठीं कष्ट करणं भागच होतं म्हणून त्या स्त्रिया कष्ट करीत, पुरुषांशीं समान हक्क गाजविण्याच्या ईर्षेनं नव्हे.

बेनिटो मुसलीनी या सोशालिस्ट तरुणाची व राशेलची प्रथम भेट झाली तेव्हां राशेल अवघी सतरा वर्षांची होती. "प्रिडापिओ" येथील म्हणजे तिच्याच गांवांतील लोहाराचा तो मुलगा. त्याची आई शाळेंत मास्तरीण असल्यामुळें त्याचं थोडं फार शिक्षण झालं होतं. राशेलच्या विधवा आईच्या मदतीनं बेनिटोच्या वडिलांनीं एक लहानसं हॉटेल उघडलं व राशेल साहजिकच तेथें कामाला जाऊं लागली. खरं पाहतां हें हॉटेल बायकांनींच चालवलं होतं. कारण गिऱ्हाइकांशीं गप्पा मारणं व जुगार खेळणं एवढींच कामं बेनिटोचे वडील करू शकत. कामगार, मजूर, अशा लोकांची सोय या हॉटेलमध्यें चांगली होत असे. एके दिवशीं अचानक मुसलिनीची स्वारी या हॉटेलमध्यें हजर झाली. राजकीय चळवळीबद्दल स्वित्झर्लंडमधून त्याची हकालपट्टी झाल्यामुळेंच त्यानं हॉटेलचा आश्रय घेतला होता.

बेनिटोनच्या मुक्कामांत हें हॉटेल म्हणजे राजकारणाच्या चर्चेचा अड्डाच होऊन बसलं होतं. राजकारणाची आवड असलेलीं लहान मोठीं माणसं चर्चा करण्यासाठीं व विशेषत: मुसलिनीचीं जहाल भाषणं ऐकण्यासाठीं तेथें जमत. राशेल एक नोकर मुलगी! तिच्या कानावर हीं संभाषणं नेहमीं पडत व त्यांचा अर्थ तिच्या बुद्धीला उमगत नसला तरी मुसलिनीच्या भाषणांतला आवेश व उन्माद तिला फार आकर्षक वाटत असे. एक लहानशीं पोर यापलीकडे मुसलिनीच्या मनांत तिच्याविषयीं दुसरी भावना नव्हती. परंतु तिच्या अंतःकरणांतल्या भावनांचा शोध त्याला लवकरच लागला.

"तूं बेनिटोला आपल्या मनांतून काढून टाक. त्याच्याशीं लग्न करून तुला कधींच सुख मिळणार नाहीं, शांति लाभणार नाहीं. त्यापेक्षां आगगाडी-

खालीं उडी टाकून जीव दिलेला बरा " असं बोलून प्रत्यक्ष मुसलिनीच्या वडिलांनींच राशेलला सावध करण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणाच्याहि विरोधाला न जुमानता अखेर राशेल बेनिटोशीं विवाहबद्ध झाली.

युद्धाच्या धामधुमीचा काळ सोडला तर विवाहानंतरची दहा वर्षं त्या दोघांनीं फार सुखांत काढली. बेनिटो आतां " अव्हान्ति " या वर्तमानपत्राचा संपादक झाला होता, व राजकारणांत त्यानं आपलं स्थान हळुहळू स्थिर केलं होतं. आशा, निराशा, काळजी यांचे घाव तो सहन करीतच होता. मात्र याच धडपडींतून पुढें इटालीचा सर्वाधिकारी होण्याचा मान त्याला मिळावयाचा होता. या काळांतच त्याचीं पहिलीं तीन मुलं जन्मास आलीं. आईला राजकाणाचं वावडं असल तरी एडा, ब्रूनो, व्हिटोरिओ, हीं बेनिटोचीं तिन्ही मुलं ध्येयाच्या व पराक्रमाच्या बाबतींत वडिलांच्या वळणावर गेलीं आहेत.

मुसलिनीला घडलेला तुरुंगवास व इतर कांहीं बरे बाईट प्रसंग सोडले तर राशेलच्या आयुष्यांतला सर्वांत सुखाचा असा हाच दहा वर्षांचा काल होय. या कालांतहि बेनिटोच्या मनाला शांति नव्हतीच. परंतु दुसऱ्यांना गुलाम करण्याच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेचं वेड त्याच्या डोक्यांत शिरलं नव्हतं. राशेल त्याच्या हुकुमाची ताबेदार होती; त्यांत तिला भूषणहि वाटत असे; व कुटुंबांतल्या सर्व मंडळींनीं बेनिटोच्या आज्ञेंत राहिलं पाहिजे याविषयीं ती काळजी घेई. कारण त्याच्याविषयींचा तिचा अभिमान फार मोठा होता. आपल्या संसारांत ती अगदीं रंगून गेली होती.

मुसलिनीच्या मनांत उसळलेली महत्त्वाकांक्षा, कर्तृत्वाची इच्छा व प्रचंड धडपड ती कधींच ओळखूं शकली नव्हती. त्यामुळें आपल्या पतीच्या हातून साऱ्या जगाचं लक्ष वेधून घेणाऱ्या घटना घडतील व जगांतील चारदोन लोकोत्तर पुरुषांत त्याची गणना होईल अशी तिला कल्पनाहि नव्हती. साधी भोळी, सरळ मनाची शेतकऱ्याची पोर ती ! तिच्या कल्पनेची धाव ती केवढी असणार ! बेनिटोच्या आयुष्यांत ज्या गोष्टी पुढें घडून आल्या त्यांचं भविष्य तिला कोणी आधीं सांगितलं असतं तर तिचा त्यावर विश्वासच बसला नसता. परंतु ती जेव्हां आपल्या लहानशा जगांत

सुखानं वावरत होती त्याच वेळीं मुसलिनी इटलीच्या भवितव्याची बीजं पेरीत होता. राशेलचा संसार निर्वेधपणं चालू होता. कारण तिला कसलीच कल्पना नव्हती.

पतीच्या सार्वजनिक जीवनापासून अलिप्त राहूनहि तिनं त्याची सेवा केली; व तिच्या या वृत्तीमुळेंच बेनिटोलाहि तिच्या सहवासांत सुख लाभलं. त्याच्या राजकीय मतांविषयीं ती कधीं वादविवाद करीत नसे. त्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टींबद्दल ती कधीं असंतोष अगर विरोध दर्शवीत नसे. त्यामुळें तिच्या सहवासांत त्याच्या शिणलेल्या मेंदूला एका निराळ्याच पवित्र शांतीचा लाभ होत असे. राशेल जवळ असतांना वेगळ्याच जीवनाचा त्याला अनुभव येई. या जीवनांत मानसिक टोचणी नव्हती, किंवा स्वार्थी प्रेमाचा अंशहि नव्हता. बेनिटोचं व्यक्तिमत्व केवढं प्रचंड आहे याची मुळीं जाणीवच राशेलला नव्हती.

१९२२ सालीं मुसलिनीनें रोमवर हल्ला केला आणि त्या वेळींच राशेलच्या दहा वर्षांच्या सुखी संसाराचं स्वप्न संपलं. बेनिटोनं वारंवार घर सोडून जावं याचा तिला फार खेद वाटे. परंतु त्याबद्दल तिनं त्याला कधीं प्रश्न केला नाहीं; किंवा हट्टहि धरला नाहीं. मुसलिनीभोंवतीं जीं चळवळीचीं भयंकर वाहळं पसरलीं होतीं त्यांत सामील होणं तिच्या शक्तीपलीकडचं होतं म्हणून तिनं संसारांतच विरंगुळा मिळविला व मुसलिनीच्या आगमनाची ती वाट पहात राहिली. फासिस्ट चळवळीच्या स्वतःच बनविलेल्या रेशमी गळफासांत डिक्टेटर मुसलिनीची मान पुरतीच अडकली होती व त्या पतिपत्नींत फारच मोठं अंतर उत्पन्न झालं होतं. राजांचीं व युवराजांचीं कळसूत्री बाहुलीं मर्जीप्रमाणें नाचवणं, प्रधानमंडळं बनविणं व मोडणं अशा राजकारणांत मुसलिनी रात्रंदिवस मग्न असे. परंतु राशेल मात्र सामान्य मध्यमवर्गीय इटालियन स्त्रीचं जीवन कंठीत होती. बेनिटोच्या हातीं इटलीचे सर्वाधिकार आले म्हणून ती कांहीं मोठ्या प्रासादांत राहूं लागली नाहीं. पूर्वीप्रमाणेंच आपला साधासुधा संसार एक दोन नोकरमाणसं ठेवून ती संभाळीत असे. मुलांना शाळेंत पोंचविण्यासारखीं साधीं कामं देखील ती स्वतःच करीत असे. आपण कोणी लोकोत्तर पुरुषाची बायको

आहों असा गर्वाचा विचार देखील त्या साध्या जीवाला कधीं शिवला नाहीं.

त्या दोघां पतिपत्नीमध्यें खूप मोठं अंतर उत्पन्न झालं असलं तरी त्यांच्या जीवितांत अशी एक गोष्ट आहे कीं, जीमुळें त्यांचं प्रेम अजूनहि अभंग राहिलं आहे. ही गोष्ट म्हणजे त्यांचीं मुलं. त्या दोघांचंहि, विशेषतः मुसलिनीचं आपल्या मुलांवर अतिशय प्रेम आहे. त्यांचा संसार व राशेलचं सुख मुसलिनीच्या या वात्सल्यामुळेंच अभंग राहिलं आहे. मुसलिनीची वडील मुलगी एडा तर अगदीं आपल्या बापाच्या वळणावर गेली आहे. तिच्या शिक्षणाविषयीं व इतर बाबतींतहि राशेलच्या मतांचा उपयोग होत नाहीं. कारण बारा वर्षांची झाल्यापासूनच एडा अगदीं स्वतंत्र तऱ्हेनं वागूं लागली आहे. राशेलचे धाकटे दोन मुलगे तर अगदीं सळसळत्या रक्ताचे तरुण आहेत. फासिस्ट तरुणांच्या संघटनेंत ते आतां सामील झाले असून, मोठ्या उत्साहानं व धैर्यानं वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून ध्येयाचा मार्ग आक्रमीत आहेत. ॲबिसीनिआच्या युद्धांत या दोघांहि मुलांनीं भाग घेतला होता. रणक्षेत्रावर जाण्यापूर्वीं त्यांना निरोप देतांना राशेलचं अंतःकरण दुभंगून गेलं. परंतु विरोधाचा शब्द तिच्या मुखांतून बाहेर पडला नाहीं. आयुष्यभर ज्या प्रचंड व्यक्तित्वापुढें तिनं मान वाकविली होती त्यालाच या वेळींहि तिला शरण जावं लागलं.

निःशस्त्र व असहाय्य ॲबिसिनियन लोकांवर क्रूरपणें बॉम्बहल्ला करून राशेलच्या वडील मुलानं आपल्या अंतःकरणाचा कठोरपणा जगाच्या निदर्शनास आणून दिला. 'बापसे बेटा सवाई' हें सुभाषित त्यानं खरं करून दाखविलं.

१९२७ नंतर राशेलनं आणखी दोन अपत्यांना जन्म दिला. एडा, ब्रूनो व व्हिटोरिओ आतां तिच्या घरट्यांतून उडून गेलीं आहेत. तेव्हां या दोन अजाण मुलांवरच राशेल आपल्या वात्सल्याचा वर्षाव करीत असते. छोटी ॲना मारिआ मुसलिनीची फार लाडकी मुलगी आहे. पतिपत्नींचीं दुरावलेलीं मनं जवळ ओढून आणण्यास ॲना मारिआचं दुखणंच कारणीभूत झालं. या दुखण्यांत मुसलिनीनं आपलं सारं काम सोडून दिलं होतं, व ॲनाच्या बिछान्यापाशीं तीं दोघं सारखी बसून राहिलीं होतीं

अशा आणीबाणीच्या क्षणीं बेनिटो जवळ असावा या एका गोष्टीनंच आपल्या निःस्वार्थी प्रेमाचं सार्थक झालं असंच राशेलला वाटलं.

राशेल ॲगोस्टीनी ही एका शेतकऱ्याची मुलगी. " The Collar of Anunzita " हा सर्वांत उच्च किताब देऊन इटलीनं मुसलिनीचा गौरव केल्या दिवसापासून ती डोना राशेल ' सम्राटाची भगिनी ' या उच्च पदांवर चढली. परंतु पंचवीस वर्षांच्या वैवाहिक जीवनांत प्रथम पत्नी व नंतर माता एवढेच बदल तिच्यात झाले. स्वतःच्या साध्या संसारांत तिला सामाधान लाभलं आहे. बेनिटोभोंवतीं नेहमीं गर्दी करणाऱ्या सुशिक्षित व श्रीमंत स्त्रियांची बरोबरी करण्याचा तिनं कधींच प्रयत्न केला नाहीं. तिच्या जीवितांत जे बदल, ज्या घडामोडी व जे कांहीं बरे वाईट प्रसंग आले त्यांना तिनं धैर्यानं तोंड दिलं. तिच्या जीवितावर ज्यांची सत्ता चालली अशा दोनच गोष्टी आहेत. तिच्या पतीचा अधिकार व तिच्या साध्या भोळ्या तत्त्वज्ञानांतील आशावादित्व !

जीविताच्या राजमार्गानं प्रवास करण्याऐवजीं राशेलनं अगदीं एकाकी अशा लहानग्या पायवाटेनं प्रवास केला आहे, व या प्रवासांतहि इतरांच्या क्वचितच वाट्याला येणारं समाधान तिला लाभलं आहे. पतीच्या शेजारीं बसून विजयाच्या रथांत तिला मिरवितां आलं असतं; परंतु जगाच्या राजकारणांत यशस्वी वीराच्या उन्मादानं प्रवेश करणाऱ्या मुसलिनीकडं अभिमानानं दुरूनच पहावं असं तिला वाटलं. आपल्याभोंवतीं फिरणाऱ्या राक्षसी आशानिराशेपासून तिनं आपल्या लहानग्या संसाराचं रक्षण केलं आहे. हें तिचं लहानगं जग तिच्यापासून कोणीच काढून घेणार नाहीं. मुसलिनी तर नाहींच, परंतु इतरांनाहि तें शक्य नाहीं. सुखाच्या व कीर्तीच्या मृगजलाचा पाठलाग करणाऱ्यापेक्षां तिचं ज्ञान खचित अधिक समजलं पाहिजे. बेनिटोच्या मोठेपणामुळें स्वतःला प्रसिद्धि मिळावी असा लोभ तिच्या ठिकाणीं उत्पन्न झाला असता तर फुकट स्तुति करणाऱ्या भक्तांचा मेळावा स्वतःभोंवतीं गोळा करणं तिला सहज शक्य झालं असतं. परंतु दुसऱ्या कोणाच्या कीर्तीचीं उसनीं पिसं लावून मिरवणं तिच्या वृत्तीला

कधींच पटण्यासारखं नव्हतं. त्यामुळें पतीच्या ऐश्वर्यापासून दूर असा निराळाच मार्ग तिनं आखला व ती एक साधी गृहिणी बनली. परंतु हा साधेपणा म्हणजेच एक आदर्श मोठेपणा नव्हे काय ? आपल्या नवऱ्याची व मुलांची काळजी वाहणं हा एकच तिच्या जीवनाचा हेतु आहे. स्वतः-विषयीं एकच विधान तिनं जाहीरपणं केलं आहे. "बेनिटोची सेवा माझ्याच हातून घडावी यांतच माझा सारा आनंद साठलेला आहे."

# ७ . . . . . कार्मेन फ्रँको

कारमेन फ्रँकोच्या चरित्राचं एकेक पान उलटूं लागलं कीं, तिच्या जीवनावर फासीझमचा केवढा परिणाम झाला आणि फासिस्ट सत्तेखालीं स्त्रियांना पूर्वीच्या जुन्या सरंजामी युगांतल्याप्रमाणेंच पुरुषांच्या ताबेदारींत कसं रहावं लागतं या दोन्ही गोष्टी पर्यायानं आपल्या दृष्टीला स्पष्टपणें पडतात. स्पेन देशाच्या गेल्या कांहीं वर्षांचा इतिहास रक्तानं माखलेला आहे. या क्रांतीच्या कालांत स्पेनच्या सामान्य स्त्रिया लोकसत्ताक सैन्यांत दाखल होऊन एकीकडे लढत होत्या, तर दुसरीकडं सेनापति फ्रँकोची बायको सर्व राजकीय घडामोडीपासून दूर राहून सुखविलासाचं आयुष्य कंठीत होती.

स्पेनमध्यें ज्यांची नांवं सगळ्यांच्या तोंडी असलेली दिसतात अशा दोन स्त्रिया आहेत. एक जनरल फ्रँकोची बायको कारमेन व दुसरी तेथील जनतेच्या चळवळीचा पुढाकार घेणारी ला पॅशनारा. दोघीहि विख्यात खऱ्या; परंतु त्यांच्या स्वभावांत व कार्यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. ला पॅशनारा जितकी उद्योगी तितकीच कार्मेन आळशी व सुखलोलुप आहे. कार्मेनचा जन्म एका श्रीमंत खानदानी घराण्यांत झाला. तिचं शिक्षण व लालन-पालनहि त्या इतमामाला साजेल अशाच थाटांत झालं. उलट ला पॅशनारा ही एका खाणींतल्या मजुराची मुलगी. जें कांहीं शिक्षण तिनं मिळविलं तें महत्प्रयासानं परिस्थितीशीं सतत झगडून! तिचं लग्नहि लवकरच झालं व मुलाबाळांनीं तिचा प्रपंच आता वाढला आहे व स्पेनच्या असंख्य जनतेच्या उद्धारासाठीं व उन्नतीसाठीं तिनं चालविलेलं अविरत कार्य व त्यामागची तिची तळमळ यामुळेंच तिचं नांव आज ज्याच्या त्याच्या तोंडी झालं आहे. स्पेनच्या जनतेच्या हृदयांत आदराचं स्थान मिळविणारी ही ला पॅशनारा अगदी साधी स्त्री आहे. दिसायला ती थोडी प्रौढ असून तिच्या मुद्रेवर शांत तेज पसरलेलं असतं. मात्र व्यासपीठा-



कार्मेन फ्रँको

वरून ती बोलूं लागली कीं, तिच्या जहाल वक्तृत्वाच्या आवेशानं तीं भाषा न समजणाराहि मंत्रमुग्ध होऊन जातो. उलट प्रत्यक्ष स्वतःच्या नवऱ्याच्या हातीं स्पेनच्या जनतेचं नशीब आहे याची पूर्ण जाणीव असून-हि कार्मेनच्या मनाला त्या जनतेविषयीचा विचारहि कधीं शिवत नाहीं. त्यांच्या हालअपेष्टा तिला दिसत नाहींत. त्यांच्या आर्त मागण्या तिला ऐकूं येत नाहींत. स्वबांधवांसाठीं तळमळीनं कार्य करीत राहणारी साधी ला पॅशनारा कोणीकडे ! आणि स्वदेशाच्या दुर्दशेकडे डोळेझांक करून ऐषआरामांत राहणारी विलासिनी कॉर्मेन कोणीकडे !

फासिस्ट जुलुमाविरुद्ध स्पेनच्या नव्या राजकीय पक्षानं चळवळ सुरू केली तेव्हां लोकशाहीच्या सर्व पुढाऱ्यांना ला पॅशनारा ही एखाद्या स्फूर्ति-देवतेप्रमाणें भासूं लागली. ला पॅशनाराचं कार्य सतत चालूं होतं. वेळ-प्रसंग बाका आला कीं ती तेथें हटकून हजर रहात असे. जनरल फ्रँको तर या राजकीय वादळांत सांपडला होताच. परंतु त्याची पत्नी कार्मेन मात्र या लढ्यापासून पूर्णपणें अलिप्त राहिली होती. पतीच्या जीविताच्या सुरक्षिततेबद्दल सतत काळजी वाहण्यापलीकडे कार्मेनचा त्याच्या धाडसी जीवनक्रमाशीं कांहींहि संबंध नव्हता. किंबहुना फ्रँकोच्या हातून घड-णाऱ्या कृत्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल तिच्या मनांत कधीच विचार येत नसे. त्याच्या हातून जें जें घडेल तें योग्यच अशी तिची दृढ अंधश्रद्धा असल्या-मुळें ती निशं:क राहू शकली. पतिप्रेमानं तिचं अंत:करण अथांग भरलं असल्यानं तीं रात्रंदिवस त्याच्या सुरक्षिततेची चिंता करीत राही. परंतु तिच्या अंतःकरणांत स्वदेशप्रेमाला जागा नव्हती. किंबहुना आपल्या पतीच्या उत्कर्षापुढे तिला स्वदेशाच्या हितानहिताची काळजी करावी असं कधी वाटतहि नसे. उलट ला पॅशनाराचं उदार अंतःकरण स्पेनच्या असंख्य दुर्दैवी प्रजेसाठीं सतत तळमळत होतं. तिच्या विचारांना वैय-क्तिक स्वार्थाची मर्यादा कधींच नव्हती. डोना कार्मेन आपल्या पतीसह मानाच्या स्थानावर बसली आहे खरी; परंतु हा गौरव व हें मानाचं स्थान स्पेनच्या असंख्य प्रजेचं स्वातंत्र्य पायाखालीं तुडवून फ्रँकोनं मिळविलं आहे ही गोष्ट विसरतां येत नाहीं. छिन्नविच्छिन्न अशा मातृभूमीवर पतिसमवेत

अधिकार गाजविण्यांत तिला कसलीच खंत वाटत नाहीं. उलट जिनं आपल्या देशावर प्राणापलीकडे प्रेम केलं व जी त्याच्या उद्धारासाठीं सतत झटत राहिली त्या ला पॅशनाराला आज स्पेनमधून हद्दपार करण्यांत आलं आहे. आपल्या मायदेशाला आणि खाजगी संपत्तीला ती आता कायमची पारखी झाली आहे.

अशा गोष्टी घडतांना पाहिल्या कीं, जगांत न्याय उरलाच नाहीं असं वाटल्यावांचून रहात नाहीं. जिच्या अंतःकरणाला स्वबांधवांच्या अश्रुपातानं व रक्तपातानं यत्किंचितहि पाझर फुटला नाहीं त्या स्वार्थी कार्मेनच्या वाट्याला आज गौरवाचं व मानाचं स्थान यावं, व जिनं आपल्या देशबांधवासाठीं सतत परिश्रम केले, स्वातंत्र्याचा लढा लढविला, व जी त्यांच्या स्फूर्तीचं स्थान ठरली, त्या ला पॅशनाराच्या नशिबीं मात्र स्वदेशत्यागाचा प्रसंग यावा हा कोणता न्याय म्हणावयाचा! स्वबांधवांच्या कल्याणासाठीं क्रूसावर प्राणत्याग करणाऱ्या येशूनं म्हटलं आहे, " जग जिंकण्यासाठीं आत्म्याचा सौदा करणारांना समाधान लाभणार नाहीं." जगांत घडणाऱ्या अन्यायाचा विसर येशूच्या या शब्दांनींच पडण्यासारखा आहे.

डोना कार्मेनच्या या वृत्तीबद्दल तिला दोषी ठरविणं फारसं उचित होणार नाहीं. गरीब व श्रीमंत, अज्ञानी व सुसंस्कृत या दोन वर्गांमध्यें जें मोठं अंतर त्या काळच्या समाजरचनेमुळें पडलं होतं त्या अंतरामुळेंच कार्मेनची वृत्ति अशी बनत गेली. किंबहुना स्पेनप्रमाणेंच इतर देशांतील चळवळीसहि हेंच अंतर कारणीभूत झालं यांत शंका नाहीं. आर्थिक परिस्थितींतूनच हें अंतर उत्पन्न झालं व वाढत गेलं. हें अंतर ठेवण्यांत व तें वाढूं देण्यांत श्रीमंत व सुशिक्षित लोकांचा मतलब होता. समाजांतील असंख्य गरीब लोक अज्ञानाच्या व दारिद्र्याच्या गर्तेंत जोपर्यंत खितपत पडले आहेत तोंपर्यंत श्रीमंतांच्या या मतलबाविरुद्ध चळवळ करणं त्यांना शक्य नाहीं ही गोष्ट श्रीमंत लोक पुरती जाणून होते. त्यामुळें कोट्यवधि अज्ञानी व दरिद्री जनता व भांडवलशाही यामध्यें पसरलेलं अंतर कमी न होतां वाढतच जात होतं. कार्मेन पोलो मार्टिनेझ म्हणजे आतांची डोना फ्रँको ही एका श्रीमंत घराण्यांत जन्मली व लहानाची

मोठी झाली, व त्यामुळें बहुजन समाजाशीं तिचा संबंधच येऊं शकला नाहीं. तिच्या तोलाच्या मुलींना मिळावं तसंच शिक्षण तिला मिळालं. लिहिण्यावाचंण्याबरोबरच शिवण्या–टिपण्यासारख्या इतर कलाकुसरीहि तिला येऊं लागल्या. थोडी फार गाण्याची आवड तिच्या ठिकाणीं उत्पन्न झाली. हें सर्व होत असतांनाच भावी काव्यमय संसाराची सुख–स्वप्नं तिला पडूं लागलीं असल्यास नवल नाहीं ! मात्र हें सर्व होत असतां तिच्या देशांतील बहुजन समाजाच्या सुखदुःखाविषयीं ती अंधारांतच राहिली. सौंदर्यलोलुपता, आणि काव्यमय प्रेमानं भरलेलं सुखासीन आयुष्य या गोष्टी तिच्या पांचवीलाच पूजलेल्या होत्या. ती ज्या उच्च दर्जाच्या समाजांत वावरत होती तें एक समाजव्यवस्थेचं कणखर कवच होतं खरं, परंतु त्याच्या आंत भोंवतालची परिस्थिति पाहून अंतर्बाह्य खवळलेल्या अनेक स्त्रीपुरुषांचीं अंतःकरणं असमाधानाच्या आगीनं धुमसत होतीं या गोष्टीची जाणीव तिला कधींच झालीं नाहीं. जीवितांतल्या असल्या धकाधकीच्या गोष्टी स्त्रियांनीं फार तर दुरून पहाव्या, त्यांत त्यांनीं प्रत्यक्ष भाग घेण्याचं कांहींच प्रयोजन नाहीं, या तत्त्वाला ती अखेरपर्यंत चिकटून राहिली. इतकी कीं, फ्रँकोशीं विवाहबद्ध झाल्यानंतरसुद्धां तिला कधीं लोकमताच्या वाऱ्याची झळ लागू शकली नाहीं. अशा प्रसंगापासून ती दूर रहात असे ती भीतीनं अगदीं नव्हे, तें तिच्या रक्तांतच नव्हतं. असल्या चळवळींत भाग घेणाऱ्या स्त्रिया तिच्या दृष्टीनं गांवढळ ठरत. आणि या वृत्तीमुळेंच फ्रँकोला हवं तें स्त्रीसुख ती देऊं शकली !

कारमेनचे वडील चांगले धनाढ्य होते. त्यांच्या घरचं वातावरण अर्थातच खानदानी स्वरूपाचं आणि सुसंस्कृत होतं. तिचे आजोबाहि असेच एक प्रख्यात लेखक आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. स्वाभाविकपणेंच माहेरीहि मध्यमवर्गाशीं मिळून मिसळून वागण्याचा तिला कधीं प्रसंग आला नाहीं. “ चूल आणि मूल एवढंच स्त्रीचं क्षेत्र ” हीच शिकवण तिच्या आईकडून तिला मिळाली. या सर्वांच्या जोडीला आईकडून आलेला घराण्याचा अभिमान आणि बापाकडून तिनं उचललेला बुद्धिजीवी वर्गाच्या हाडीमासीं खिळलेला गर्व होताच !

शांततावादी अशा या घराण्याशीं परिचय होऊन पंधरा वर्षांच्या कार्मेनचें मन जिंकणारा फ्रँकोहि कांहीं वयानं फार मोठा नव्हता. त्यालाहि नुकतंच विसावं वर्ष लागलं होतं. कार्मेन अतिशय नाजुक बांध्याची पण चांगली उंच होती. तिचे डोळे फार सुंदर होते आणि तिच्या कटाक्षांतलं मृदु आकर्षण तर त्याहूनहि विलोभनीय होतं. तिचा लांबट वाटोळा चेहरा, बरोबर मधे भांग पाडून दोन्ही बाजूला रुळत रहाणाऱ्या तिच्या काळ्याभोर केशसंभारामुळें अधिकच सुंदर दिसे. तिची निवड तिच्या मातापितरांना सहजासहजी रुचली नाहीं. पण असं असलं तरी कार्मेनला आपल्या मनाची चांगली ओळख पटली होती. तिचं प्रेम म्हणजे तथाकथित तारुण्यसुलभ थिल्लरपणाचं खचित नव्हतं. स्पेनमधल्या आरोग्यपूर्ण उत्साहि वातावरणांत मुलीं यौवन लवकर प्राप्त होतं. आयुष्यांत जें पवित्र प्रेम स्त्री एकदाच करूं शकते तेंच आपण फ्रँकोला मनोभावानं अर्पण करीत आहोत याची पंधरा वर्षांच्या कार्मेनला पूर्णपणें जाणीव होती. मुळांतच रम्य असणाऱ्या त्या प्रदेशांत त्या वेळीं वसंताचं वैभव चौफेर पसरलं होतं. कार्मेनचं तरुण रक्त प्रेमभावनेनं उसळत होतं. साहजिकच प्रियाराधनाच्या मधुर आठवणी तिच्या अंतःकरणांत चिरंतन राहिल्या असल्यास नवल नाहीं.

तिच्या घरची वडील मंडळी फ्रँकोचा भारीच दुष्टावा करीत. यापेक्षां किती तरी पटीनें श्रेष्ठ असा सवंगडी आपल्या लाडक्या कार्मेनला मिळावयास हवा होता असं त्यांना वाटत असे. पण त्यांनीं त्या दोघांच्या गाठीभेटी थांबविल्या नाहींत. कार्मेन बरोबर सदैव मोलकरणीचा ससेमिरा असला तरी शाळेच्या दाराशीं किंवा जमेल तेव्हां इतर कुठेंतरी अज्ञात ठिकाणीं घरच्या वडील मंडळींचा डोळा चुकवून ती फ्रँकोची गांठ घेई. तिच्या त्या विशाल काळ्याभोर डोळ्यांत फ्रँकोला तिची अढळ प्रीति प्रतिबिंबित झालेली दिसत असे.

मध्यंतरी तो सैन्यांत दाखल होऊन तिच्यापासून दूर गेला तरी तिचं मन विचलित झालं नाहीं. फ्रँकोशिवाय इतर पुरुषाचा विचार तिच्या मनाला कधीं शिवला नाहीं. "अशा साहसी, बेदरकार वृत्तीच्या माणसाशीं तुझा संसार कधीं सुखाचा होईल काय?" अशा प्रश्नानं वडीलधारी

मंडळी तिची परोपरीनं समजूत घालण्याचा यत्न करीत. कार्मेन मात्र या विरोधाला न जुमानतां रात्रंदिवस आपल्या प्रियकराच्या वाटेकडे डोळे लावून बसे. आपल्या मीलनाला होत असलेला हा विरोध आज ना उद्यां खचित नाहींसा होईल अशी तिला खात्री वाटत असे. आणि झालंहि तसंच.

फ्रँकोची लष्करांतली कर्तबगारी जसजशी अधिक स्पष्ट दिसूं लागली तसतसा हा विरोध मावळूं लागला. लष्करांतल्या अधिकारपदाच्या वैभवाची मोहिनी कांहीं विलक्षण असली पाहिजे. नाहींतर अधिकारपदाचं चांदी-सोनं फ्रँकोच्या अंगाखांद्यावर चढूं लागतांच शांततावादी समजले जाणारे हे लोक आफ्रिकन युद्धाचे नकाशे येवढ्या उत्सुकतेनं का पाहूं लागले असते ? याच आफ्रिकन युद्धांत फ्रँको प्रथम चमकला.

आतां त्यांच्या लग्नाला होत असलेला विरोध संपला खरा; पण लग्नाचा मुहूर्त निश्चित ठरूनहि दोनदा असा प्रकार घडला कीं, ऐन लग्नाच्या वेळीं फ्रँकोचाच कुठें पत्ता लागेना ! अत्यंत महत्त्वाच्या कामासाठीं त्याला तातडीनं आघाडीवर जावं लागलं होतं. अखेर त्याचं लग्न लागलं तेव्हां फ्रँको मोरोक्कोमध्यें सरसेनापतीच्या हुद्द्यावर होता. मोठ्या मिनतवारीनं त्याला दोन दिवसांची रजा मिळवावी लागली. स्पेनचे खुद्द राजेसाहेब त्याचे खास पाहुणे म्हणून त्या प्रसंगी हजर राहिले होते. वधुवेषांत कार्मेनचं सौंदर्य अधिकच खुलून दिसत होतं. मॅग्नोलिआच्या फुलासारखा तिचा तो धवल भालप्रदेश, त्यावर मागच्या बाजूस वळविलेले सुंदर काळेभोर केस, नेहमीं लडिवाळपणें चमकत असलेले डोळे तिनं आतां खालीं वळविल्यामुळें लज्जेनं किंचित आरक्त झालेल्या तिच्या गालांवर विसावलेल्या लांब काळ्याभोर पापण्या, अशी स्वरूपसुंदर कार्मेन आपल्या वडिलांचा हात धरून जेव्हां चर्चमध्यें व्यासपीठाजवळ आली तेव्हां स्पेनच्या अमीर उमरावांच्या स्त्रियांच्या तैलचित्रासारखं तिचं सौंदर्य रेखीव दिसत होतं. शिपाईबाण्याच्या व किंचित् बोजड बांध्याच्या फ्रँकोपुढें कार्मेन एखाद्या सुकुमार फुलासारखी दिसत होती. अनेक अडीअडचणींतून व दीर्घ कालाच्या प्रतीक्षेनंतर त्यांचा हा प्रीतिविवाह झाला खरा, परंतु हें वैवाहिक सुखहि त्यांना फार काल लाभूं शकलं नाहीं. लग्नानंतर महिनाभरांतच

फ्रँकोला मोरोक्को येथील सैन्याचं नेतृत्व स्वीकारण्यासाठीं तांतडीनं निघावं लागलं.

नंतरच्या दिवसांत फ्रँकोच्या जीवनांत प्रेमापेक्षां महत्त्वाकांक्षेलाच अधिक स्थान मिळालं होतं. कार्मेनला त्याबद्दल वैषम्य कधींच वाटलं नाहीं. किंबहुना फ्रँकोच्या पराक्रमानं ती इतकी भारून गेली होती कीं त्या पराक्रमाच्या बुडाशीं कांहीं अविचार असेल अशी शंकाहि तिनं स्वतःला येऊं दिली नाहीं. ती थोडी अधिक विचारी स्त्री असती तर तिनं सामान्य स्त्रीप्रमाणें निर्वेध आयुष्य कंठिलं नसतं. स्पेनभर पसर-लेल्या वादळापासून ती अलिप्त राहू शकली नसती. फ्रँकोच्या ध्येयाशीं व विचाराशीं विरोध करण्याची वृत्तीच तिच्या ठिकाणीं नव्हती. फ्रँको म्हणेल ती पूर्वदिशा तिला मान्य होती. विरोधाचा शब्द तिच्या मुखांतून कधींच बाहेर पडला नव्हता. फ्रँकोच्या गौरवांतच केवळ ती आनंद मानून राहिली नव्हती. यशाबरोबर अपयशाचा व सुखाबरोबर दुःखाचाहि वाटा तिनं तत्परतेनं घेतला होता. बऱ्यावाईट, कसल्याहि भयंकर परिस्थितींत फ्रँको असला तरी ती नेहमीं त्याला सोबत करीत असे, व त्याच्यावरचं संकट टळावं म्हणून ती रात्ररात्र आसवं ढाळीत बसे. तिचं सारं जग म्हणजे फ्रँको. त्यापलीकडे तिची दृष्टि पोचत नसे. फ्रँको स्पेनच्या लोकशाहीचा वास्तविक एक लहानसा घटक. परंतु त्या एका व्यक्तीपुढें तिला स्पेनचं अस्तित्वच भासत नसे. १९३६ सालीं लोकशाही पक्षाकडून फ्रँकोला अटक करण्यांत येऊन कॅनरी बेटांत त्याला धाडण्यांत आलं. कार्मेनहि त्याच्याबरोबर गेली. या हद्दपारींतून मुक्त होऊन फ्रँको कासेरेस येथें गेला व आपल्या लष्करी अधिकाऱ्यांशीं खलबतं करूं लागला. तासन्तास फ्रँकोची खलबतं चालू रहात. आणि त्याची भेट होईपर्यंत कार्मेन बाहेर वाट पहात उभी राही. दुसरी एखादी स्त्री कंटाळून गेली असती. परंतु कार्मेनची शांत वृत्ति कधीं ढळली नाहीं. कारण फ्रँकोशिवाय तिला दुसरं जीवित नव्हतं, अस्तित्वहि नव्हतं.

स्वबांधवांच्या अश्रुपाताचा, रक्तपाताचा डोना कार्मेनच्या सुखासीन जीवनावर कांहींच परिणाम होऊं नये याचं कित्येकांना आश्चर्य वाटल्या-

वांचून रहात नाहीं. फ्रँकोच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेखालीं स्पेनचीं निरपराध बालकं व असहाय्य स्त्रिया चिरडल्या जात आहेत हें तिला पाहवतं कसं ? स्पेनची अशी दुर्दशा चालू असतां एखाद्या तिऱ्हाइताप्रमाणें ती अलिप्त कशी राहूं शकते ? हा दोष तिचा नाहीं. भांडवलशाहीचं स्वार्थी व निष्ठुर रक्त तिच्या नसानसांत भिनलं असल्यामुळें खालच्या वर्गाच्या सुखदुःखाविषयीं तिला सहानुभूति वाटणं शक्यच नाहीं. एकीकडं क्रांतीचे शस्त्र हातीं घेऊन नवा स्पेन देश क्षितिजावर उदय पावत आहे, पण दुसरीकडे डोना कार्मेन फ्रँको अजून स्पेनच्या मध्ययुगीन ऐतिहासिक काळांतच रेंगाळत आहे. तिला नव्या युगाची ही प्रभात कशी दिसणार ?

---

# ८....चार्लोटे बर्नार्ड शॉ !

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंग्रजी ललितवाङ्मयांतल्या नायिका म्हणजे केवळ कादंबऱ्या वाचणाऱ्या आणि थोड्याशा निमित्तानंहि मूर्च्छित पडणाऱ्या अशा रेखाटलेल्या असत. परंतु बर्नार्ड शॉच्या नाटकांत मात्र अशा तऱ्हेची एकहि दुबळी नायिका आढळत नाहीं. शॉनं आपल्या नायिका अत्यंत तेजस्वी, स्वतंत्र विचाराच्या व प्रभावी व्यक्तिमत्वाच्या अशाच रंगविलेल्या आहेत. साहजिकच विचार मनांत येतो कीं, क्रांतिकारक आधुनिक अशा नायिका रेखाटणाऱ्या बर्नार्ड शॉची पत्नी कशी बरं असेल ? गेल्या चाळीस वर्षांत शॉचं नांव जितकं गाजलं तितकं दुसऱ्या कोणाहि इंग्रज लेखकाचं गाजलं नसेल. परंतु या प्रसिद्धीच्या प्रकाशांत शॉची पत्नी एकदांहि चमकली नाहीं. किंबहुना तिनं मुद्दामच ही प्रसिद्धी टाळली असावी. घराच्या चार भिंतीआड अज्ञातवासांत राहणारी अशी ती कांहीं जुन्या वळणाची अडाणी स्त्री थोडीच होती ! किंवा शॉला तिरस्कार वाटावा अशी असंस्कृत किंवा अशिक्षित ती मुळींच नव्हती. मग तिचं नांव कधीं कोठें ऐकूं येऊं नये याला कारण तरी कोणतं असावं असा विचार मनांत येतो. हें कारण चार्लोटेच्या स्वभावांतच सापडतं. शॉप्रमाणें आपल्याहि नांवाचा गाजावाजा व्हावा अशी हांव तिनं कधीं बाळगली नाहीं; किंवा तो झाला तर तिनं कधीं नापसंतीहि दर्शविली नाहीं. शॉच्या कीर्तीचा गुप्तपणें आनंद घ्यावा यांतच तिला समाधान लाभत असे. ती शॉच्या नायिकांप्रमाणें दिमाखानं मिरविणारी स्त्री नसली तरी त्याच्या ठिकाणीं आढळून येणारी स्वतंत्र दृष्टि व तेजस्वी आधुनिक विचारसरणी मात्र चार्लोटेच्या अंगीं पूर्णपणें होती. एकाच गोष्टीनं चार्लोटेच्या प्रभावी व्यक्तिमत्वाची ओळख पटण्यासारखी आहे. ती

१०६७

शीष्ट म्हणजे बर्नार्ड शॉवरचा तिचा दरारा. शॉ चाळीस वर्षांचा होता तेव्हां चार्लोटेनं त्याच्याशीं विवाह केला. तेव्हांपासून शॉची स्वारी चार्लोटेच्या ताब्यांत होती येवढं सांगितलं म्हणजे चार्लोटेच्या सामर्थ्याची सहज कल्पना येईल. मात्र संसाराच्या गाड्याला त्या दोघांनीं स्वतःला कधींच जुंपून घेतलं नाहीं. स्वावलंबन व व्यक्तिस्वातंत्र्य हे गुण त्या दोघांच्याहि अंगीं उपजतच असल्यामुळें त्यांच्या वैवाहिक बंधनाला लग्नाच्या बेडीचं स्वरूप त्यांनीं कधींच येऊं दिलं नाहीं. एकमेकांच्या आचारविचारांत ढवळाढवळ करण्याचं त्या दोघांनींहि कटाक्षानं टाळलं. मात्र प्रत्येकाला असं स्वातंत्र्य असलं तरी घराची मालकीण चार्लोटे होती, व तेवढ्यापुरता तरी ती शॉवर अधिकार चालवी. मित्रमंडळीशीं गप्पागोष्टी ऐन रंगांत आल्या तरी जेवणाची वेळ झाली कीं, रंगलेली बैठक सोडून शॉ घरीं जात असे. दहा मिनिटं उशीरां घरीं जाऊन चार्लोटेची बोलणीं खाण्यापेक्षां गप्पागोष्टींचा मोह सोडणं त्याला अधिक सोपं वाटे. चार्लोटे मोठी व्यवस्थित व टापटीप राखणारी स्त्री. उलट टापटीप कशाला म्हणतात तें लग्न होईपर्यंत शॉच्या गांवींहि नव्हतं. लग्नापूर्वीच्या चाळीस वर्षांच्या दीर्घकालांत व्यवस्थितपणाचा विचारदेखील त्यानं कधीं केला नव्हता. परंतु लग्नानंतर मात्र गबाळेपणाची ही संवय मोडणं शॉला भाग पडलं. शॉच्या हातून एखादी चोडचूक झाल्यास त्याला क्षमा करण्याइतकं चार्लोटेचं अंतःकरण उदार होतं. किंबहुना शॉचं मन आपल्याइतकं कोणीच ओळखलं नाहीं असा गर्व ती नेहमीं बाळगी. पण शॉचा गबाळेपणा मात्र तिला बिलकुल खपत नसे. घरांतली टापटीप व व्यवस्था शॉनं संभाळलीच पाहिजे अशी तिची सक्त ताकीद असे. तिची ही कडक शिस्त पत्करणं शॉला भाग पडे.

त्यांचा विवाह झाला तेव्हां ती दोघेहि मध्यम वयाची होती. त्यामुळें त्यांच्या प्रेमाचं स्वरूपहि वेगळं होतं. त्यांच्या प्रेमांत बंधनापेक्षां औदार्यच अधिक होतं; व त्यामुळें दोन मित्रांनीं एके ठिकाणीं रहावं तसा त्यांचा संसार खेळीमेळीनं चालला. लग्नानंतर शॉ चार्लोटेच्या घरींच म्हणजे 'ॲडेल्फी टेरेस' येथें राहूं लागला. परंतु दारावर पाटी लावलेली असे तीं मात्र चार्लोटेच्या नांवाचीच. दारावर फक्त पत्नीच्या नांवाची पाटी असावी

ही गोष्ट एखाद्या आधुनिक विचाराच्या पुरुषासहि मानहानीची वाटण्याचा संभव आहे. परंतु शॉनं असल्या क्षुल्लक गोष्टींना कधींच महत्व दिलं नाहीं, व चार्लोटेच्या स्वातंत्र्याला कधीं बंधनं घालण्याची इच्छाहि त्याला झाली नाहीं. शॉच्या लग्नाबद्दल बरंच कुतूहल पसरलं होतं. कुणी म्हणत शॉनं चार्लेटेच्या संपत्तीसाठीं तिच्याशी लग्न केलं. प्रेम किंवा पैसा हीं दोनच कारणं या लग्नाच्या मुळाशीं असूं शकतील असं लोकांना वाटलं. शॉच्या एका फाजील चौकस मित्रानं त्याला विचारलं, " काय हो तुम्ही चार्लोटेशीं लग्न केलं तें पैशासाठीं कीं प्रेमासाठीं ? " त्यावर शॉनं उत्तर दिलं, " प्रेमासाठीं नाहीं व पैशासाठींहि नाहीं. एकमेकांवांचून आम्हाला राहणं शक्य नाहीं असं वाटलं म्हणूनच आम्ही लग्न केलं. " एकमेकांवांचून रहावत नाहीं म्हणून झालेलं लग्न एका अर्थी फारच चांगलं म्हटलं पाहिजे. कारण अशा प्रकारें लग्न झाल्यानं पुढें वैवाहिक आयुष्यांत प्रेम व पैसा यामुळें उत्पन्न होणारा कलह तरी वाट्याला खचित येत नाहीं.

बर्नार्ड शॉचा विवाह त्याची चाळिशी उलटून गेल्यावर झाला आणि तो सुद्धां अगदीं अनपेक्षित रीतीनं. शॉचं तरुणपण अगदीं कडक सोवळेपणांत गेलं होतं. परंतु पुढें नांवलौकिक व पैसा यांजबरोबर प्रेमानंहि त्याची पाठ पुरवली. पाठ पुरवली असंच म्हटलं पाहिजे. कारण प्रेमाचे खेळ करण्यांत शॉची स्वारी तरबेज नसल्यामुळें प्रियकरणीचा पाठलाग करणं त्याला कधींच जमत नसे. उलट शॉच्या भाषेंत सांगावयाचं म्हणजे त्याला " छानछो-कीचा पोषाख " करण्याइतकी ऐपत आल्यापासून स्त्रियांनींच त्याची पाठ पुरवली होती. त्या दिवसांत प्रेमाच्या खेळांना तोटा नव्हता, व तो निव्वळ खेळ असं जरी शॉनं म्हटलं तरी अशा खेळांत शॉची स्वारी बरीच रमत असे हेंहि खरं. मात्र एकोणिसाव्या शतकांतल्या त्या अशिक्षित आणि गर्विष्ठ स्त्रियांपेक्षां त्याचे जिवलग मित्र ' सिडने ' आणि ' साल्ट ' यांच्या बौद्धिक सहवासांतच त्याला अधिक आकर्षण वाटत असे. बिआट्रिस वेबनं सिड-नेशीं विवाह केला तेव्हां बर्नार्ड शॉ आपल्या घरीं कायमचा पाहुणा असावा ही कल्पना तिला फारशी रुचली नव्हती परंतु पुढें बिआट्रिसला व सॉल्टच्या पत्नीलादेखील या पाहुण्यावांचून करमेनासं झालं, व त्या दोघींच्या

संसारांत शॉचं स्थान अढळ होऊन बसलं. अशा परिस्थितींत स्नेह्यांच्या या कंपूत ' चार्लोटे पेन टाऊनशेंड ' नं अगदीं अचानक प्रवेश केला.

चार्लोटे टाउनशेंडचा जन्म डब्लीनच्या एका पिढीजाद श्रीमंत व प्रतिष्ठित घराण्यांत झाल्यामुळें वयांत आल्यावर डब्लीनच्या समाजांत ती वावरू लागली ती त्या काळच्या मानमरातबानंच. हुद्याची किंवा घरजावई होण्याची आशा धरून तिची प्रेमयाचना करणाऱ्या प्रेमवीरांनीं तर तिला भंडावून सोडलं होतं. चार्लोटे जात्याच थोडी बंडखोर वृत्तीची. समाजांतील दुष्ट चालीरीतींचा तिला इतका तिटकारा आला कीं, तिची मुळांतली बंडखोर वृत्ति अखेर प्रबळ होऊन तिनं डब्लीन सोडलं व ती इंग्लंडमध्यें आली. त्या काळीं समाजवादाविषयीं स्त्री-पुरुषांनीं बोलणं म्हणजे कमीपणाचं समजलं जात असे. परंतु समाजवादाचा अभ्यास करावयाचाच असं चार्लोटेनें ठरविलं होतं. समाजवादाचा अभ्यास ज्याला करावयाचा त्यानं मिसेस सिडने वेबकडूनच धडे घ्यावे अशी प्रशंसा ऐकल्यावरून सिडने वेब बाईची ओळख करून घेण्याचा तिनं निश्चय केला. पुढें जी संस्था " लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स " म्हणून नांवारूपाला आली त्या संस्थेची सुरवात सिडने वेब पतिपत्नींनीं १८९६ च्या सुमारास मोठ्या कष्टानं केली होती. सिडने वेब पतिपत्नींच्या स्वभावांतील गोडपणा व संस्थेला जिवंत राखण्यासाठीं त्यांनीं चालविलेले कष्ट पाहून त्यांना आर्थिक मदत करण्याचं चार्लोटेनं ठरविलं. चार्लोटेच्या मदतीनंच संस्थेची शाळा पुढें ' ॲडेल्फी टेरेस ' या इमारतीमध्यें भरू लागली. इमारतीचे वरचे दोन मजले चार्लोटेकडेच असल्यामुळें उरलेली जागा संस्थेसाठीं वापरण्याची सोय सहजच होऊं शकली.

वेब पतिपत्नींशीं इतका निकट परिचय झाल्यावर चार्लोटेची व शॉची भेट होणं ही गोष्ट अपरिहार्यच होती. वेब पतिपत्नींच्या आमंत्रणावरून एकदां सुटींत चार्लोटे त्यांच्या घरीं रहावयास आली त्या वेळींच तिला शॉ प्रथम भेटला. शॉची स्वारी तेथें असावयाचीच ही वेबच्या मित्रमंडळींत कांहीं नवलाची गोष्ट नव्हती. परंतु चार्लोटे या कंपूंत प्रथमच आली असल्यामुळें तिला सर्वच गोष्टी नवख्या वाटत होत्या. वेब कुटुंबाचा पाहुण-

चार एखाद्या परक्या माणसाला चमत्कारिक वाटण्यासारखा होता. सिडने व ब्रिआट्रिस हीं दोघे एकमेकांच्या सहवासांत व आपापल्या कामांत गुंतलेलीं असत. तेव्हां पाहुण्यांना स्वतःचं मनरंजन स्वतःच करून घ्यावं लागत असे. पाहुणे आपापल्या सोयीप्रमाणें येत व जातहि. सिडने वेब पतिपत्नींच्या या विचित्र पाहुणचारांत आदरातिथ्याचा अभाव आहे असें मात्र कुणालाच कधीं वाटत नसे. सिडने वेब यांच्या घरीं 'फेब्रिआनिझम'चं वातावरण पसरलेलं असे व बर्नार्ड शॉ हा त्या तत्वाचा प्रचारक तेथें कायमचा तळ ठोकून असल्यामुळें तें वातावरणहि कायमच राहिलं. समाजवादाचा अभ्यास करावा अशी उत्सुकता चार्लोटेच्या मनांत होतीच. त्या निमित्तानं तिच्या व बर्नार्ड शॉच्या गाठीभेटी वरचेवर होऊं लागल्या. त्यांच्या एकमेकांच्या आवडीनिवडी बहुतांशीं सारख्याच असल्यामुळें एकमेकांच्या या सहवासांत परस्पर आकर्षण उत्पन्न झालं.

ह्या मैत्रीचा आनंद त्या दोघांनाहि फार मोठा वाटला. विशेषत: चार्लोटेला. बर्नार्ड शॉच्या चाळीस वर्षांच्या आयुष्यांत त्याचा अनेक स्त्रियांशीं संबंध आला होता. कांहींवर त्यानं प्रेम केलं होतं व पुष्कळ स्त्रियांशीं त्याचे दृढ स्नेहसंबंधहि होते. त्यामुळें स्त्रीस्वभावाचं मर्म त्याच्या इतकं दुसऱ्या कोणीच जाणलं नव्हतं. जिच्या अंतःकरणाचा बौद्धिक विकास झालेला आहे अशा कोणत्याहि स्त्रीला शॉचा सहवास म्हणजे मधुर मानसिक मेजवानीसारखाच वाटला असता. आचार–विचारांतलं व संभाषणांतलं त्याचं चातुर्य इतकं असामान्य कीं त्याच्या सहवासांत कोणीहि रमून जावं! ती एक त्याला दैवी देणगीच होती यांत शंका नाहीं त्यांतून चार्लोटे म्हणजे एक शाळा कॉलेजांत जाणारी अल्लड पोर थोडीच होती? शॉच्या सहवासांतला आनंद घेण्याइतका तिच्या बुद्धीचा विकास झालेला होताच, व जगाचा थोडाफार अनुभव मिळाल्यामुळें ती अधिक समंजस व रसिक बनली होती. शॉच्या विद्वत्तेबद्दल व बुद्धीबद्दल तिच्या अंतःकरणांत आदराबरोबरच आकर्षणहि वाढत चाललं होतं. अशा रसिक, समंजस व हुषार स्त्रीचा मोह शॉला पडला तर नवल कोणतं? सुटींतल्या या सहवासाचं रूपांतर प्रियाराधनांतच व्हावयास हवं होतं परंतु या दोन्ही व्यक्ती इतक्या लोक-

विलक्षण कीं, सहवासाची पुढची पायरी प्रियाराधन न ठरतां त्यांतून दृढ स्नेह उत्पन्न झाला. संध्याकाळीं ॲडेल्फी टेरेसमध्यें चार्लोटेशीं गप्पागोष्टी करावयाच्या हा आतां शॉनं नियमच ठरवून टाकला होता. परंतु या सहवासांतून स्नेहाखेरीज दुसरी भावना उत्पन्न झाली नाहीं.

दोन अनुरूप व्यक्तींच्या स्नेहाचं प्रणयांत रूपांतर व्हावं हा निसर्गाचा नियम आहे. परंतु शॉ व चार्लोटे या दोघांचेहि स्वभावधर्मच असे विक्षिप्त कीं, त्यांचा स्नेहसंबंध वरील नियमाला अपवादच ठरला. शॉ तर जातिवंत ब्रह्मचारी होता. स्त्रीसहवासाचा आनंद घेण्याइतका तो रसिक होता; परंतु प्रेमाच्या आमिषानं विवाहबंधनाच्या गळीं लागण्याइतका तो साधाभोळा खचित नव्हता. मोहमय वातावरणांतसुद्धां वयाचीं चाळीस वर्षं त्यानं ब्रह्मचर्य पाळलं, या एकाच गोष्टीवरून लग्नाचा त्यानं पुरताच धाक घेतला असावा असं दिसतं. चार्लोटेच्या मुळच्या करारी स्वभावांत बंडखोर वृत्तीची भर पडली होती. त्या काळच्या सामाजिक चालींरीतींना तिनं कधींच जुमानलं नाहीं, कारण ती अत्यंत आत्मनिष्ठ व स्वातंत्र्यप्रिय होती. याच तिच्या वृत्तीमुळें स्वार्थी प्रियाराधनाला ती कधीं बळी पडली नाहीं किंवा विवाहानंतर नांव बदलण्याची सार्वजनिक पद्धतहि तिनं पाळली नाहीं. शॉच्या विद्वत्तेचा मोह तिला पडावा हें साहजिकच होतं. परंतु सामाजिक रूढींच्या बंधनाविषयीं आपल्याला वाटणारा तिरस्कार त्याच्याहि विचारसरणींत दिसून आल्यामुळें तो तिला अधिकच प्रिय झाला होता. किंबहुना त्या दोघांचे हे क्रांतिकारक विचारच त्यांच्या लग्नाआड आले होते. कारण विवाह म्हणजे तरी एक सामाजिक रूढीच ना ? अशा रूढीचा कायदा पाळण्याची आपल्याला जरूर काय, असं त्या दोघांनाहि वाटत होतं. ही जरूर त्या दोघांनाहि कधींच भासली नसती. परंतु एक तर दैवाचं चक्रच एकदम विलक्षण फिरलं व तीं दोघं एकमेकांच्या अधिक जवळ यावीं अशी घटना लवकरच घडून आली; व दुसरं असं कीं, शॉच्या क्रांतिकारक पुरोगामी अंतःकरणांतहि नीतिअनीतीच्या रूढ कल्पनेची एक ठिणगी गुप्तपणें धुमसत होतीच.

मोठ्या सुटींत वेब पतिपत्नींनीं जगाच्या प्रवासावर जाण्याचा बेत केला

होता. त्याप्रमाणें तीं दोघं प्रवासाला गेल्यानंतर शॉच्या ब्रिन्हार्डीच त्याची भेट घेणं चार्लोटेला भाग पडावं असा प्रसंग आला. अतिश्रमानं त्याची प्रकृति इतकी ढासळली कीं, चार्लोटेच्या घरीं जाऊन तिला भेटण्याचं सामर्थ्य त्याच्या अंगीं उरलं नव्हतं. शॉ आपल्या आईजवळ राहतों हें चार्लोटेला माहीत होतं. परंतु आईचा व मुलाचा संसार प्रत्यक्ष पाहून तिला मोठा धक्का बसला. मायलेक दोघं एकत्र राहत असलीं तरी एक-मेकांची फारशी विचारपूस करीत नसत. त्यामुळें घरांत सदा गोंधळ माज-लेला असे. शॉच्या खोलीला तर एखाद्या घाणेरड्या अडगळीच्या खोलीची कळा आली होती. अशा गलिच्छ वातावरणांत शॉ राहिला तर लवकरच प्राणाला मात्र मुकेल अशी तिची खात्रीच झाली. आजारी शॉची सुश्रूषा करण्यासहि तेथें कोणी नव्हतं. नाहीं म्हणायला एक अजागळ मोलकरीण रोज सकाळीं पचपचीत चहा व एक सुकं अंडं टेबलावर ठेवून निघून जाई. शॉला येथून हलवलंच पाहिजे असा तिनं निश्चय केला. खेडेगांवांतल्या निरोगी खुल्या हवेंत त्याला घेऊन जाण्याचं तिनं ठरविलं व राहण्यासाठीं एक प्रशस्त बंगलाहि भाड्यानं घेण्याची व्यवस्था तिनं ताबडतोब करून टाकली.

शॉच्या आईला ही व्यवस्था एकदम पसंत पडली. कोठूनहि शॉची सुश्रूषा चांगली व्हावी येवढीच तिची इच्छा असल्यानं तिनं अधिक चौकशी न करतां शॉला घेऊन जाण्याच्या चार्लोटेच्या बेताला संमति दिली. शॉ वेब किंवा सॉल्टच्या बायकोबरोबर गेला काय किंवा चार्लोटेसारख्या कुमारिके-बरोबर गेला काय तिला सर्व सारखंच होतं. परंतु स्वत: शॉलाच ही कल्पना बिलकूल आवडली नाहीं. चार्लोटेबरोबर जाणं व तिच्या अनिर्बंध सहवासांत राहणं ही कल्पना त्याच्या पुरोगामी क्रांतिकारक मनालाहि पटेना. शिवाय या राहण्यानं चार्लोटेच्या चारित्र्याविषयीं जो गैरसमज लोकांत पसरला असता तो त्याला नको होता. त्याच्या खोलींतलं वातावरण त्याच्या आरोग्याला विघातक असेल कदाचित्, परंतु त्याला तेथून ताबडतोब हलविण्याइतकं चार्लोटेला तें वातावरण दूषित कां वाटावं हें त्याला समजेना. चार्लोटे तर त्याचा दुराग्रह पाहून चकित झाली. क्रांतिकारक विचारसरणीचा शॉ प्रसंगीं समा-

जांतील रूढीला भिऊन अशी माघार घेईल असं तिला वाटलं नव्हतं. परंतु कांहीं झालं तरी शॉला त्या उकिरड्यांत राहूं देण्यास ती तयार नव्हती. तेथें राहणं म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखंच होतं. शॉला हवाशीर ठिकाणीं घेऊन जाण्याचा हट्ट ती कांहीं केल्या सोडीना. तिचं नैतिक सामर्थ्य शॉ-पेक्षांहि अधिक मोठं होतं यांत शंका नाहीं. अखेर या पेंचप्रसंगांतून निर्वेध-पणें सुटण्याचा एकच मार्ग शॉला दिसत होता. तो म्हणजे विवाहाचा राज-मार्ग ! अशा तऱ्हेनं वरील पेचप्रसंग सुटेल अशी चार्लोटेची अपेक्षा नस-ल्यानं ती थोडी दचकलीच. परंतु ही कल्पनाहि तिला आवडण्यासारखीच असल्यानं सातआठ दिवसांच्या आंतच त्या दोघांनीं आपलं लग्न उरकून टाकलं. रजिस्ट्रारच्या कचेरींत लग्न झालं त्या वेळीं शॉची स्वारी आजारीच होती. आपलं लग्न कसं झालं त्याचीं वर्णनं शॉ करतो तीं मोठीं मनोरंजक असतात. शॉ लग्नाला उभा राहिला तेव्हां काखेंत कुबड्या, अंगांत मळके कपडे असा त्याचा अवतार होता. मात्र साक्षीदार म्हणून ग्रॅहॅम वॅलेस व हेन्री सॉल्ट हे दोघे आले होते ते अगदीं उंची पोषाख करून. लग्नसमा-रंभासारख्या शुभप्रसंगीं पै-पैशाच्या आशेनं भिकारी आजूबाजूला जमता-तच. खाखेंत कुबड्या घेऊन उभा राहिलेला शॉ अशाच भिकाऱ्यांपैकीं असेल असा गैरसमज होऊन रजिस्ट्रार चार्लोटेचं लग्न लावूं लागला ते छानछोकीचा पोषाख करून ऐटीनं उभा राहिलेल्या ग्रॅहॅम वॅलेसबरोबर ! लग्नविधि अर्धाअधिक पार पडला तेव्हां ही चूक ग्रॅहॅमच्या लक्षांत आली व चटकन् बाजूला होऊन त्यानं शॉला पुढें करून चुकीची दुरुस्ती केली.

शॉनं सांगितलेली त्याच्या लग्नाची ही हकीगत सोडली तरी त्याच्या लग्नासंबंधीं अनेक सुरस चमत्कारिक कंड्या अजूनहि पसरलेल्या आहेत; व या कंड्या सत्यापेक्षां कल्पनेवरच आधारलेल्या असल्यामुळें, कितपत विश्व-सनीय असतील तें सांगावयास नकोच. एक कंडी अशी आहे कीं, आपल्या मित्रमंडळीसह इटालीचा प्रवास करीत असतांना फ्लॉरेन्स शहरीं शॉ आजारी पडला. त्याची सारी मित्रमंडळी त्याला सोडून निघून गेली. मात्र चार्लोटे तेथेंच त्याची शुश्रूषा करीत राहिली. तिच्या शुश्रूषेनं त्याला लव-करच बरं वाटलं. आपल्याबरोबर मागं राहिल्यामुळें चार्लोटेच्या चारि-

त्याला कलंक लागेल या भीतीनं त्यानं तिच्याशीं लग्न करण्याचं ठरविलं व तिनंहि त्याला संमति दिली. शॉनं स्वतःच दुसरी एक थाप बनविली आहे ती अशीः चार्लोटे अगदीं लहान होती तेव्हां डब्लीन शहरीं तिची व त्याची प्रथम मैत्री जमली. तिच्या घराच्या आसपास सायकलवरून फेऱ्या घालीत असतांना तो खालीं पडला व त्याचा पाय दुखावला. अर्थात् तिच्याच घरीं त्याला नेण्यांत आलं. तिनं स्वतः त्याच्या दुखावलेल्या पायाची शुश्रूषा केली. पुढं त्याला एकदम कळून आलं कीं, या मुलीचा सहवास गोड आणि म्हणूनच मोठा धोक्याचा आहे. तेव्हां शॉनं पळून जाण्याचं ठरविलं. पळून जात असतां जमिनीवर त्याचा लंगडा पाय घसरला आणि तो खालीं कोसळणार इतक्यांत चार्लोटेनं धावत येऊन सावरलं.

या कंड्या काल्पनिक असल्या तरी त्यांत थोडं फार सत्य सांपडतं खरं. इटालियन म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशनचा अभ्यास करण्यासाठीं चार्लोटे फ्लॉरेन्समध्यें कांहीं दिवस राहिली होती. परंतु लोकांच्या कल्पनेप्रमाणें तेथें शॉची शुश्रूषा करीत न राहतां ती मित्रमंडळीसह परत गेली होती. शॉनं बनविलेल्या थापेंतसुद्धां थोडें फार सत्य आहेच. घराच्या फरसबंद जमिनीवरून पाय घसरून शॉ पडला व स्वतः चार्लोटेनं त्याच्या मोडलेल्या हाताला बॅंडेज बांधलं होतं हेंहि खरं. मात्र शॉच्या सांगण्याप्रमाणें हा अपघात लग्नापूर्वीं न घडतां लग्नानंतर कित्येक वर्षांनीं घडला होता.

वेबमंडळी जागतिक प्रवास करून परत आली तेव्हां शॉ-चार्लोटे विवाहाच्या अद्‌भुत बातमीवर त्यांचा विश्वास बसेना. सरे प्रांतांतल्या हाइंडहेड गांवच्या आपल्या बंगल्यावर चार्लोटेनं शॉसह संसारास सुरवात केलेली पाहून तर त्यांच्या आश्चर्याला सीमाच उरली नाहीं. चार्लोटेच्या कडक शिस्तीखालीं वागणं प्रथम प्रथम शॉला फार अवघड वाटलं असावं. विशेषतः निम्मे आयुष्य स्वैरपणें घालविल्यानंतर एकदम टापटिपीच्या संसाराची बंधनं पाळणं ही गोष्ट सोपी नव्हती. परंतु अशा अडचणी त्या दोघांनीं मोठ्या चिकाटीनं निभावून नेल्या, व अखेरपर्यंत विभक्त होण्याचा प्रसंगहि टाळला. शॉसारख्या अत्यंत लोकप्रिय व विद्वान् पुरुषाच्या पत्नीला फार मोठ्या कसोटीस उतरावं लागतं; परंतु चार्लोटेनं कधीं माघार घेतली नाहीं.

त्या काळीं घटस्फोटाला सामाजिक मान्यता मिळाली असूनहि शॉ-पति-पत्नींनीं त्याचा फायदा घेण्याचं चुकूनहि मनांत आणलं नव्हतं. विवाह, विवाहाचे कायदे व वैवाहिक जीवन या विषयांवरचा शॉचा अभ्यास मोठा असून त्यानं त्यासंबंधीं टीकात्मक ग्रंथहि लिहिले आहेत. आपल्या चरित्रलेखकाला माहिती पुरवितांना शॉनं स्वतःच्याच लग्नासंबंधीं काढलेले उद्गार मोठे मार्मिक आहेत. "एका विवाहाचा दाखला दुसऱ्या विवाहास देतां येणार नाहीं. कारण प्रत्येक विवाहाचं स्वरूप भिन्न असतं. दोन तरुण स्त्री-पुरुषांनीं एकत्र येऊन लग्न करावं व पुढें त्यांना मुलंबाळं व्हावी ही गोष्ट क्रमप्राप्तच म्हटली पाहिजे. परंतु अशा लग्नाचा दाखला आमच्या लग्नास देतां येणार नाहीं. मुलं होण्याचं वय निघून गेल्यानंतर केवळ स्नेहप्रधान प्रेमासाठीं विवाहानं एकत्र येणाऱ्या मध्यवयीन स्त्रीपुरुषांचे विवाह भिन्न स्वरूपाचे असतात."

शॉची बुद्धि असामान्य कोटींतील आहे हें चार्लोटेनं ओळखलं होतं, व त्या बुद्धीचा पूर्णपणें उपयोग करतां यावा अशा सुखसोयीच्या वातावरणांत त्याला सतत ठेवायचं असा निश्चयहि तिनं लग्नाच्या वेळीं केला होता. त्यामुळें शॉच्या बाबतींत स्त्री ही पुरुषांच्या ध्येयमार्गांतील धोंड आहे हा लोकप्रवाद खरा न ठरतां उलट चार्लोटेनं दिलेल्या आर्थिक व मानसिक साह्यानंच शॉ कीर्तीचं शिखर गांठू शकला. संसाराची आर्थिक जबाब-दारी शॉकडे नसल्यामुळें आपल्या आवडत्या लेखनव्यवसायांत त्यानं सर्व लक्ष घातलं. वाङ्मयासंबंधीं त्याच्या ज्या स्वतंत्र कल्पना होत्या त्यांना मूर्त स्वरूपांत आणण्याचे नवीन प्रयोग मनसोक्तपणें करण्यास त्याला ही अनु-कूल परिस्थिति होती. चार्लोटेनं त्याच्या या कामांत कधींच अडथळा आणला नाहीं. कलावंताला कलानिर्मितीसाठीं स्वातंत्र्याची जरूर असते अशी तिची समजूत असल्यानं शॉवर तिनं कोणतीच वैयक्तिक स्वरूपाचीं बंधनं घातलीं नव्हतीं. या विवाहापासून तिला मूलबाळ झालं नाहीं, त्यामुळें हृदयां-तल्या साऱ्या प्रेमाचा वर्षाव ती शॉवर करीत होती. शॉ आणि त्याचं यश या दोनच गोष्टींनीं चार्लोटेचं स्त्रीहृदय अथांग भरलं होतं.

लग्नानंतरच्या दिवसांत शॉला वाङ्मय-व्यवसायांत कल्पनातीत यश

मिळूं लागलं व त्याची कीर्ति झपाट्यानं पसरूं लागली. यशाचा हा वर्षाव चार्लोटेला अनपेक्षितच होता. शॉची क्रांतिकारक विचारसरणी समाजाला पटण्यासारखी नव्हती. त्यामुळें शॉच्या विद्वत्तेचा व कलेचा समाजाकडून गौरव केला जाईल ही अपेक्षाच तिनं बाळगली नव्हती. समाजाला कलावंताच्या गुणांची ओळख व किंमत पटते ती त्याच्या मृत्यूनंतरच, ही कल्पना मनाशीं बाळगूनच तिनं प्रेमानं व पैशानं त्याच्या कलेची जोपासना करण्याचं ठरवलं होतं. समाजाला या कलावंताचं महत्व कळेल तें त्याच्या मृत्यूनंतरच अशी तिची समजूत असल्यानं शॉला जिवंतपणीच मिळालेलं अलोट यशोधन तिनं अपेक्षिलं नव्हतं. कीर्ति व पैसा शॉच्या घरीं दाही दिशांहून चालून येऊं लागलीं, व चार्लोटे आतां एका विख्यात व श्रीमंत नाटककाराची व लेखकाची पत्नी झाली. नांवलौकिक, कीर्ति व पैसा हें सार वैभव आतां शॉच्या पायाशीं होतं. हें वैभव पाहून तिला अभिमान वाटावा हें साहजिक होतं. परंतु या वैभवाचं श्रेय आपणाकडं फारसं नाहीं ही जाणीव होऊन ती कित्येकदां मनाशीं खिन्न झाली असेल. तिच्या मानी अंतःकरणाला अशी शंका येणं अपरिहार्य असलं तरी, कित्येकदां पत्नीच्या पायगुणानं पतीचा भाग्योदय होतो या लोकप्रवादांत थोडंफार सत्य असलं पाहिजे असं शॉच्या उदाहरणावरून वाटल्याखेरीज रहात नाहीं. पतिपत्नींच्या दैवाच्या शुभयुतीमुळेंच असा भाग्योदय होत असला पाहिजे. या दृष्टीनं शॉच्या आयुष्यांत जेव्हां प्रथम चार्लोटे आली त्या वेळींच शॉच्या उज्वल व यशस्वी जीविताचा आरंभ तिनं केला व नंतरच्या दिवसांत तिचा पायगुण असा कांहीं भाग्यशाली ठरला कीं, त्यामुळें जादूच्या ताइतानं उघडावं तसं संपत्तीचं व कीर्तीचं भांडार शॉसाठीं एकदम खुलं झालं.

चार्लोटेच्या प्रेमाला शॉवर मालकी हक्क गाजविण्याचं फार वेड होतं. शॉनेंहि या हक्काला कधीं विरोध केला नाहीं. पाखरूं जसं स्वैरपणें विहार करून परत आपल्या घरट्यांत येतं, तशी शॉची स्वारी कुठंहि भटकली तरी निमूटपणें तिच्या आश्रयास परत यावयाचीच हें अगदीं ठरल्यासारखं होतं. या गोष्टीचा चार्लोटे मोठा अभिमान बाळगीत असे. तिच्या बोलण्यांत

नेहमीं शॉचा उल्लेख होई तो " माझा शॉ " असाच. " माझा शॉ " असं म्हणावयाची लहर नसली तर " आमचं रत्न " ( Genius ) असंहि तिनं त्याचं दुसरं नांव ठेवलं होतं.

लग्न झालं त्या वेळीं शॉ कांहींसा कृश आणि उंच होता, आणि चार्लोटे मध्यम उंचीची व नाकींडोळीं साधारण बऱ्यापैकीं होती. तिच्या बोलण्या-चालण्यांत आणि हालचालींत बराचसा सात्त्विक थंडपणा होता. मात्र त्यांतहि एक प्रकारचा रुबाब सहज प्रत्ययाला येत असे. तिचे केस शुभ्र होते, परंतु त्यामुळें तिच्या स्वरूपांत गांभीर्याची ऐट आली होती. तिचं बोलणंचालणं अत्यंत मनमिळाऊ वाटे. गर्वाचा किंवा प्रदर्शनाचा तिच्या आचारविचारांत लेशहि आढळून येत नसे. तिच्या संभाषणांत मनमोकळे-पणा होता; परंतु विचारांचा दुराग्रह किंवा दुबळेपणा दिसून येत नसे. प्रसि-द्धीचा तिला मनापासून तिटकारा वाटे; व तसे प्रसंग ती कटाक्षानं टाळीत असे. शॉची स्वारी फोटो काढून घेण्यास हवी तेव्हां तयार असे. पण वर्त-मानपत्रासाठीं फोटो काढणं तिला कधींच आवडलं नाहीं.

स्त्रिया व समाजवाद हे दोन्ही विषय तिच्या आवडीचे असल्यामुळें त्यांच्या अभ्यासांत व कार्यांत तिनं वर्षानुवर्षं घालविलीं. तीस-बत्तीस वर्षां-पूर्वीं नाटककार ' ब्रो ' याच्या ' मॅटर्निटी ' व ' डॅमेज्ड गुडस् ' या दोन मूळ फ्रेंच नाटकांचं तिनं इंग्रजींत भाषांतर केलं होतं. आरोग्यसंरक्षणाच्या दृष्टीनं कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांवर विचार करण्यास समाजानं शिकावं हाच हीं भाषांतरं करण्यांत तिचा हेतु होता. परंतु त्या काळच्या समाजाला अशा नाजूक विषयावर इतकी उघड स्पष्ट टीका ऐकण्याचं धाडस व संवय नसल्यानं एकाहि प्रकाशकाला हीं भाषांतरं प्रसिद्ध करण्याचं धाडस करवलं नाहीं. चार वर्षांनंतर ' ब्रो ' हे जर फ्रेंच ॲकडमी या मोठ्या संस्थेचे सभासद झाले नसते, तर त्या भाषांतरित पुस्तकाच्या नशिबीं अज्ञातवासच आला असता. ' ब्रो 'चा सन्मान झाल्यामुळें परिस्थिति थोडी निवळली व शॉच्या न्यूयॉर्कच्या प्रकाशकानं हीं दोन्ही नाटकं प्रसिद्ध केलीं. पुढें 'मॅटर्निटी' या भाषांतरित नाटकाचा प्रयोगहि रंगभूमीवर झाला. ' ब्रो 'च्या " La Femme Seule " या नाटकाचं तिनं केलेलं भाषांतर व पुढें रंगभूमीवर

त्याचे झालेले प्रयोग फारच गाजले. लेखनांतील या यशापेक्षां " माझ्या पतीनं प्रस्तावना लिहिण्याचं कबूल केलं " असं ज्याला त्याला सांगतांना तिचं अंत:करण स्त्रीसुलभ विजयानं आणि अभिमानानं भरून येत असे.

शेक्सपिअरच्या वाङ्मयाचा शॉ फार चाहता होता. शेक्सपिअरच्या " अँटोनी आणि क्लिओपॅट्रा " या नाटकावरून त्यानं एक ( त्याच्या मतें ) सुधारून " सीझर आणि क्लिओपॅट्रा " असं नाटक लिहिलं. हें नाटक चार्लोटेचं फार आवडतं होतं. तिनं संकलित केलेला शॉच्या निवडक लेखांचा एक संग्रहहि प्रसिद्ध झाला आहे. परंतु त्याच्या प्रती आतां बाजारांत मिळत नाहींत व शिवाय त्यानंतर शॉची ग्रंथरचना पुष्कळच झाली असल्यामुळें त्या ग्रंथाची पुनरावृत्ति निघावी इतकं नाविन्य त्यांत उरलं नाहीं.

शॉ पतिपत्नींच्या वैवाहिक जीवनांत अनेक वादळं उत्पन्न झालीं. बरे वाईट प्रसंग घडले. या साऱ्या अडचणींतून निभावून जाण्याची बहुतेक सारी जबाबदारी चार्लोटेवरच पडली. पण ती त्या जबाबदारीखालीं खचली नाहीं. शॉच्या जीवनक्रमांत त्याला अडथळा वाटूं नये अशा रीतीनं तिनं आपलं जीवित गुंफलं. त्या दोघांच्या जीवितांचे धागे एकमेकांत इतके एकरूप झाले होते कीं सुमारे पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ कालांत चार्लोटेशिवाय जगण्याची कल्पना एकदांहि शॉच्या मनांत आली नाहीं. संसारांतील वादळांतूनहि त्यांचं एकमेकांविषयींचं प्रेम कायम टिकूं शकलं याचं एकच कारण एकमेकांच्या अंगचे दोष विसरून वागण्याची उदार प्रवृत्ति हेंच होय. एकमेकांच्या स्वभावांतील उणीवा ओळखण्याचा समजूतदारपणा त्या दोघांच्या अंगीं असल्यामुळेंच त्यांचा संसार सुखाचा होऊं शकला. शॉच्या " ॲपल कार्ट " या प्रसिद्ध नाटकांत नायकाच्या तोंडीं यासंबंधीं जें मार्मिक विवेचन शॉनं घातलं आहे तें शॉच्या स्वत:च्याच संसाराला लागूं पडण्यासारखं आहे. " आमच्या दोघांच्या स्वभावांतील आवडीनिवडी एकसारख्या असत्या तर आमच्यामध्यें मतभेद कधीं झाले नसते व खटके हि उडाले नसते, एकमेकांचा सहवास व संभाषण यांतच आम्ही रमलों असतों. मला कधीं दुसऱ्या माणसाशीं बोलण्याची गरज वाटली नसती किंवा तिलाहि दुसरं स्नेहबंधन नकोसं वाटलं असतं. परंतु पतिपत्नींच्या

आवडीनिवडींत असं साधर्म्य फार क्वचित आढळून येत असल्यामुळें आमचं लग्न म्हणजे इतर हजारों लग्नासारखंच झालं आहे. असे अनेक विषय आहेत कीं जे एकमेकांशीं बोलतांना आम्ही नेहमीं टाळतों. कारण त्या विषयांच्या चर्चेपासून मनस्ताप होण्याचा संभव असतो. तसंच मला आवडणाऱ्या कांहीं व्यक्ती तिला आवडत नाहींत, आणि तिच्या आवडींतल्या कांहीं व्यक्तींबद्दल मला तिटकारा आहे. त्यामुळें या साऱ्या व्यक्तींचे उल्लेख आमच्या संभाषणांत वर्ज्यच ठरतात. ”

# ९ क्लेमंटाइन विन्स्टन चर्चिल

विन्स्टन चर्चिल यांच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनांत त्यांची पत्नी क्लेमंटाइन हिला महत्वाचं स्थान असलं तरी तिचं नांव फारसं कोठें ऐकूं येत नसे. कारण प्रसिद्धीच्या प्रकाशांत आपण चमकूं नये म्हणून ती तशी खबरदारीच घेत असे. विन्स्टन चर्चिल यांच्याभोवतीं राजकीय आणि इतर कामकाजाचा नेहमीं ढिगारा पडलेला असतो. या साऱ्या कामापासून ती अलिप्त राही असंहि नाहीं. हातीं घेतलेल्या कोणत्याहि राजकीय अगर इतर कामकाजांत चर्चिल यांना तिची पूर्ण सहानुभूति असे. मात्र राजकारणाच्या क्षेत्रांत त्यांच्याबरोबर सक्रीय सहकार्य तिच्या हातून फारसं घडलं नाहीं.

अलीकडे दोन वर्षांत मात्र कोणत्याहि सामाजिक अगर इतर चळवळींत पतीच्या बरोबरीनं ती पुढाकार घेत असते. राजकीय क्षेत्रांतील चर्चिलच्या कर्तृत्वाला सुरवात झाली ती एक प्रधानमंडळांतील अत्यंत अल्पवयी पण हुशार मुत्सद्दी म्हणून. पण त्या कालांत क्लेमंटाइन पतीबरोबर मिरवितांना कधीं आढळली नाहीं. एक तर घरचं काम आणि मुलंबाळं संभाळण्यापुढें तिला इतर गोष्टी करण्याइतकी सवडच होत नसे; व दुसरं असं कीं, वर्तमानपत्रं आणि वृत्तपत्रकार यांच्याविषयीं तिच्या मनांत अढीच बसून गेली असल्यामुळें ती त्यांपासून नेहमीं दूरच रहात असे. कदाचित् ती ज्या तऱ्हेच्या वातावरणांत लहानाची मोठी झाली त्याचा तिच्या मनावर परिणाम झाला असावा. तिची आई ब्लॅन्स होशिअर ही तर एअरलीच्या सनातनी अर्ल घराण्यांतील मुलगी. तिला मुळीं वर्तमानपत्राचं अगर त्या धंद्यांतल्या कोणत्याहि माणसाचं नांव काढलं कीं धडकी भरे. वर्तमानपत्रं म्हणजे कुटाळक्या करण्याचं एक साधन, आणि त्या करणारे धंदेवाईक म्हणजे



मिसेस क्लेमंटाइन चर्चिल

बदमाष टवाळखोर, असं तिचं ठाम मत असल्यानं त्यांच्या प्रसिद्धीच्या मोहाला बळी पडणाऱ्या स्त्रीविषयीं तिचं मत वाईट होत असे. आपल्या लहान मुलामुलींना तिनं याच शिस्तीनं वाढविलं असल्यामुळें साहजिकच कसल्याहि प्रकारच्या प्रसिद्धीचा तिटकारा क्लेमंटाइनच्या मनांत उपजतच उत्पन्न झाला होता. इतका कीं वर्तमानपत्रांत नांव येणं, फोटो छापला जाणं या गोष्टी घरंदाज स्त्रीला शोभत नाहींत अशी तिची पक्की समजूत झाली होती. क्लेमंटाइनची ही विचित्र समजूत दूर होण्यास जवळ जवळ तिची सारी उमर तिला घालवावी लागली. आपल्या आईची ती समजूत म्हणजे केवळ प्रतिगामी स्वरूपाचा दुराग्रह होता हें आतां अलीकडे तिला पटूं लागलं आहे. पटलं तरी तिचा संकोच अजून पुरता जात नाहीं. अगदीं अलीकडे राजकीय सभा–सम्मेलनप्रसंगीं ती पतीबरोबर जाते खरी; पण फोटो काढण्याची परवानगी ती देते ती मोठ्या मिनतवारीनंच !

स्वच्छंदी आणि विलासी वृत्ति हा तरुण वयाचा नैसर्गिक गुणधर्म सामान्यपणें समजण्यांत येतो. पण विन्स्टन चर्चिल यांच्या ऐन जवानींतहि त्यांच्या ठिकाणीं या वृत्तीचा पूर्णपणें अभाव होता. त्यांच्या परिस्थितीच्या आणि त्या काळच्या मानानं त्यांचा वेष अगदीं साधा–गबाळाच असे. त्या वेळीं ते आपल्या भावाच्या खोलींत रहात असत. पण त्या दोघांच्या राहाणीतल भयंकर अंतर कोणालाहि चटकन दिसून येत असे. मात्र पेहेरावावरून गबाळ्या वाटणाऱ्या विन्स्टनला मित्रमंडळींनीं ओढून बाहेर नेलं कीं त्याच्या स्वभावांतला रंगेलपणा जागा होई. त्यामुळें विन्स्टनची स्वारी बरीच लोकप्रिय झाली होती, व अर्थातच त्याच्याविषयीं निरनिराळ्या कंड्याहि उठत होत्या. तो अमुक स्त्रीशीं लग्न करणार अशा वदंता कितीदां तरी उठल्या होत्या. त्यांपैकीं एक स्त्री तर एक मोठी विख्यात अमेरिकन नटी होती. परंतु लोकांचे सारे तर्क चुकीचे ठरवून विन्स्टननें आपल्या वधूची अगदीं अनपेक्षितपणेंच निवड केली. डंडी येथील निवडणुकीच्या धांदलींत तो गुंतला असतांना क्लेमंटाइन होझीअरशी त्याची प्रथम भेट झाली. डंडीमध्यें क्लेमंटाइनच्या घराण्याचं बरेच वजन होतं. त्यांची ओळख झाली. ओळखीचं प्रणयांत रूपांतर झालं

आणि मग लोकरूढीप्रमाणें सरळ लग्नही ठरलं. या लग्नांत रोमांचकारक किंवा लोकविलक्षण असं कांहींच घडलं नव्हतं. वधूवरांच्या आईवडिलांना हें लग्न पूर्ण पसंत होतं किंबहुना विन्स्टन आणि क्लेमंटाईन या दोघांच्या आयांनींच हें लग्न जमवून आणलं असं म्हणावयास हरकत नव्हती.

१९०८ सालीं विन्स्टन व क्लेमंटाईन यांचा विवाह मोठ्या थाटांत साजरा झाला आणि गाजलाहि. लग्नानिमित्त किती अहेर आले त्याची तर गणतीच नव्हती. विन्स्टन आणि क्लेमंटाइन यांच्या आप्तेष्टांनीं, स्नेह्या-सोबत्यांनीं हरतऱ्हेच्या देणग्या दिल्या होत्या. परंतु शिवाय कॅबिनेटमधील मंत्रिमंडळाकडून व खास राजाराणीकडून अहेर आले होते. मधुचंद्राचे कांहीं दिवस ब्लेनहेम येथें घालवून नंतर पॅरीसवरून साऱ्या युरोप खंडाचा प्रवास या जोडप्यानं खूप मजेंत केला. विन्स्टन–क्लेमंटाइनच्या विवाह-सुखाची गोडी मधुचंद्रांतच संपली नाहीं. नंतरच्या दिवसांतहि ती अवीट राहिली. हें सुख टिकणं वास्तविक कठीण जावं अशीच चर्चिल घराण्याची त्या काळची परिस्थिति होती. कॅबिनेटमधील मंत्रिपदाबद्दल जो कांहीं मोबदला चर्चिलला मिळत असे त्याव्यतिरिक्त इतर प्राप्ति म्हणजे लेखना-वरचीच. अर्थात् ही प्राप्तीची दोन्हीं साधनं समाजाच्या लहरीवरच अवलंबून असल्यामुळें चरितार्थाबद्दलच्या काळजीची तलवार विन्स्टनच्या मानेवर सतत टांगलेली असे. अशा धोक्याच्या परिस्थितींतहि मोठ्या धैर्यानं आपल्या संसाराची नाव विन्स्टननं लोटून दिली. निश्चय ठरला कीं विघ्नांचा विचार करावयाचा नाहीं या त्याच्या बेडर धाडसी वृत्तीचं हें एक उदाहरणच आहे. त्याच्या हातून अनेक धाडसाचीं कृत्यं घडलीं आहेत. परंतु विवाहाची ही एकच घटना अशी आहे कीं तिच्या स्मृतीनं देखील त्याला समाधान वाटतं आणि त्याचा आत्मविश्वास दृढ होतो.

त्याच्या स्वभावाला, वृत्तीला, आणि विद्वत्तेला साजेल अशीच पत्नी त्याला लाभली आहे. क्लेमंटाइनच्या ठिकाणीं असलेली समतोल वृत्ति, आणि खोल समज यामुळें तर कित्येकदां त्याच्या साऱ्या कर्तृत्वाला उत्तेजन मिळाल्यासारखं त्याला वाटतं. क्लेमंटाइनची जन्मगांठच अशा पुरुषाशीं पडली होती कीं, ज्याची असामान्य विद्वत्ताच तिच्या संसारसुखांत तिला

अडचणीसारखी वाटावी. पण ती जात्याच इतकी कुशल कीं ही अडचण भासू नये इतक्या तत्परतेनें तिनं विन्स्टनच्या सेवेस स्वतःला वाहून घेतलं. त्याच्या सामाजिक जीवनापासून सर्वस्वीं अलिप्त राहूनहि त्यानं हातीं घेतलेल्या कार्यांत प्रसंगीं सल्लागाराचं काम तिला करावं लागत असे. त्याच्या श्रांत मनाला विश्रांति देणं, सहानुभूतीनं उत्तेजनानं त्याच्या ठिकाणीं नवा उत्साह सतत निर्माण करणं, हा तर तिचा जीवनहेतु होता. तिच्या या विलक्षण धडपडीची कल्पना ज्या स्त्रीनं थोरांच्या सहचारिणीपदाची सुखदुःखं अनुभविलीं आहेत तिलाच फक्त करतां येईल. पण समाधानाची गोष्ट एवढीच कीं क्लेमंटाइनची धडपड अखेर यशस्वी ठरली. विन्स्टनचा तिच्या बाबतींत अपेक्षाभंग झाला असा एकहि क्षण क्लेमंटाइनच्या आयुष्यांत अद्यापि आला नाहीं, ही तिला केवढी अभिनाची गोष्ट वाटत असली पाहिजे !

क्लेमंटाइनला राजकारण हा विषय कांहीं अपरिचित नव्हता. किंबहुना त्या काळच्या समाजाला त्या विषयाची ओळख करून घ्यावी लागावी अशीच परिस्थिति होती. शिवाय क्लेमंटाइनचं घराणंहि चांगलं सुसंस्कृत असल्यामुळें पुढें विन्स्टन चर्चिलसारख्या अस्सल राजकारणी पुरुषाची सहचारिणी म्हणून समाजांत व राजकीय क्षेत्रांत वावरणं तिला अवघड वाटलं नाहीं. विन्स्टन चर्चिल यांची पत्नी या नात्यानं समाजांत व राजकारणांतहि तिला जें महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं तें तिनं अत्यंत कुशलतेनं टिकविलं आहे. किंबहुना समाजानं तिच्याकडून ज्या ज्या अपेक्षा केल्या त्या सर्व तिनं पुऱ्या केल्या आहेत. एकीकडे आपली सामाजिक कर्तव्यं समाधानकारक रीतीनं पार पाडीत असतांना, दुसरीकडे राजकीय घडामोडीकडेहि तिचं नेहमीं लक्ष असतं. स्त्रियांच्या ‘ सफ्रेजेट ’ मतदानाच्या हक्क मिळविण्याच्या चळवळीला तिचा पाठिंबा होता. विन्स्टन चर्चिलच्या सभांतून या सफ्रेजेट बायका नेहमीं मोर्चे नेत व एकहि सभा निर्विघ्न पार पडूं देत नसत. त्यामुळें सफ्रेजेट चळवळीबद्दल विन्स्टनच्या मनांत तिटकारा उत्पन्न झाला होता. परंतु क्लेमंटाइननं सफ्रेजेट चळवळीस उत्तेजनच दिलं.

एकदां विम्स्टन चर्चिल यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली होती.

क्लेमंटाइनहि त्या सभेला हजर होती व विन्स्टनजवळच व्यासपीठावर बसली होती. सफ्रेजेट स्त्रियांचा उपसर्ग होऊ नये म्हणून सभागृहांत कडेकोट बंदोबस्त राखण्यांत आला होता. सभा निर्विघ्न पार पडणार असं वाटत होतं. परंतु अचानक छपराजवळच्या खिडकींत तीन मुली दिसूं लागल्या, आणि ' स्त्रियांना मतें द्या ' अशा घोषणा उंच आवाजांत होऊं लागल्या. क्लेमंटाइननं उत्तेजनार्थ त्यांच्याकडे पाहून हात हालविला. या एकंदर प्रकाराबद्दल विन्स्टन चर्चिल यांचा मनांतल्या मनांत कितीहि संताप आला तरी प्रेक्षकांना मात्र त्याची फार मौज वाटली. मतदानाचा हक्क स्त्रियांना देणं भाग पडावं या हेतूनं सफ्रेजेट स्त्रियांनीं चर्चिल यांची लहानगी मुलगी दिआना हिला पळवून नेण्याचा कट केला आहे अशीहि कंडी उठविण्यांत आली होती. परंतु क्लेमंटाइनच्या तत्वनिष्ठ मनावर या अफवांचा कांहीं एक परिणाम होऊं शकला नाहीं. उलट पतीची नापसंती असतांहि सफ्रेजेट चळवळीस तिनं प्रोत्साहनच दिलं. या एकाच उदाहरवरून चर्चिलसारख्या प्रचंड व्यक्तिमत्वाच्या पुरुषाची पत्नी असूनसुद्धां क्लेमंटाइनचीं मतं किती स्वतंत्र होतीं तें दिसून येतं. पतीच्या हातांतील कळसूत्री बाहुली ती कधीं बनली नाहीं.

लग्नानंतर लवकरच डिआना आणि रँडोल्फ या दोन मुलांना क्लेमंटाइननं जन्म दिला. आणि नंतर महायुद्धाच्या धामधुमींत सारा आणि मेरीगोल्ड यांचा जन्म झाला. त्या काळीं मुलं होणं ही अडचण समजली जात नसून ती एक संसारसुखास आवश्यक अशी घटना समजण्यांत येई. त्यामुळें क्लेमंटाइनच्या आयुष्यांतील बराचसा काळ या चार मुलांचं संगोपन करण्यांतच गेला होता. गेल्या महायुद्धांत एकीकडे मुलाबाळांना संभाळून दुसरीकडे क्लेमंटाइन कँटीनमध्यें व इतर अनेक वॉररिलीफ सोसायट्यांमधून काम करीत असे. या कामांत तिची फार ओढाताण होत असे खरी; पण तेंहि तिनं मोठ्या चिकाटीनं पार पाडलं. क्लेमंटाइनला दुःखाची खरी झळ प्रथम लागली ती तिची तीन वर्षांची छोटी मेरीगोल्ड न्युमोनियानं कालवश झाली तेव्हां. कसल्याहि प्रसंगाला न डगमगणाऱ्या क्लेमंटाइनला अपत्यवियोगाच्या दुःखानं एकदम मोडकळीस आणलं. नंतर वर्षानं तिच्या

पोटीं छोटी मेरी जन्मास आली तेव्हां या दुःखाचा भार थोडा हलका झाल्यासारखं तिला वाटलं.


आदरातिथ्याबद्दल क्लेमंटाइनची फार ख्याति आहे. विशेषतः तिच्या घरांतील उत्कृष्ट मेजवान्या जेवणारा सहसा कधीं विसरत नाहीं. स्वतः विन्स्टन चर्चिल हे खाण्यापिण्याच्या बाबतींत इतके चोखंदळ आहेत कीं, त्यांच्यासाठीं तऱ्हेतऱ्हेचीं पक्वान्नें बनविण्यांत क्लेमंटाईनला आपलं बुद्धिसर्वस्व नेहमींच वेंचावं लागतं. साऱ्या दिवसांतला महत्वाचा वेळ म्हणजे जेवणाचा. समोर क्लेमंटाइन बसली आहे, टेबलावर सुग्रास जेवण मांडलं आहे. अशा कल्पना जेवणाची वेळ होईपर्यंत विन्स्टनच्या मनांत घोळत असतात, तऱ्हेतऱ्हेचीं मद्यं पिण्याच्या बाबतींतहि विन्स्टन चांगलाच तरबेज आहे. तीहि व्यवस्था क्लेमंटाइनला काळजीपूर्वक करावी लागते. तिला डोळ्यांत तेल घालून जपावं लागतं तें एका गोष्टीबद्दल व ती गोष्ट म्हणजे सिगार्स. विन्स्टन सिगार्स ओढूं लागला म्हणजे त्याला सुमार राहत नाहीं. तेव्हां त्याच्या सिगार्सचें रेशनिंग करण्याचं काम तिच्याकडे आहे. तिची थोडी नजरचूक झाली कीं मनसोक्त सिगार्स ओढण्याची संधि विन्स्टन साधून घेतो हें तिला माहीत असल्यानं तिचं हें काम फारच कठीण होऊन बसलं आहे.

तिच्या स्वतःच्या राहणींत, वेषभूषेंत, तिची खानदानी आवड दिसून येते. तिच्या या साध्या पण उच्च अभिरुचीची छाप तिच्या मुलांच्या राहणीवर व घराच्या मांडणीवरहि पडली आहे. लहानपणापासूनच साध्या राहणीची संवय असल्यामुळें तिचे कपडे अद्यावत् शिलाईचे असले तरी भडक असत नाहींत. लहानपणीं त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें ती आपल्या सोनेरी केसांचा मधोमध भांग पाडीत असे. परंतु आतां बदलत्या फॅशनप्रमाणें तिनं आपल्या कपाळावरचे केस कुरळे केले आहेत. लढाई सुरू झाल्यानंतर नवे नवे कपडे करण्याची हौस तिनं कमी केली आहे खरी. परंतु तऱ्हतऱ्हेच्या कपड्यांनीं तिच्या ट्रंका भरलेल्या आहेत. वयोमानाप्रमाणें तिचं पूर्वीचं देहसौष्ठव आतां राहिलेलं नाहीं. पण तिनं तें बेडौलहि होऊं दिलेलं नाहीं. तिच्या वागण्यांत कोठेंहि चांचल्य दिसून येत नाहीं. कारण वयाला शोभेल असाच पेहराव व रंगभूषा करण्याची ती नेहमीं

दक्षता घेते. अलीकडे भुवया धनुष्याकृति करण्याची पद्धत निघालेली दिसून येते. क्लेमंटाइनच्या भुवया थोड्या जाड आहेत. पण त्या कापून धनुष्याकृति करणें आपल्यासारख्या पोक्त स्त्रीला शोभणार नाहीं हें ओळखून ती या फॅशनच्या भानगडींत पडली नाहीं. या तिच्या वर्तनामुळें तिच्या सारख्या पोक्त स्त्रीला अधिकच खुलून दिसणारं गांभीर्य व खानदानी ऐट तिच्या ठिकाणीं निर्माण झाली आहे.

त्यांच्या शेतावरच्या बंगाल्यांत ती दोघं रहावयास गेलीं म्हणजे त्यांचा सारा वेळ बागकाम करण्यांत जातो. तो त्या दोघांचाहि आवडता व्यवसाय आहे. माळ्यांच्या कामावर ती सतत देखरेख करीत असते, आणि बागेंतल्या ओढ्याचे लहान लहान धबधबे करण्यांत विन्स्टन रमलेला असतो. लंडन-मधल्या राजकीय आणि सामाजिक कामांमुळें श्रमलेल्या या पतीपत्नींच्या मनाला या बागेंत खऱ्या विश्रांतीचं सुख लाभतं. सुटीनिमित्त तीं दोघं लांबच्या प्रवासावर जात ते दिवस तर क्लेमंटाइनला फार सुखाचे वाटत. कारण त्या दिवसांत निर्वेधपणें वनभोजनाचे आणि शिकारीचे बेत त्यांना पार पाडता येत असत. आता सुद्धां पुष्कळदां घरांत विन्स्टन चर्चिल व क्लेमंटाइन निवांतपणें एकत्र बसतात व आपल्या व्याख्यानांतले मुद्दे चार्चिल तिला वाचून दाखवितात. कधीं कधीं क्लेमंटाइन तें फक्त लक्षपूर्वक ऐकत राहते. एखादेवेळीं त्यांत ती कांहीं सुधारणाहि सुचविते. ज्या ज्या वेळीं पार्लमेंटच्या बैठकींत चर्चिल एखादी फार महत्त्वाची घोषणा घोषणा करणार असतात त्या त्या वेळीं त्यांची पत्नी न चुकतां हजर राहते. कधीं कधीं तिच्याबरोबर तिच्या मुलींहि असतात. पार्लमेंटपुढें भाषण सुरू करण्याच्या आधीं क्लेमंटाइन ज्या ठिकाणीं बसलेली असेल तिकडे दृष्टि टाकून हात हालविण्यास चर्चिल कधीं चुकत नाहीं. एकाद्या जगविख्यात मुत्सद्याकडून याहून अधिक काव्यमय अभिवादन दुसऱ्या कोणा स्त्रीला मिळालं असेल काय ? चर्चिल पार्लमेंटचे एक पोरसवदा सभासद होते व क्लेमंटाइन एक पोरसवदा वधू होती, तेव्हांपासून आतापर्यंत या अभिवाद-नाच्या गोड उपक्रमांत चर्चिल यांनीं कधीं खंड पडूं दिलेला नाहीं.

---



मिसेस जेन डी व्हॅलेरा

# १० . . . जेनी डी व्हॅलेरा

गेलीं पंचवीस तीस वर्षं आयर्लंडच्या राजकारणाचीं सर्व सूत्रं डी व्हॅलेरा यांच्याच हातीं आहेत. त्यांच्या राजकीय जीवनाची ओळख साऱ्या जगाला आहे. परंतु त्यांच्या कर्तृत्वाचे व खाजगी जीवनाचे संबंध किती जिव्हाळ्याचे आहेत, ही गोष्ट मात्र फारच थोड्या व्यक्तींना माहीत आहे.

डी व्हॅलेरा यांचं चरित्र म्हणजे मायदेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची प्रतिज्ञा ज्यानं स्वतः अनेक दिव्यांतून जाऊन पुरीं केली अशा एका थोर विभूतीचंच चरित्र होय. अद्‌भुतरम्य अशा अनेक घटनांनीं हें चरित्र भरलेलं आहे. मात्र त्याचं मनन करतांना ध्येयपथावरचा हा खडतर प्रवास डी व्हॅलेरांनीं एकट्यानंच केला असावा अशी शंका मनांत आल्या-वांचून रहात नाहीं. त्यांची सहचारिणी जेनी डी व्हॅलेरा हिनं त्यांच्याशीं जें सहकार्य केलं त्याचा फारसा गाजावाजा न झाल्यामुळें पुष्कळदां ती एक साधीभोळी कर्तृत्वशून्य गृहिणी असावी असा आक्षेप तिच्यावर घेतला जातो, व बेनिटो मुसलिनोची पत्नी सिनोरा राशेल मुसलिनी हिच्याप्रमाणंच जेनी डी व्हॅलेरा एक मागासलेली गृहिणी आहे असा गैरसमज पसरला जातो खरा. जेनी डी व्हॅलेरा व राशेल मुसलिनी या दोन्ही थोरांच्या सहचारिणी प्रकाशांतील व्यक्ती म्हणून जगापुढें न आल्या तरी त्या दोघींच्या अप्रका-शित व्यक्तित्वांत जमीनअस्मानाच अंतर आहे. जेनी डी व्हॅलेरा हिचं व्यक्तिमत्व अत्यंत जाज्वल्य आहे. डी व्हॅलेरासारख्या विद्वान् पतीला अत्यंत अनुरूप असं तिचं बुद्धिवैभव आहे. 'आयर'च्या भविष्यकालाचा प्रश्न तिला अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो व तिच्याभोंवतीं राजकारणाच्या ज्या बऱ्यावाईट घडामोडी होतात त्या समजण्याइतका मुत्सद्दीपणाहि तिच्या ठिकाणीं आहे. ती सुशिक्षित आहे, सुसंस्कृतहि आहे. ज्या

सामाजिक व बौद्धिक वातावरणांत डी व्हॅलेरा वावरत असतात त्याच वातावरणात ती लहानाची मोठी झाल्यामुळे तिचा स्वभाव व तिच्या बुद्धीचा विकास तिच्या पतीच्या विद्वत्तेला अनुरूप असाच झालेला आहे. उलट बिचाऱ्या राशेलला धड अक्षरओळखहि नाहीं. बेनिटोची धडाडी, त्याचं शिक्षण व सुसंस्कृतपणा या मानानें राशेल अगदींच खेडवळ वाटते. त्यामुळें तिच्या बाबतींत पतीशीं सहकार्य करण्याचा प्रश्नच उरत नाहीं. तिच्या मर्यादित बुद्धीला बेनिटोचं राजकारण व त्याच्या आशा-महत्वाकांक्षा अगम्य असल्यामुळें तिचं जीवित घराच्या चार भिंतीआडच वेचलं जावं ही गोष्ट अपरिहार्यच. परंतु जेनी डी व्हॅलेराच्या बाबतींत असं कोणतंच व्यंग नसतांना तिचं व्यक्तित्व डी व्हॅलेराच्या जीवनक्रमांत चमकूं नये हें आश्चर्यच म्हटलं पाहिजे!

याचं मुख्य कारण म्हणजे या दोघां पतिपत्नींच्या कार्यक्षेत्रांतील भिन्नता हेंच असावं! डी व्हॅलेरा यांनीं आपलं सर्वस्व आयर देशाच्या राजकारणासाठीं वाहिलं. स्वातंत्र्यासाठीं धडपडणारी जनता प्रथम सुसंस्कृत व सुशिक्षित असली पाहिजे. आयर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची जबाबदारी तिच्या पतीनं उचललेली होतीच. राजकारण व संस्कृति यांचा फार निकट संबंध असतो ही गोष्ट कुणाच्या फारशी लक्षांत येत नाहीं. पण संस्कृति व राजकारण या दोन गोष्टी केवळ एकमेकांच्या निकटवर्ती असतात इतकंच नव्हे तर एकमेकाशिवाय त्यांना स्वतंत्र अस्तित्वच नसतं. जेनी डी. व्हॅलेरानं ही गोष्ट लक्षांत घेऊन आयरिश जनता सुसंस्कृत व सुशिक्षित बनविण्यासाठीं शिक्षणक्षेत्रांत कार्य करण्यास सुरवात केली. जेनी स्वतः गॅलिक भाषांमध्यें प्रवीण असून तिचा वाङ्मयाचा अभ्यास फार मोठा आहे. जेनी स्वतः शिक्षणक्षेत्रांत काम करूं लागली तरी ती आपल्या पतीच्या राजकीय हालचालीकडे बारकाईनें लक्ष देत असे. आयरच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत एक स्त्री पुढारी म्हणून ती चमकली नसली तरी हजारों आयरिश स्त्रीपुरुषांप्रमाणेंच ती एक मायदेशाची सैनिक होती. यापेक्षां अधिक मोठं राजकीय कार्य तिच्या हातून न घडल्यामुळें डी व्हॅलेरांच्या राजकारणमय जीवितांत तिचं अस्तित्व दिसून येत नाहीं एवढंच.

१०५८९



डी व्हॅलेरांनीं आयरचं एकमेव नेतृत्व स्वीकारण्यापूर्वीच जेनी ओ फ्लॅनॅमच्या अंतःकरणांत देशप्रेमाची ज्योत प्रकाशत होती व डी व्हॅलेरांच्या नेतृत्वाखालीं राजकीय क्रांति सुरूं होण्यापूर्वींहि ती आपल्या समजुतीप्रमाणें देशसेवा करीत असे. आयरचा इतिहास व संस्कृति तिच्याइतकी दुसऱ्या कोणीच अभ्यासिली नसेल. आयरिश जनतेच्या मनांत मायदेशाच्या संस्कृतीबद्दल, इतिहासाबद्दल व भवितव्याबद्दल आदर व आकांक्षा उत्पन्न व्हाव्या म्हणून तिने आयरिश भाषेचा प्रचार सुरूं केला. गॅलिक लीग या नांवाच्या संस्थेची ती एक प्रमुख मेंबर होती व त्या संस्थेमार्फतच ती आयरिश भाषेचे वर्ग घेत असे. शिक्षणदानाच्या या व्यवसायांतला तिचा प्रामाणिकपणा व उत्साह अभिनंदनीय ठरण्यासारखा होता. हें कार्य करीत असतांनाच तिच्या स्वतःच्या स्वभावांतील हें गुणवैशिष्ट्य तिच्या विद्यार्थ्यांमध्यें तिला दिसून आलं. इथं इमॉन डी. व्हॅलेराशीं तिची प्रथम भेट झाली. इमॉन डी व्हॅलेरा हे ग्रीक, फ्रेंच, लॅटिन व जर्मन या भाषा उत्कृष्टपणें बोलूं शकत. डी व्हॅलेरांनीं जेनीला जर्मन शिकवावं व त्याच्या मोबदल्यांत जेनीनं त्यांना आयरिश भाषेचे धडे द्यावे अशी ही देवघेव सुरूं झाली. मग एकमेकांच्या अंतःकरणाची देवघेव व्हावी हें क्रमप्राप्तच होतं !

जेनी डी व्हॅलेराची मास्तरीण होती व पुढें त्यांच्या जीविताची भागीदारीण होणार होती. जेनीची व त्यांची प्रथम भेट झाली तेव्हां ते अवघे २७–२८ वर्षांचे होते. जेनी अतिशय देखणी दिसत असे. ठराविक सेल्टिक सौंदर्याऐवजीं तिच्या स्वरूपांत निराळंच नाविन्य होतं. गोरीपान अंगकांति, गडद सोनेरी केस, आणि नीलकमलाच्या रंगाचे डोळे, हे तिचे सौंदर्यविशेष फार मोहक वाटत असत. जेनी व इमॉन दोघेहि कॅथॉलिक ख्रिश्चन होतीं. धर्म व देश या दोन गोष्टींबद्दल ज्या घराण्यांत आत्यंतिक आदर व प्रेम बाळगलं जातं अशा घराण्यांत तीं दोघंहि लहानाचीं मोठीं झालीं होतीं. त्या दोघांच्याहि स्वभावांत बरंच साधर्म्य होतं. दोघांच्याहि ठिकाणीं अबोलपणा व संकोचवृत्ति दिसून येत असे. स्वतः डी व्हॅलेराचं सौंदर्य तर असामान्यच होतं. नंतरच्या तुरुंगवासांत त्याचं सारं शरीरसौष्ठव नाहींसं झाल्यामुळें नुसत्या देहाचा सापळा उरला होता. परंतु तुरुंगवासापूर्वींच्या त्या दिव-

सांत त्याचं शरीरवैभव असामान्य होतं. अजूनसुद्धां हडकुळ्या प्रकृतीमुळें ते प्रमाणाबाहेर उंच दिसूं लागले असले तरी त्यांच्यावर फिदा होणाऱ्या अनेक स्त्रिया त्यांचा पाठपुरावा करीत असतात. अशा स्त्रियांचा अपमान न करण्याइतकं स्त्रीदाक्षिण्य त्यांच्या अंगीं आहे, पण त्यांपासून नेहमीं चार हात दूर राहण्याइतके ते धूर्तही खचित आहेत. एकतीस वर्षांपूर्वी जेनीशीं त्यांनीं विवाह केला त्या दिवसापासून जेनीखेरीज इतर स्त्रियांबद्दलचं त्यांच्या मनांतलं कुतूहल अजीबात नाहींसं झालं आहे.

समव्यवसायामुळें व स्वभावसाधर्म्यामुळें तीं दोघं एकत्र आलीं व त्यांचं वैवाहिक जीवन अतिशय सुखाचं झालं. इतकं कीं, सामान्य जनतेची दृष्ट त्या सुखाला कधींच लागूं शकली नाहीं. संसारसुखांत जेनी सर्वस्वीं बुडून गेली होती. लग्नानंतर जेनीचं अस्तित्व इमॉनखेरीज इतर कुणालाच भासत नव्हतं ! लग्नापूर्वी गॅलिक भाषेच्या उद्धारासाठीं व प्रचारासाठीं निष्ठेनं काम करणारांमध्यें तिची गणना होत असे. एक उत्कृष्ट शिक्षिका म्हणूनहि तिची ख्याति होती. स्वभावानं ती प्रेमळ व सहनशील असल्यामुळं लहान मुलं तिच्यापासून आवडीनं धडे शिकत. परंतु तिच्या तीक्ष्ण बुद्धीमुळें व खोल अभ्यासामुळें मोठी माणसंहि तिला आदर्श शिक्षिका समजत. तिच्या मार्गदर्शनाखालींच डी व्हॅलेरा यांनीं गॅलिक भाषेचा अभ्यास पुरा केला.

आयरिश भाषेचा प्रचार व्हावा म्हणून या संस्थेतर्फे आयरिश भाषेमधूनच लहान मोठ्या नाटकांचे प्रयोग केले जात. या प्रयोगांत जेनी प्रामुख्यानें भाग घेत असे. ज्यांनीं ज्यांनीं या प्रयोगांतील जेनीचं काम पाहिलं त्यांना तिच्या अभिनयांतील व हालचालींतील सौंदर्य खचित आकर्षक वाटलं असेल.

१९१० सालीं डी. व्हॅलेरा यांच्याशीं ती विवाहबद्ध झाली. आता तिचा संसार बराच वाढला असून ती सहा मुलांची माता झाली आहे. अर्थात् डी व्हॅलेरासारख्या पराक्रमी पुरुषाच्या सहचारिणीला घरसंसार, मुलंबाळं अशा सामान्य स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या सुखाबरोबरच इतर अनेक दिव्यांना तोंड द्यावं लागतं. डी व्हॅलेरा यांच्या खाजगी जीवनांतहि तो काल क्रांतीसारखा होता. लग्नापूर्वीच्या शांततेच्या कालांतून आता जेनीनं डी व्हॅले-

रांच्या क्रांतिमय जीवनांत प्रवेश केला होता. या जीवनांत सुरक्षितता, स्थिरता, समाधान यांचा पूर्ण अभाव होता. काळजी, दुःख, राजकीय घडामोडी आणि मायदेशाच्या भवितव्याची चिंता या अनेक गोष्टीमुळें तिचं जीवन आतां खडतर झालं होतं. शिक्षिकेभोंवतीं असणारं निष्पाप वातावरण नाहींसं होऊन आता जेनी राजकारणाच्या धामधुमींत पुरतीच सांपडली होती.

क्रांतीच्या कालांतच तिचं लहानपण गेल्यामुळें आयरमधील बदलत्या परिस्थितीशीं जुळतं घेणं जेनीला कठीण वाटलं नाहीं. त्या धामधुमींतहि गॅलिक भाषेतील गद्यपद्याच्या सौंदर्याचा प्रसार व प्रचार करण्याचं कार्य तिनं अव्याहत चालूच ठेविलं. डी व्हॅलेरा यांच्या राजकारणास जेनीचं हें कार्य पोषकच ठरलं. कारण आयरिश वाङ्मयाच्या प्रसारानंच हजारों आयरिश अंतःकरणांतून जागृति निर्माण झाली ही गोष्ट विसरतां येत नाहीं. शिक्षणाचा प्रसारच अखेर राजकारणाचा प्रभावी प्रचार होऊं शकतो याचं हें उत्कृष्ट उदाहरणच आहे. परंतु जेनीचं हें कार्य जनतेच्या विशेष लक्षांत येऊं शकलं नाहीं. कारण त्या वेळीं जगाचं सारं लक्ष साऱ्या आयरचं भवितव्य हातीं घेणाऱ्या इमॉन डी व्हॅलेकराकडेच लागलं होतं.

थोर पुरुषांचं खाजगी जीवन सर्वस्वीं भोंवतालच्या परिस्थितीवरच अवलंबून असतं. सामान्य मनुष्याची गोष्ट वेगळी असते. सामान्य मनुष्य कोणत्याही परिस्थितींत जगू शकतो. घरदार, मुलंबाळं, अशा ठराविक चाकोरींतून त्याच्या जीविताचा प्रवास चालू असतो. त्याच्या लहानशा जगांत त्याला समाधान मिळू शकतं. परंतु थोर पुरुषांना या सामान्य सुखाला मुकावं लागतं. त्यांच्या सुदुखःखाचीं कारणं साऱ्या जगाच्या घडामोडीवर अवलंबून असतात. जगाच्या कोणत्याही भागावरून-शेंकडो मैलावरून मदतीची हांक त्यांना ऐकू आली, कीं ते धावत जाण्यासाठीं सदा तत्पर असतात. त्यांच्या जीवनाला स्थिरता नासते, शांतता नसते. स्वतःच्या मर्यादित संसारांतील सुखदुःखांचाच सामान्य माणसांना परिचय असतो. पण सारं जग हाच थोरांचा संसार होय, व या अफाट संसाराची चिंता त्यांच्या अंतःकरणाला सतत लागलेली असते. इमॉन डी. व्हॅलेरा यांचा खरा संसार म्हणजे त्यांची मातृभूमि—आयर ! आयरचीं

सारीं सुखदु:खं, आशा-निराशा, जयापजय यांनींच त्यांचं जीवित भरून गेलं होतं.

अशा परिस्थितींत आणि अशा थोर पुरुषाबरोबर जेनीनं आपल्या संसारास सुरवात केली होती. लग्नानंतरच्या कांहीं वर्षांत डी व्हॅलेरांनीं गुप्तपणें राजकीय चळवळ चालू ठेवली होती. नंतर त्यांच्या आयुष्यांतील बहाराचीं वर्षं त्यांनीं तुरुंगांत खितपत पडून कंठलीं होतीं! या आगींतून डी व्हॅलेरा पार पडले खरे; परंतु तिची आंच लागून जेनीचं हृदय मात्र वज्रासारखं कठोर बनलं. जात्याच ती अबोल व संयमी असल्यामुळें अंत:करणाला जाळणाऱ्या दु:खाला तिनं कधींच वाट फुटूं दिली नाहीं; किंवा तिला कोठें विसावाहि सांपडला नाहीं. डी व्हॅलेरा तुरुंगांतून पळून जात तेव्हां त्यांना पकडून देण्यासाठीं मोठमोठीं बक्षिसें लावण्यांत येत. त्यांचा ठावठिकाणा माहीत नसल्यानं त्यांची चौकशी करण्याचं समाधानसुद्धां तिला मिळत नसे. पतीच्या सुरक्षिततेबद्दल सतत चिंता व भीति वाहून वाहून जेनी थकली होती. त्या दु:खाची छाया अजूनहि तिच्या विशाल नेत्रांत दिसून येते. त्या काळजीनं तिच्या गालावरची टवटवी जी एकदां मावळली ती नंतर कधींच परत आली नाहीं. एकादे वेळीं अगदीं आकस्मिकपणें फरारी इमॉन तिच्यासमोर हजर होत. आणि मग जें कांहीं थोडे तास त्यांचा सहवास तिला मिळत असे, तेवढ्या अवधींत ती उरलेल्या साऱ्या आयुष्याची चैन भराभर करून घेई. त्यांच्या सहवासाचा एकेक क्षण तिला प्राणाच्या मोलाचा वाटे. आयरिश लोक जात्याच भावनाप्रधान. जेनी वृत्तीनं लाजरी असली तरी अशा वेळीं ती आपला संकोच पार झुगारून देत असे. इमान जसे येत तसेच तांतडीनं नाहींसे होत. मग तिच्या रिकाम्या जीवनांत भीति, निराशा व संकटं पुन्हा गर्दी करीत. मायदेशाचं प्रेम आणि धर्मावरील श्रद्धा यामुळेंच या भयंकर झगड्यांत तिच्या अंत:करणानं खंबीरपणें टिकाव धरला होता. आशानिराशेच्या या झगड्यामुळें जेनी आतां अकालींच वयस्क दिसूं लागली आहे व तिच्या मनाची निर्भय वृत्तिहि नाहींशी झाली आहे. तिचं मन अकारण सावध राहतं. संकटाची चाहूल घेण्याची त्याची संवय अजूनहि जात नाहीं.